पैसे खाण्याची संधी आली नाही कसे म्हणू ? खायचे नाहीत असाही आग्रह नव्हता. जमले नाही, साहेब. खायचे म्हटले की छातीच धडधडायची. एकदाच दहा रुपये घेतले आणि महिनाभर झोप नव्हती. सारखे एकच दिसायचे, उघडकीला आले आहे. छी: थू: होते आहे. फार त्रास झाला आणि मग हिंमतच उरली नाही. आता कसलाच त्रास नाही होत. वाटते गेलेच आयुष्य. विचार तरी कशाला ? झाले ते झाले. जे होईल ते होईल....

प्रवास

माणूस

१ मे १९७०

चाळीस पैसे

ती आकृती आता विलक्षण दयनीय आणि हृदयस्पर्शी वाटते. पण कुळकर्णी यांचे सांत्वन तरी कसे, कशाबद्दल करावे ? केवळ फार चार-चौघांसारख्या आणि सर्वसामान्य आयुष्याबद्दल ? ज्यात फार मोठा पराक्रम नसेल, पण एकादी मोठी शोकात्मिकाही नाही. कसला भयंकर आघात नाही, की घात नाही, की अपघात नाही असे एक सरळ रेषेतले सपाट, दुर्मिळ आयुष्य... एक सरळ आयुष्यानेच पुरती कोंडी केलेला माणूस कुळकर्णी. कोणत्याही लेखकाला कधीही भेटू नये असा खराखुरा सामान्य माणूस. ज्याच्यासाठी हसण्याला जागा नाही, रडण्याची संधी नाही. ..............

- समाजवाद्यांचा भ्रामक शांततावाद
- कम्युनिस्टांचे ठरीव ठशाचे
  संयुक्त आघाड्यांचे राजकारण
- शेजारी-राष्ट्राच्या युद्धतयारीकडे
  राज्यकर्त्यांचे साफ दुर्लक्ष
- वाढत्या समृद्धीबरोबर जनमानसामध्ये
  निर्माण झालेली आत्मसंतुष्टता

हे काही केवळ स्वतंत्र
भारताचे चित्र नव्हे.
अनेक लोकसत्ताक राजवटींनी
या अवस्थेचा अनुभव घेतलेला आहे.

अशाच एका राष्ट्राच्या
जया–पराजयाच्या, हर्षामर्षाच्या
विलक्षण क्षणांचे उद्बोधक दर्शन

# पराजित - अपराजित

अधिक तपशील पुढील अंकात

९ मे १९७०

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष नववे : अंक एकूणपन्नासावा
संपादक : श्री. ग. माजगावकर
सहाय्यक : दिलीप माजगावकर । सौ. निर्मला पुरंदरे
१०२५ सदाशिव, पुणे ३० दूरध्वनी : ५७३५९

किंमत : ४० पैसे वार्षिक वर्गणी : वीस रुपये परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

दिनांक २ मे चा 'माणूस' वाचला. माणूसमधून नेहमीच काहीना काही माहितीपूर्ण (इन्फर्मेटिव्ह) असे लेख वाचायला मिळतात. त्यामुळेच पुढच्या अंकाची उत्सुकता लागून राहते.

दादूमियाची 'रसगुल्ले आणि बॉम्ब्' ही नवी लेखमाला सुरू केल्याबद्दल धन्यवाद ! सद्य.स्थितीतील कलकत्त्याचे वास्तव चित्रण त्यांनी त्यांच्या नेहमीच्या 'पूछो मत !' अशा पद्धतीने केले आहे.

दि. २५ एप्रिलच्या अंकातील 'तोडी' ही कथा वाचल्यानंतर, 'तोडी' या शीर्षकाचा आणि त्या कथेचा दूरान्वयानेही संबध लागेना. यापेक्षा अधिक अन्वर्थक शीर्षक असायला हवे होते. कथा आवडली.

'अंदाज' मधील भविष्यातून कोणता ग्रह कोणत्या स्थानात आहे याची माहिती देण्याऐवजी, त्या त्या सप्ताहातील जन्मदिनांकाचे फलादेश वर्तविले तर आमच्यासारख्या असंख्य वाचकांची मोठीच सोय होईल. प्रयत्नवादी माणसाला श्री. जोशी यांचे भविष्य वाचून निश्चितच मार्गदर्शन मिळते व अचूक पडताळा येतो असा माझा अनुभव आहे. श्री. जोशी यांनी लेखनशैली यापेक्षा अधिक आकर्षक करावी ही विनंती.

मार्च ४, १९७० शं. ज. निपुणगे, पुणे

प्रकाशित लेख, चित्र इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक,

# अजूनही एकसंध आहे...

आपण हाती कान धरून कबूल करतो की महाराष्ट्र विधानसभेतून राज्यसभेच्या निवडणुका झाल्या झाल्या श्री. वैशंपायनाच्या पराभवाच्या निमित्ताने ज्यांनी ज्यांनीं महाराष्ट्र काँग्रेस फुटत असल्याच्या धोक्याच्या घंटा वाजविल्या त्यांनीं जरा घाईच केली. अर्थात त्यात आपणही होतोच. तसं काही म्हणजे आपलं अगदीच चुकलं नाही. पण जरा घाई झाली. एवढंच. आणखी थोडा सबूर करायला हवा होता. महाराष्ट्र काँग्रेस किती लवचिक आहे याचा आणखी एकदा आढावा घ्यायला हवा होता. आपल्या एका गोड भापणाने गृहमंत्री यशवतराव चव्हाण विरोधकांच्या डोक्यावरून कसे सफाईने हात फिरवितात हे पुन्हा एकदा आठवायला हवं होतं.

गेल्या आठवड्यातल्या महाराष्ट्र विधानपरिषदेच्या निवडणुकीत आणि बुलढाणा लोकसभा मतदार संघात आपल्या सर्व उमेदवारांना विजयी करून महाराष्ट्र-काँग्रेसने आपली ताकद सिद्ध केली आणि महाराष्ट्र काँग्रेस फुटल्याच्या सर्व वावड्यांवर पाणी ओतलं. राज्यसभा निवडणुकीत महाराष्ट्र काँग्रेसला वर्मी वार बसून तोंडाला काळोखी फासली गेली होती. ती या विजयानं धुऊन काढली. विजय साधासुधा नव्हे तर एकदम डोळे दिपवणारा. महाराष्ट्र काँग्रेस अजूनही एकसंध आहे हे ठणकावून सांगणारा.

पण मग हे प्रकरण एवढ्यावरच संपते का ? महाराष्ट्र काँग्रेस जर श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली एवढी एकसंध आहे तर राज्यसभेच्या निवडणुकीत वैशंपायन पडून जुन्या मुंबई काँग्रेसचे बाबूभाई चिनॉय का निवडून आले होते ? (आणि त्यावेळी जी मते फुटली ती केवळ १७–१८ नव्हती तर तब्बल ३५ च्या वर होती हा अगदी आतल्या गोटातला ताजा रिपोर्ट). महाराष्ट्र विधानसभेतील जुन्या काँग्रेसचा गट आपण सर्वात मोठा विरोधी पक्ष म्हणून बसू अशा उड्या कोणाच्या जोवावर मारत होता ? महाराष्ट्र काँग्रेस एकसंध आहे ती कोणत्या बाबतीत ? तत्त्वाच्या, विचारांच्या, कृतीच्या की सत्ता टिकविण्याच्या बाबतीत ? मग थोड्या थोडक्या कारणावरून राजीनामा देण्यापर्यंत भांडणे का होतात ? सरकारी चळवळीच्या प्रागतिक सुधारणांच्या बाबतीत कडेकोटीचे मतभेद का होतात ? सहकार मंत्र्यांचे विचार वेगळे आणि अर्थमंत्र्यांची भाषणे वेगळी असे का घडते ?

आपल्याला तर बुवा 'काँग्रेस फोबिया' झाल्याचा संशय येऊ लागला आहे.

आता १ मेच्या दहाव्या महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने साऱ्या वर्तमानपत्रांमधून राज्याच्या समाजवादी सरकारने कशी नेत्रदीपक प्रगती केली आहे, (हिरवी क्रांती वगैरे) गरीबांसाठी, छोटया शेतकऱ्यासाठी वगैरे सरकार कसे झटते आहे याचे भरगच्च आढावे येऊन गेलेत. मग इथेच महाराष्ट्र काँग्रेसच्या हेतूविषयी, सामर्थ्याविषयी, विचाराविषयी शंका का घेतली जाते? देशातल्या प्रगत राज्यामध्ये महाराष्ट्र बऱ्याच वरच्या क्रमाकात आहे. या काँग्रेस सरकारने आमची खेडी पार जरी नाही तरी बरीचशी बदलून टाकली. शेतकऱ्यामध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण केले. ज्यांना पाटाचे पाणी मिळते अशा शेतकऱ्याच्या घरातून तर सोन्याचा धूर निघतो आहे. छोटया जमीनवाल्याना, भूमिहीनांना आश्वासन दिली आहेत – काही ठिकाणी ती पारही पाडली आहेत, – कोरडवाहू शेतीसाठी बंडिंग वगैरे सारखे प्रचड कार्यक्रम आखले आहेत. आणखी कितीतरी मोठी यादी देता येईल. पण ती सर्व यादी वर्तमानपत्रांमधून छापून आलेली आहे. एकूण मतितार्थ असा की महाराष्ट्र काँग्रसचे राज्य अगदीच वाईट नाही. त्यानी बऱ्याच चागल्या गोष्टी-सुद्धा केल्या आहेत. मग बिचाऱ्या महाराष्ट्र काँग्रेसच्या वाईटावर लोक का टपून बसले आहेत? काँग्रेसच्या प्रत्येक कृतीत वाईट-साईट शोधत बसायचे आणि थोडी कुठे गडबड दिसली की हात पसरून महाराष्ट्र काँग्रेस फुटली रे फुटली – चव्हाण पडले रे पडले – असा ठणाणा शंख करीत सुटायचे हे काय?

पण त्याचे असे आहे महाराष्ट्रात काँग्रेस ही सर्वसत्ताधारी आहे. आपल्या बहुमताच्या रगाडयामुळे ती या राज्यात काहीही करू शकते. आमची 'डेस्टिनी', आमचे भविष्य सध्यातरी इथे महाराष्ट्र काँग्रेसच्या हाती आहे. त्यामुळे काँग्रेसच्या बारीक-सारीक हालचालीच्या तपशीलावर नजर ठेवणे हे क्रमप्राप्त आहे. पक्षांतर्गत बारीक मतभेदांचा, किरकोळ भाडणांचा परिणाम पक्षाच्या धोरणावर होतो. महत्त्वाचे राज्यव्यापी निर्णय घेताना हे मतभेद, ही भाडणे आपला प्रभाव पाडतात. जेव्हा एखादा हुकूमशहा राज्यशकट चालवीत असतो तेव्हा तर कितीतरी गोष्टी त्याच्या नुसत्या मूडवर अवलबून असतात. त्याला थोडा सर्दीताप झाला की कितीतरी महत्त्वाचे निर्णय बाजूला पडणार. राग आला की तो भलतेच काहीतरी करून टाकणार, त्याचे राग, लोभ, पूर्वग्रह साऱ्या साऱ्या गोष्टीचा परिणाम राष्ट्राच्या जीवनावर होतो. तसेच सर्वसत्ताधारी पक्षाचे आहे. पक्षाचा मूड पक्षांतर्गत राग, लोभ, पक्षाचे पूर्वग्रह, पक्षाची प्रकृती आणि प्रवृत्ती या सर्वांचाच आमच्याही जीवनावर परिणाम होतो. म्हणून या सर्व गोष्टीची काळजीपूर्वक दखल घ्यायलाच हवी. म्हणून पक्ष फुटायला आला तर सर्वांना कळण्यासाठी बोंब ठोकायलाच हवी.

आणि राज्यसभेच्या निवडणुकीत काँग्रेसमध्ये फूट पडलीच नव्हती असे कोण म्हणेल? जी मते फुटली त्यानी चुणूक दाखवली, 'बघा, आमच्या गाऱ्हाण्याकडे

आधी लक्ष द्या. नाहीतर विधानपरिषदेच्या निवडणुकीत बघून घेऊ.' या फुटलेल्या मतांचा कसून शोध करून त्यांना दादा-पुता करून गप बसविण्यात आले. विधानपरिषद निवडणुकीच्या वेळी त्याच्याच उमेदवारांना उभे करण्यात आले. पाच-सात टाके घालून जखम शिवून टाकण्यात आली. विधानपरिषदेत काँग्रेसचे सातही उमेदवार कसेबसे निवडून आले. तरी पहिल्या फेरीत पाचच उमेदवार आले. शेवटच्या फेरीपर्यंत सगळे आले. म्हणजे आठ-दहा मते फुटली होतीच. पण सगळे निवडून आले ना? झाले.

आता आठ–दहा मत फुटली होतीच. हे कोणी नाकबूल करणार नाही. पण विधानसभेतील काँग्रेसच्या १७० मतांपुढे आठ–दहा ही अगदी किरकोळ सख्या. म्हणजे किरकोळ मतं फुटली पण महाराष्ट्र काँग्रेस अजून आहे तशीच आहे. एकसंध.

महाराष्ट्र काँग्रेस एकसंध आहे. बाकीच्या पक्षाविषयी काय बोलावे! जनसंघाचे जोर बैठका मारणे चालू आहे. बहात्तरमध्ये महाराष्ट्रातून कमीत कमी एक तरी लोकसभेची जागा जिंकण्याची त्याची तयारी चालू आहे आणि विधानसभेत सध्याच्या दुप्पट. विधानपरिषदेच्या निवडणुकामध्ये जनसंघाचे मोतीराम लहाने निवडून आले. जुन्या काँग्रेसच्या पाठिंब्यावर. अर्थात सत्ताधारी काँग्रेसमधील फाटा-


मानवाचा जागतिक विक्रम
आयुर्वेदाचा जंगी पराक्रम।
कितीही झाला अतिसार
"मस्कीनॉल"ने होई पसार।

"मस्कीनॉल"

आमांश (पोटात कळ अगर मुरडा होऊन शौचास होणे) रक्तातिसार (शौचातून रक्त पडणे) हगवण, जुलाब, उलटी, कॉलेरा यांवर वनस्पतीचे अनुभवसिद्ध प्रभावी औषध

**मस्कीन फार्मा, मुंबई नं. ७**

फुटीच्या गडबडीमुळे श्री. लहाने याचे फावले. पण बिचाऱ्या जुन्या कांग्रेसचा एकही उमेदवार आला नाही. ते खूप उडया मारत होते. सत्ता–कांग्रेसचे दोन तरी उमेदवार पडतील म्हणून. पण यावेळी मात्र त्याची निराशा झाली.

समितीचे दोघे उमेदवार व्यवस्थित निवडून आले. प्रजा समाजवाद्यांचे माधव लिमये मात्र बिचारे पडले. चागले गृहस्थ होते म्हणतात. रिपब्लिकन पक्षाचे गवई काँग्रेसच्या पाठिंब्यावर आले. रिपब्लिकन पक्षात तर खूपच भांडण. डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे चिरजीव भैय्यासाहेब आंबेडकर याच म्हणणं रिपब्लिकन पक्षाचा खरा उमेदवार मीच. तर गवई म्हणतात मीच तो. काँग्रेसवाल्यांची पंचाईत. रिपब्लिकनांमध्ये ही हाणामारी ! शेवटी आंबेडकरानी पक्षाचा राजीनामा दिला आणि आपली स्वतत्र उमेदवारी घोषित केली. त्याना एकही मत मिळालं नाही ही गोष्ट अलाहिदा.

आता पक्षोपपक्षांच्या गोष्टी निघाल्या म्हणून नव्या मुंबई काँग्रेसची गोष्ट थोडीशी सांगण्यासारखी आहे. भयकर मारामारी. जुन्या मुंबई काँग्रेसने हाकून दिलेले सगळे 'कचरा' लोक इकडे येऊन बसलेले. (हे एका नव्या मुंबई काँग्रेसच्या नेत्याचेच उद्गार बर !) आपल अस्तित्व टिकविण्यासाठी त्याना स्वीकारण्याशिवाय नव्या मुंबई काँग्रेसला गत्यतरच नाही. त्यामुळे सगळ्या कामाचा भार मात्र थोडे फार जे सिन्सिअर कार्यकर्ते तत्वासाठी इकडे आले आहेत त्याच्यावर पडतो. मग भांडणं. ऑफिससाठी जागा गिरगावात घ्यावी की दादरला यासाठी लढाई. ऑफिसला भेट द्यायला चीफ मिनिस्टर आले तेव्हा (फोटोसाठी) आम्हाला का नाही बोलावलं म्हणून बोबाबोंब. म्हणजे कामाच्या वेळी गैरहजर राहण्याची सवलत हवी आणि चीफ मिनिस्टर बरोबर फोटो काढून घेण्याचा हक्क ! अशी सगळी मजा मजा चालू आहे. झाल आहे काय की मूळच्या कांग्रेसपक्षाची सर्व जबरदस्त सघटना जशी नव्या महाराष्ट्र काँग्रेसबरोबर आली तस मुंबई काँग्रेसचं झालं नाही. सगळी सघटना जुन्या मुंबई काँग्रेसकडे राहिली आणि जगू अगावरच्या वस्त्रानिशी नवी काँग्रेस बाहेर पडली. म्हणून ही सगळी गमत. सघटनेच्या दृष्टीने, डावपेचाच्या दृष्टीने जुनी मुंबई काँग्रेस कशी तयार आहे हे नव्याने सांगण्याची गरज नाही. ती श्री. स. का. पाटलाची सघटना आहे. महापालिकेच्या सर्व अतर्गत निवडणुकांमध्ये या जुन्या मुंबई काँग्रसने आपले डावपेच, कौशल्य आणि चतुराई पणाला लावली होती.

आणखी एका पक्षाविषयीच पण थोड विषयातर करून. महाराष्ट्राचे सध्याचे पोलादी पुरुष श्री. बाळासाहेब देसाई, महसूलमत्री आणि विधानमडळ काँग्रेस पक्षाचे उपनेते, यानी परवा विधानसभेत गर्जना केली की नक्षलवाद्यानो, तुम्हाला या राज्यात थारा नाही. भूमिहीनाचे सर्व प्रश्न सोडविण्यास आम्ही समर्थ आहोत.

श्री. देसाई याच्या गर्जनेने नक्षलवादी कदाचित सीमेवरून परत जातीलही. पण तरी महाराष्ट्रातले डावे कम्युनिस्ट सध्या कोणत्या उद्योगात आहेत हे बघितले पाहिजे. या महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची

महाराष्ट्र शाखा वर्धा जिल्ह्यात एक किसान परिषद घेणार असून या परिषदेला देशातले बडेबडे मार्क्सवादी कम्युनिस्ट नेते हजर राहणार आहेत. परिषदेचा अजेंडा आहे भूमिहीन किसान. भूमिहीन किसानाच्या सर्व प्रश्नांवर या परिषदेत चर्चा होईल तसेच भूमिहीन आदिवासींचे प्रश्नही चर्चिले जातील.

भूमिहीन आदिवासींच्या जगली जमिनीवरील अतिक्रमणाचा मोठाच तीव्र प्रश्न सध्या ठाणे जिल्ह्यात आणि इतरत्रही निर्माण झाला आहे. आतापर्यंत या भूमिहीन आदिवासींनी हजारो एकर जगल जमीन ताब्यात घेऊन शेतीसाठी ती लागवडी-खाली आणली आहे. आतापर्यंत महाराष्ट्र सरकारने यापैकी बऱ्याचशा जमिनी या आदिवासींना देऊन टाकल्या. पण हे असे किती दिवस चालणार? आता सरकारने कडक धोरण स्वीकारून हे अतिक्रमण थांबविण्यासाठी जोरदार उपाय-योजना सुरू केली आहे. यापुढे आदिवासींना जगल जमिनीवर अतिक्रमण करणे कठीण जाईल. महाराष्ट्राचे जंगल मंत्री श्री. नाशिकराव तिरपुडे यांनी असा धोक्याचा इषारा दिला आहे की महाराष्ट्रात जंगल जमीन फक्त २१ टक्के उरली आहे. आणि ती आणखी कमी होत आहे. यापुढे जंगल जमिनीवर आदिवासींना अतिक्रमण करू देणे किंवा जंगलाखालची अधिक जमीन काढून ती शेतीसाठी वाटून देणे हे धोक्याचे आहे.

हाच विषय वर्ध्याच्या किसान परिषदेत चर्चिला जाणार आहे. अधिक जंगल जमिनी आदिवासींना आणि भूमिहीन किसानांनी ताब्यात कशा मिळवायच्या, ज्या आतापर्यंत अतिक्रमणे करून ताब्यात घेतल्या आहेत त्या टिकवायच्या कशा आणि प्रसंग पडल्यास त्या टिकविण्यासाठी पोलिसांशी गनिमी लढे कसे द्यायचे याची चर्चा या शिबिरात होणार आहे.

देशातील बेकार, भूमिहीन शेतमजूर आणि भूमिहीन आदिवासी हे मोठे स्फोटक द्रव्य आहे. त्यांना हाताशी धरून कार्य करता येते हे बगालमध्ये दिसून आले. महाराष्ट्रात ही चळवळ ठाणे आणि वर्धा जिल्ह्यात मूळ धरीत नाही ना?

— वार्ताहर

## पूर्व लाल आहे!

२६ एप्रिलच्या रविवारी सारा भारत भितीयुक्त आश्चर्याने दिङमूढ झाला असल्यास नवल नाही! चीनचा कृत्रिम उपग्रह अवकाशात परिभ्रमण करू लागला ही बातमी खरे तर सबध जगालाच धक्का देणारी होती. 'पूर्व लाल आहे' म्हणत परिभ्रमण करणारा हा चिनी-उपग्रह पाहून 'श्वेत-पश्चिमेला' धक्का बसला असणार. आशियातून चिनी वर्चस्व उखडून, ब्रिटन-अमेरिकेने निर्माण

केलेली पोकळी भरून काढण्याचा चग बाधलेल्या रशियासमोर ह्या कृत्रिम उपग्रहाने निश्चितच प्रश्नचिन्ह निर्माण केले असणार! लालचीनने संपादलेले हे यश, भारत आणि इतर सारे जग ह्यांना धक्का देणारे, विचार करायला लावणारे असले तरी चीनच्या राजकीय, आर्थिक परिस्थितीच्या दृष्टीने विचार करता, त्या राष्ट्राच्या दृष्टिकोनातून ते निश्चितच स्पृहणीय आहे. भारताच्या जवळजवळ दीडपट लोकसख्या, दरडोई उत्पन्नाचे आकडे भारतातल्या आकड्यांशी जुळतेमिळते अशा परिस्थितीत अण्वस्त्रे, कृत्रिम उपग्रह इत्यादी लालचीनची प्रगती त्या राष्ट्राच्या निर्धाराची प्रतीकेच मानली पाहिजेत. चीन हे भारताचे शत्रूराष्ट्र निश्चित आहे. ह्या निर्धारित सामर्थ्यदर्शक पावलामागची प्रेरणात्मक महत्त्वाकांक्षा कदाचित भारताला धोकादायकही असू शकेल. तरीही प्रतिकूल परिस्थितीत चीनने जे हे यश संपादले आहे, ते निश्चितच अभिनंदनीयच आहे! नि त्याचबरोबर हे यश, भारताने अतर्मुख होऊन विचार करण्याजोगेही आहे. चीनने सपादलेले हे यश सर्वस्वी चिनी आहे, त्यात परकीय मदतीचा यत्किंचितही हात नाही. त्याचप्रमाणे, परिस्थिती प्रतिकूल असतानाही चीनच्या आण्विक, अतराळीय प्रगतीमुळे तेथील राष्ट्रीय उत्पन्नात घट झाल्याचे लडनच्या प्रथितयश अर्थज्ञाना अजिबात दिसले नाही. लहान सहान बाबीवरही हजारो रुपयाचा चुराडा करून रशियन, अमेरिकन आदि तंत्रज्ञाना वेळोवेळी बोलावणाऱ्या भारतीय शासनाने ह्या गोष्टीचा आधी गंभीरपणे विचार करावा, व मगच आण्विक व अतराळीय सशोधनावरील पुढील कार्यक्रम आखावा! परवा ससदेत ह्या विषयावर वादळी चर्चा झाली खरी, पण हा विधायक दृष्टिकोन कुणीच माडला नाही—ना शासनाने, ना विरोधकानी!

चीनचा हा प्रयोग निव्वळ शांततापूर्ण अतराळ—सशोधनासाठी अर्थातच नव्हता! ते एक त्यांच्या सामर्थ्याची चुणूक दाखवणारे प्रात्यक्षिक होते. चीनचे हे पहिले अतराळयान, ते अवकाशात उडवण्यासाठी वापरलेला अग्निबाण, हे दोन्ही, तुलनेने रशियाच्या पहिल्या स्पुटनिकपेक्षा किंवा अमेरिकेच्या पहिल्या अवकाशयानापेक्षा अधिक सामर्थ्यशाली होते. ह्याच तपशीलानी आणखीही एक गोष्ट सिद्ध केली आहे. आतरखंड क्षेपकाच्या बाबतीतही चीन आज परिपूर्ण आहे. लडनच्या इन्स्टिटयूट ऑफ स्ट्रॅटेजिक स्टडीजने ह्या सबंधात प्रसिद्ध केलेली आकडेवारी ह्या दृष्टीने उद्बोधक ठरावी. ह्या सस्थेने प्रसिद्ध केलेल्या माहितीनुसार, ह्या मे अखेर चीन आतरखड क्षेपणास्त्राची चाचणी घेईल. चीनजवळ २० किलो टन शक्तीचे १०० हून अधिक अणुबाँब तयार करता येतील एवढा प्रचड स्फोटक पदार्थाचा साठा आहे. ह्या दृष्टीने आवश्यक असा युरेनियम अलग करण्यासाठी अत्यत अवघड परतु सर्वात काटकसरीची योजना गॅस सेंट्रिफ्यूज—सिस्टिम—आज जगात केवळ चीनच अवलबीत आहे. ह्या संस्थेच्या व अन्य अभ्यासकाच्या मताप्रमाणे, अण्वस्त्रे व अवकाश-सशोधन, ह्या दोन्ही बाबतीत चीन, निदान ह्या घटकेला तरी भारताच्या

सुमारे दहा वर्षे आघाडीवर आहे. आणि येत्या दहा वर्षात चीन सर्वार्थाने बलाढ्य ताकद म्हणून वावरण्याची शक्यता आज अमेरिकन्सही नाकारत नाहीत. असा बलाढ्य शेजारी, तोही प्रच्छन्न शत्रूच्या स्वरूपात–हे आज भारताला, भारताच्या नेतृत्वाला आणि लोकशाहीप्रधान व्यवस्थेला आव्हान आहे.

चिनी सामर्थ्य प्रदर्शनाबाबत लोकसभेत चिंता व्यक्त केली गेली. चीनचे अभिनंदन करू इच्छिणाऱ्यावर कडाडून हल्ले चढवले गेले; पण, भारताला देण्यात आलेल्या आव्हानाबाबत, ते स्वीकारण्याबाबत मात्र कसलेही आश्वासन लोकसभा देशाला देऊ शकली नाही. ज्या राष्ट्राचे राष्ट्रीय उत्पन्न १७०० कोटी डॉलर्सपर्यंत असते ते राष्ट्र अण्वस्त्रसज्ज होऊ शकते असे सर्वमान्य मत आहे. भारताचे राष्ट्रीय उत्पन्न आज ४००० कोटी डॉलर्स आहे. चीनचेही जवळजवळ तेवढेच आहे. असे असता चीन अधिक प्रगती गाठू शकतो हे खरे प्रश्नचिन्ह आहे. परंतु हे प्रश्नचिन्ह सोडवण्याचे प्रामाणिक प्रयत्नच आज दिसत नाही. तात्त्विक उहापोहाची भेंडोळी, 'शांति–शांति'चे जप ह्यातच आम्ही प्रतिष्ठा मानतो. परंतु प्रचंड सामर्थ्याच्या जोरावर होणाऱ्या अमेरिका–रशियाच्या शांततापाठांचीच फक्त जगात दाद घेतली जाते हे मात्र सोयिस्करपणे विसरले जाते.

ह्या विसरण्यामुळेच 'पूर्व लाल' करण्याचे चीनचे स्वप्न साकार व्हायची शक्यता निर्माण होणार आहे !

—सु. ल. सोमण


महाराष्ट्र शासन पुरस्कार लाभलेले
आमचे एक गौरवास्पद प्रकाशन

## व्होल्गा जेव्हा लाल होते

वि. स. वाळिंबे

अठरा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

विजय तेंडुलकर

# प्रवास

एखादी रात्र अशीही येते.

आपण दूरच्या प्रवासासाठी रात्रीच्या गाडीत चढतो. फर्स्ट क्लासचा डबा. दोनच माणसाचा 'कुपे'. पैकी दुसरा माणूस लोअर बर्थवर आधीच बसलेला, एकटाच. मध्यमवयस्क. केस आणि दाढीचे खुट पिकलेला. जरासा स्थूल. थकल्या देहामनाचा. मुक्या, निस्तेज डोळ्याचा. आपले रिझर्वेशन बाहेरच्या नावात पडताळून घेताना बरोबरीचे नावदेखील आपण पाहून घेतलेले. कोणी कुळकर्णी.

आपण उत्सुकतेने पहातो. तो उलट आपल्याला पहातो. बारा तासाचा प्रवास. त्यात एक सपूर्ण रात्र. दोनच माणसे.

सस्पेन्स.

प्रवास कसा होईल ?

आपल्या मनात प्रश्न. त्याच्याही मनात तो असणारच.

आर यू मिस्टर कुळकर्णी ? आपण उगीच म्हणजे उगीचच इंग्रजीत विचारून आपली बर्थ इथेच ना याची खातरजमा करू पहातो.

येस साहेब, येस. तो कळत नकळत मर्यादशीलपणे बर्थवर बाजूला सरकतो.

मला वाटते, ही लोअर बर्थ माझी आहे – आपण जाणीव देतो.

ती जाणीव पुरती मिळण्याआत तो अर्धवट उठत म्हणतो, होय ना साहेब. आपण बसू शकता. आपलीच आहे बर्थ.

आपण एका हक्काने बसतो. जणू ती बर्थ आपण विकतच घेतली आहे.
बसा. आपण मालकाच्या औदार्याने त्याला परवानगी देतो.
तो आदबीनेच बसतो.
आपण सामान हमालाने व्यवस्थित रचले आहे ना, पहातो. मग ओघाने त्याच्या सामानावर नजर टाकतो. एक गोणपाटाची फुगली पिशवी. एक ब्रीफ केस; जुनी, प्लास्टिकची. एक चादर. बस्स. यापलीकडे काही दिसत नाही.
आपण प्रशस्तपणे फर्स्ट क्लासचा उपभोग घेत जरा बसतो. खाली गादी, मागे गादी, वर पंखा.
तो त्याच्याच कसल्यातरी विचारात असावा तसा बसतो – पलीकडे, जरा अंतर टाकून.
आपण स्तब्ध.
तो स्तब्ध.
प्लॅटफॉर्मवर प्रवाश्याची, फेरीवाल्याची वर्दळ.
मग तो एकदा प्लॅटफॉर्मवर निघून जातो. का कुणास ठाऊक.
मग परत येतो.
पुन्हा एकमेकांकडे दृष्टिक्षेप.
तो बसतो. तो स्तब्ध.
आपण स्तब्ध.
सस्पेन्स. संपूर्ण रात्रीचे काय ? तब्बल बारा तासाचे काय ? दोनच माणसे.
कुठे जाणार ?– आपण.
मी ? जळगावला साहेब. – तो.
जळगाव कधी येते ?
पहाटे साडेपाचला येते.
आपण मनाशी म्हणतो, म्हणजे पहाटेनंतर एकटे. कदाचित तोवरही एकटेच. हा तर विशेष बोलत नाही. तसा वेधकदेखील नाही. थर्ड क्लासात शोभला असता.
गाडी एक्झॅक्टली कितीला सुटते ? आपण मग काहीतरी बोलायचे म्हणून.
गाडी ना ? एक्झॅक्ट एकवीस तीसला साहेब. डिपार्चर टाइम. – तो सांगतो.
पत्ता लागतो. रेल्वेत असणार.
रेल्वेत असता ?– न रहावून आपण.
होय, साहेब. तो खाते सांगतो.
कुठे, मुंबईत असता ?
नाही. फिरतीचे काम आहे. मुंबईत दोन दिवसासाठी होतो. आता आज चाललो.
स्तब्धता.
तो पुन्हा कसल्यातरी विचारात.

मग तो एकदा बाथरूमला जाऊन येतो.

परत विचारात बसावा तसा बसतो.

गाडी सुटते.

तो उठतो. दोन्ही बाजूंची दारे वरचे खालचे अडसर घालून पक्की बंद करतो.

मग मळकी पँट काढतो. आत नाइट लेंगा असतो.

पँटची व्यवस्थित घडी घालून चादरीच्या उशाला ठेवतो – अपर बर्थवर.

एक विचारले तर राग येणार नाही ना साहेब ? – तो. म्हणजे तुम्ही तेच, लेखक का ? वाटले म्हणून विचारले –

हूं. – तुम्ही.

नाव वाचले रिझर्वेशन शीटवर तेव्हाच ओळखले होते. आज चांगला योग आहे. आपली ओळख व्हायची होती. त्याच्या स्वरात फारच आदब. सहन न व्हावी इतकी.

आपण काही वाचले नाही साहेब तुमचे, वाचायला वेळच नसतो बघा. पण नाव वाचलेय. आमच्या 'घरी' गोष्टीबिष्टी वाचतात. त्यानी वाचले असेल तुमचे. त्या सागू शकतील, बघा.

तो उशाच्या तुमानीच्या घडीवर ब्रीफ केस रचतो. हाताने दडपून ती उशीसारखी सपाट करतो.

फार बरे झाले, ओळख झाली. त्याची आदब कायम असते.

आपण खुडकलेलो असतो. इतकी आदब का ?

मग खालच्या बर्थवर पाय न टेकण्याची काळजी घेऊन तो वरच्या बर्थवर जातो. बसून रहातो.

आपण लोअर बर्थवर बेडिंग पसरतो. एक नेव्हिल शूट झोपताना वाचण्यासाठी घेतो. सिग्रेटचे पाकीट. लायटर. चष्मा. मग कपडे बदलतो. टूथपेस्ट ब्रश काढून ठेवतो.

नाइट लँप लावतो.

गाडीने वेग घेतलेला असतो.

दादर जाते.

एकसुरी खडखड.

सहज वरच्या बर्थवर ओझरती नजर जाते.

तो बसून सकाळचा चुरगळला पेपर उलगडून वाचत असतो.

आणखी खडखड. लोकल स्टेशने मागे पडतात.

आता तो नुसताच बसून असतो. कसल्या तरी विचारात.

नेव्हिल शूटची पाने आपण यांत्रिकपणे उलटत असतो.

गाडी धावत असते.

# आपला पैसा सूज्ञपणे खर्च करा अन् हयातभर निश्चिंत व्हा !



**फक्त २० गोणी ए सी सी सिमेंटनं तुम्ही आपल्या शेतीवाडीस पुढीलपैकी कोणतीही कायम स्वरूपाची सुधारणा करू शकाल**


★ सहा गव्हाणीसह गुरांसाठी
५ मीटर × ३ मीटर लांबीरुंदीचा कोबा

★ सभोवताली ५ मीटरचा चौरस
ओटा असलेला ३ मीटर × १ मीटरचा
पाण्याचा हौद

★ खतासाठी ३ मीटर × २.५ मीटरचे
चार खड्डे



★ गव्हाणी आणि गटारासह
३ मीटर × ३ मीटरचा गोठा





★ कुंपणासाठी प्रीकास्ट
काँक्रीटचे १३५ खांब



★ विहिरीस १.५ मीटर
रुंदीचा ओटा

सिमेंटची बांधकामे अधिक टिकाऊ, अधिक आरोग्यप्रद असतात, ती सहज स्वच्छ करता येतात. आपली बांधकामे ए सी सी सिमेंटने करा. गेल्या ५० हून अधिक वर्षापासून ए सी सी सर्वोत्कृष्ट दर्जाचे सिमेंट तयार करीत आली आहे.

तुम्हाला लागणारे सिमेंट तुमच्या नजीकच्या ए सी सी स्टॉकिस्टकडून किंवा दि सिमेंट मार्केटिंग कंपनी ऑफ इंडिया लिमिटेड, १२१, महर्षि कर्वे रोड, मुंबई-२०, यांच्याकडून खरेदी करा.

दि काँक्रीट असोसिएशन ऑफ इंडिया, १२१ महर्षि कर्वे रोड, मुंबई-२० यांच्याकडून तुम्हाला तांत्रिक साह्य विनामूल्य मिळू शकेल.

दि असोसिएटेड सिमेंट कंपनीज लिमिटेड
दि सिमेंट मार्केटिंग कंपनी ऑफ इंडिया लिमिटेड

**ACC**
**किसानांचा साथी**

CHI-9656 A

काही वेळाने दिवसभराचा शीण पापण्यांवर दाटून येऊ लागतो. एकांत अंगा-वर येतो. नेव्हिल शूट नको वाटतो. पुस्तक आपोआप बंद होते. चष्मा डोळ्यांवरून उतरतो. नाइट–लँप घालवून होतो.

तो वरच्या बर्थवर आडवळतो.

हवा तर लाइट घालवलात तरी चालेल–आपण बर्थवर पाय ताणीत.

नाही साहेब, तुम्हाला हवा तर असला तरी चालेल तो. मला त्याचा त्रास नाही.

झोपणार असाल ना ?–आपण.

नाही. झोप नाही येत–तो.

आपणच वरचा लाइट घालवतो. आता केवळ एक निळा नाइट लाईट. गाडीची अखंडित खडखड...बाहेर काळोख पळत असतो. मध्येच कवडसे धावत जातात.

आपणही आडवळतो.

झोपलात वाटते ?–काही वेळाने वरची बर्थ. झोपा.

नाही, जागा आहे. का ?–खालची बर्थ.

काही नाही साहेब, झोपा तुम्ही.

तुम्ही नाही झोपत ?

झोपेन, झोप येईल तेव्हा–वरची बर्थ.

बाहेर गाडी धावत असते; मध्येच मोठा आवाज करते.

कुटुंब कुठे असते तुमचे ?–आपण; झोप येईस्तोवर तोंडाला चाळा म्हणून.

जळगावला, साहेब.

मुले किती ?

पाच. दोन मुली नि तीन मुलगे.

आपल्या मनात उगीच येऊन जाते, दो या तीन बस्स्...दो या तीन बस्स...

कुळकर्णी, तुम्ही इतकी गावे फिरता, तुम्हाला आवडते कुठले गाव ?–आपण, चाळा म्हणूनच.

आपल्याला त्यात काय कळते साहेब, आम्ही मामुली माणसे. आमच्या आवडीत काय आहे ? पण उणीपुरी तीस वर्षे गावे फिरतो आहे त्यात जळगाव आवडते. आता तिथे तशी काही निसर्गसृष्टी वगैरे नाही, उष्णताही फार असते, मुंबई-पुण्याच्या तुलनेने तर जळगाव अगदी गावढे; पण जळगाव चागले वाटते एवढे खरे.

आपण मनाशी म्हणतो, कारण कुळकर्णी, तिथे तुमचे घर आहे...

कुळकर्णी मुंबई पुण्याच्या तुलनेने जळगाव का चागले वाटते त्याची त्यांच्या मते थोडी कारणमीमासा करण्याचा प्रयत्न करतात.

तीस वर्षे रेल्वेत नोकरी झाली तुमची ?– आपण. हाही चाळाच.

होय साहेब.

जळगावला घरबीर बाधलेत की नाही ?–आपला प्रश्न. काहीसा वक्र.

वरच्या बर्थकडून शब्द येतात, नाही. इच्छा होती. एक हक्काचे छोटे घर असावे. आता ती सोडून दिलीय; साहेब. ते शक्य नाही आता.

का हो ?

गाडीची खडखड. वाढते, पुन्हा कमी होते.

वरची बर्थ म्हणते, शक्य नाही ते उगीच कशाला हवे तरी म्हणायचे. एक सुस्कारा.

आपण स्तब्ध.

कुळकर्णीच बोलू लागतात. एकदा रेल्वेत नोकरीला लागलो, त्यानंतर इतकी वर्षे तेवढेच केले. दुसरे काही मनावर घेतले नाही, जमलेसुद्धा नसते बहुतेक. या नोकऱ्या साहेब, अशा असतात की त्यात माणूस जाऊन बसला ना, की रुतूच लागतो. शेवटी गळ्यापर्यंत रुततो. डोळ्याला त्याच त्या कामाची झापडे चढतात. दुसरे काही दिसू शकत नाही, सुचत नाही. इतर सगळ्याला पार निरुपयोगी होऊन जातो माणूस. गंजून जातो. मेंदूचे कामच फारसे नसते ना आमच्या कामात. शरीर-कष्टाची हमाली असते तशी आमची बसल्या जागची हमाली. पण हमालीच, साहेब दुसरे काय. वर्षामागून वर्षे तीच.

रिटायर कधी होणार तुम्ही, कुळकर्णी ?–खालची बर्थ.

कधीही–वरची बर्थ. म्हणजे पूर्वी रिटायरमेंटचे वय होते बघा पंचावन्न. अलीकडे केले अठ्ठावन्न. म्हटले, तेवढीच तीन वर्षे जास्त मिळतील. पण स्टाफ कमी करण्याचा प्रश्न आला की पंचावन्नवाल्यांवर नेमकी धाड पडते. त्याना रिटायर व्हायला लावतात.

तुमचे वय किती ?

पंचावन्न. त्यात साहेब आता नवा रूल येतो आहे. सर्व्हिसची तीस वर्षे किंवा वयाची अठ्ठावन्न वर्षे यातले काहीही रिटायरमेंटसाठी चालणार.

तुमची सर्व्हिसची वर्षे किती ?

तीस पूर्ण. एक मोठा उसासा. आता एकेक दिवस मोजायचा, झाले.

पण कुळकर्णी, इतकी वर्षे डोळ्याला झापडे लावून बसल्या जागची तुमची हमाली करीत गावोगाव फिरलात. आयुष्य गेले. मेंदू गजला. आता घ्या की सुटका होते आहे तर करून. मिळेल तो फंड, पेन्शन काय ते घेऊन जरा कुटुंबात राहून जगा समाधानाने.—ही खालची बर्थ.

वर जरा स्तब्धता.

बाहेर गाडी रूळ बदलते.

होय, साहेब – इतकी वर्षे तेच मनात धरले आणि रखडपट्टीत एकेक दिवस ढकलला. पूर्वी आमचा प्रॉव्हिडंट फंड जमे तेवढी रेल्वेची काँट्रिब्युशन घालून रिटायर होताना आम्हाला फंड मिळायचा. ते हिशोब करीत असू आम्ही. रिटायर

होताना पंधरा एक हजार हाती येतील अशी तेव्हांची कल्पना आणि रुपयाच्या तेव्हांच्या किंमतीने सगळे हिशोब. आता साहेब नव्या रूलप्रमाणे पेन्शन पद्धत आली. फंडात रेल्वेची कॉंट्रिब्युशन आता नाही. रिटायर होताना सात एक हजार हाती येणार. सात हजारात हजारभर देणीच जातील. मोठी मुलगी लग्नाला आली आहे, लग्न म्हटले की पाच बोटे तर उघडलीच पाहिजेत. म्हणजे उरला किती ? एक हजार. त्यात तीन मुले, बायको आणि मी. त्यातच दुसऱ्या मुलीचे लग्न येईल दोनतीन वर्षात.

पण मोठा मुलगा असेल ना तुम्हाला ?

तो नोकरीला लागला आहे एस. एस. सी. होऊन. त्याला त्याच्या आणि त्याच्या बायकोपुरतेच जेमतेम मिळते, साहेब. पुन्हा त्याला मुले होतील. त्याच्या स्वत च्या हौसामौजा तरी कुठे भागवता येतात त्याला ? तो मात्र म्हणतोच, तुम्हाला रेल्वेचे पास मिळतात, पण तुम्ही आम्हाला काही सुद्धा दाखवले नाहीत. आता तो मिळवता झाल्यामुळे माझ्या पासात अलाउड नाही. मुलगी बऱ्या घरी पडली तर चार मनाजोगत्या गोष्टी मिळतील तिला नाही तर तीसुद्धा हेच म्हणणार, बाबानी आम्हाला काही दाखवले नाही, दिले नाही.

पण कुळकर्णी, हा तुम्ही अन्याय केलात. पास मिळत होते तर का नाही दाखवलीत कुटुंबाला चार प्रेक्षणीय स्थळे ? अ ? खालची बर्थ सुखासीनपणे.

एकदाच गेलो होतो. मथुरा वृंदावन केले. प्रवासखर्च वाचला खरा पण इतर खर्च इतका बसला की नाकात दम आला. काही वेळा त्या प्रवासात मुलासकट आम्ही टरबुजे खाऊन राहिलो, जेवणखर्च वाचवण्याकरता – खूप हाल झाले सर्वांचे – जिथे तिथे पैशाचेच काम – पुन्हा म्हणून कुटुंबाला प्रवासाला बाहेर काढले नाही – वरच्या बर्थवरून शब्द. तुम्हीच सांगा साहेब, दुसरे काय करणार ?

खालची बर्थ स्तब्ध.

हजारभर रुपयात आणि तुटपुंज्या पेन्शनीत पाच माणसाचा गाडा रेटायचा कसा...हाच विचार हल्ली करीत असतो. असलेले काम संपणार, दुसरे काही करण्याची अक्कल देवाने दिली नाही. श्रमाची सवय नाही. महागाई तर वाढतेच आहे...नोकरीच्या तीस वर्षात हक्काचे एक घरसुद्धा हातून झाले नाही... पोरे दोष देतात, बापाने काही दिले नाही म्हणून. बाकी त्याचे तरी काय चुकले ? आपल्याकडे काय उत्तर आहे, साहेब ? काही नाही. जन्माला आला, वाढला, पाच पोरे...आणि...अशी गमत आहे सगळी.

वर एक विषण्ण हास्य आणि अतिशय स्तब्धता.

आत कुठे तरी कुळकर्ण्यांविषयी एक चीड येते. आपण विचारतो, कुळकर्णी, एका प्रश्नाचे उत्तर द्या.

देतो, साहेब.

रेल्वेच्या या फिरतीच्या नोकरीत पैसे खाण्याची संधीच आली नाही तीस वर्षात ?

किंचित स्तब्धता.

आली. नाही कसे म्हणू ? खायचे नाहीत असाही कांही आग्रह नव्हता; एक दोनदा तर चांगलीच संधी होती.

मग ?

जमले नाही, साहेब. खायचे म्हटले की छातीच धडधडायची. एकदाच दहा रुपये घेतले आणि महिनाभर झोप नव्हती. सारखे एकच दिसायचे, उघडकीला आले आहे. छी: थू: होते आहे. तोंडावर थुकताहेत. फार त्रास झाला आणि मग हिंमतच उरली नाही. पण खाल्ले नाहीत याचाही त्रास व्हायचा. चालून आलेले लाथाडले म्हणून मन तिकडून खात रहायचे. दोन्हीकडून त्रासच. आता कसलाच त्रास नाही होत. वाटते, गेलेच आयुष्य. आता विचार तरी कशाला ? जे झाले ते झाले, जे होईल ते होईल... परमेश्वरावरच भार आहे आपला...

वराच वेळ गाडी अर्थहीनपणे खडखडत असते. त्यात झोप केव्हा लागते कळत नाही. पहाटे जाग येते आणि कुळकर्णी चादर पिशवीत भरीत असतात. त्यानी पँट चढवलेली असते.

किती वाजले ?— आपण

पावणेसहा, साहेब — तीच रात्रीची आदब. जळगाव अर्धा तास लेट आहे साहेब आज.

कुळकर्ण्यांची वरच्या बर्थवर डोके दिसेनासे झालेली स्थूल, विसविशीत, मळकी आकृती खालच्या बर्थवरच्या आपणाला आता विलक्षण दयनीय आणि हृदयस्पर्शी वाटते. पण कुळकर्ण्यांचे सांत्वन कसे अणि कशाबद्दल करावे तेच समजत नाही. केवळ फार चार चौघासारख्या आणि सर्वसामान्य आयुष्याबद्दल ? ज्यात फार मोठा पराक्रम नसेल, पण एकादी मोठी शोकात्मिकाही नाही. कसला भयकर आघात नाही की घात नाही की अपघात नाही असे एक अतिशय सरळ रेषेतले सपाट, दुर्मिळ आयुष्य... तरी विलक्षण दयनीय... एका सरळ आयुष्यानेच पुरती कोंडी केलेला माणूस, कुळकर्णी...

जळगाव येते. कुळकर्णी निरोप घेतात. जळगावला आलात तर या, ते पत्ता पुन: पुन्हा सागून आर्जवाने म्हणतात. 'घरी' बरे वाटेल— त्याचे ठरीव वाक्य.—एरवी आमच्यासारख्यांकडे कोण येते ? — त्यांचे वाक्य.

कुळकर्णी उतरून जातात आणि एकदम कसे हलके हलकेच वाटते.

कुळकर्णी : कोणत्याही लेखकाला कधीही भेटू नये असा खराखुरा सामान्य माणूस. ज्याच्यासाठी हसण्याला जागा नाही, रडण्याचीही संधी नाही...

हसण्या रडण्यामधला एक अर्थहीन, कोरडा, रिता उमासा. बस्स... एक रिता उमासा...

□ □ □

# विचार धारे

समीर

## ¤ जपानचे परराष्ट्रीय धोरण

जपानचे परराष्ट्रीय धोरण या विषयावर दिल्लीत अधिकृत असे फारसे ऐकायला मिळत नाही. पण काही दिवसपूर्वी ही उणीव अल्पांशाने का होऊन. पण भरून निघाली. जपानचे भारतातील वकील ड्यामा यानी आपल्या देशाच्या परराष्ट्रीय धोरणावर नुकत्याच केलेल्या भाषणात माडलेले काही प्रमुख मुद्दे असे :

जपानच्या उत्तरेला असणारा काही प्रदेश वास्तविक जपानचा असूनही तो रशियाच्या ताब्यात आहे. आतरराष्ट्रीय सलोखा वाढविण्यासाठी रशियाने हा प्रदेश जपानला परत देणे अगत्याचे आहे. हा प्रदेश मिळविण्यासाठी जपान चिकाटीने पण शांततापूर्वक प्रयत्न करीत राहील. जपानने अनेक देशाशी मैत्री सपादन करण्यासाठी त्याच्याशी व्यापारी सबंध वाढविण्याचे धोरण अवलबिले आहे. जपानने निरनिराळ्या देशाशी चालविलेल्या व्यापाराचे आकडे पाहिले तर हे दिसून येईल. रशियाशी जपानचा व्यापार तर १९६८ साली ७३ कोटी डॉलरचा झाला. सायबेरियातील काही विकास कार्यात जपानने भागीदारी स्वीकारली आहे, व इतर काही योजनांच्या बाबतीत अशा भागीदारीबद्दल बोलणी चालू आहेत.

भारताबद्दल जपानी जनतेला नितात आदर वाटतो, व उदात्त बौद्ध तत्त्वज्ञानाचा जपानी सस्कृतीवर सखोल परिणाम झाला आहे. गेल्या काही वर्षात जपान व भारत याच्या दरम्यान अनेक क्षेत्रात निकटचे सहकार्य चालू आहे, व व्यक्तिगत भेटीगाठीही खूप वाढल्या आहेत. अमेरिकेशी जपानचे निकटचे सबध असून ते जपानच्या दृष्टीने फार लाभदायक ठरले आहेत. जपान व अमेरिका या दोन देशात परस्पर-सहकार्याचा व सरक्षणाचा करारही झाला आहे. जपानी जनता स्वत च्या देशाचे पुन:शस्त्रीकरण करण्याच्या विरुद्ध आहे. त्यामुळे प्रस्तुत करारामुळे जपानला नेहमी सुरक्षिततेचा दिलासा मिळत राहील.

## ¤ पत्रकार कोण ?

निरनिराळ्या देशातल्या पत्रकाराना व्यावसायिक प्रशिक्षण देणाऱ्या एका प्रसिद्ध ब्रिटिश सस्थेचे उपसचालक जॉर्ज कारडाउनी हे नुकतेच दिल्लीला येऊन गेले तेव्हा त्यानी पत्रकार कोण व वर्तमानपत्र कसे असावे याबद्दल काही उद्‌बोधक विचार प्रकट केले :

भारतातल्या वर्तमानपत्राना राजकारणाचा फार मोठा डोस पाजण्यात येतो, पण सर्वसाधारण वाचकाला तो हवा असेल असे वाटत नाही. इतर कुठल्याही

देशाप्रमाणे भारतीय जनतेलाही पैसा, मुले, आरोग्य, आपले शेजारी असल्या मूलभूत गोष्टींतच खरे स्वारस्य वाटत असले पाहिजे. राजकारण द्यायचेच असेल तर ते गाळून दिले पाहिजे, म्हणजे वाचकाच्या खिशाशी व परिस्थितीशी त्याचा संबंध दिसेल अशा पद्धतीने दिले पाहिजे. उदाहरणार्थ, बजेटवर लिहिणाऱ्या पत्र-कारांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की सामान्य वाचकाला कोरड्या आकडेवारीत स्वारस्य नसते तर बजेटमुळे आपल्या दैनंदिन खर्चावर काय परिणाम होणार आहे हे जाणून घ्यायची त्याला इच्छा असते.

चांगला पत्रकार कोण ? " उच्च पातळीवरून बोलायचे म्हणजे प्रामाणिकता, जबाबदारीची जाणीव आणि बेसुमार जिज्ञासा ही चांगल्या पत्रकाराची प्रमुख लक्षणे आहेत. याच्या जोडीला चिकाटी व वागण्याचे धोरण यांचीही आवश्यकता आहे, पण हे गुण फक्त पत्रकाराच्या व्यवसायातच आवश्यक आहेत असे म्हणता येणार नाही. मुख्य गोष्ट म्हणजे पत्रकाराने आपल्या व्यवसायात कितीही वर्षे काढली तरी त्याला त्यात सारखा आनंद वाटत राहिला पाहिजे. हा आनंद त्याला जेव्हा वाटेनासा होईल तेव्हा त्याने दुसरा एखादा व्यवसाय पत्करलेला बरा. वाचकांना जे वाचायला आवडेल ते साहित्य पुरविणे हे वर्तमानपत्राचे कर्तव्य आहे. उलट सार्वजनिक जीवनातील व्यक्तींच्या बातम्या वाचकांना पुरविणे हा त्याचा अधिकार आहे. अशा वेळी प्रसंगी सार्वजनिक व्यक्तींच्या खासगी दुःखात किंवा दुर्दैवात डोकावून पहावे लागले तरी वर्तमानपत्राने ते केले पाहिजे." सार्वजनिक जीवनात भाग घेण्याची ही एक प्रकारे किंमतच असते. शिवाय सार्वजनिक व्यक्तीला खासगी जीवन असतेच कोठे ?

□ □ □



यशवंतराव मोहिते
आणि
सहकारी चळवळ

# एक क्रांतिकारक पुस्तिका

परवा महाराष्ट्राचे सहकार मंत्री श्री. यशवतराव जिजाबा मोहिते यानी राज्यातील सहकारी चळवळीवरील एक क्रांतिकारक पुस्तिका विधानसभेत सादर केली. सुमारे सव्वा-तीनशे पानाच्या या पुस्तिकेत मत्री महोदयानी महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा प्राजळ आढावा घेतला आहे. आणि ही चळवळ सुधारून तीमध्ये नवा जीव आणि नाव जोम ओतण्यासाठी काय करण्याचा त्याचा इरादा आहे हेही सांगितलं आहे.

महाराष्ट्रातल्या नामवत बुद्धिवाद्यामध्ये श्री. मोहिते यांची गणना होते. अर्थकारणाविषयी, धर्मसस्थाविषयी, समाजक्रातीविषयी वेळोवेळी ते काहीतरी वेगळे असे क्रांतिकारक विचार माडून खळवळ उडवून देतात. महाराष्ट्रातले अनेक मंत्री तसे आपल्या वर्तनामुळे अधूनमधून खळबळ माजवितात पण वैचारिक क्षेत्रात काही हालचाल घडविणारे श्री. मोहितेच. मूलभूत विषयाचा त्याचा अभ्यास दाडगा आहे, स्मरणशक्ती विलक्षण आहे. विषय माडण्याची खास हातोटीही त्याच्याकडे आहे. परवा त्यानी विधानसभेत सादर केलेल्या पुस्तिकेची प्रस्तावना म्हणजे महाराष्ट्राच्या आर्थिक आणि शेतकी क्रातीचा जाहीरनामाच म्हणता येईल. परतु पुस्तिकेत मोहित्यानी सुचविलेले उपाय त्याना स्वत:लाच कितपत अमलात आणता येतील ही शका आहे. ते जर अमलात आले तर ग्रामीण महाराष्ट्राचे चित्र खरोखर सपूर्ण बदलून गेलेले दिसेल.

श्री. मोहिते यानी माडलेले प्रस्ताव सहकारी चळवळीवर फार दूरगामी परिणाम करणारे ठरतील. एवढेच तव्हे तर आजची सारंजामदारी आचाराची अर्थप्रधान समाजव्यवस्था बदलण्याची थोडी फार ताकद त्यामध्ये आहे. त्यामुळे अनेक हित-

संबंधीयांचा या प्रस्तावाना कसून विरोध होणार हे उघड आहे. स्वतः श्री. मोहिते यांनीच पुस्तिका सादर करताना सांगितले की मी सुचविलेल्या बदलांमुळे सावकार, आडते, दलाल, कमिशन एजंट, मक्तेदार, व्यापारी, कारखानदार, कन्त्राटदार, सटोडिए, उपकाराच्या भावनेतून काम करणारे समाजसेवक इत्यादी अनेकांच्या प्रस्थापित हितसंबधाना धक्का बसणार आहे.

श्री. मोहिते याच्या मते सहकारी चळवळीने महाराष्ट्रात मोठी प्रगती केली आहे. पण कोणतीही जनचळवळ ज्यावेळी झपाट्याने वाढत जाते त्यावेळी तिचा वारंवार आढावा घेणं, तिची वाढ अपेक्षित ध्येयाशी व सर्वमान्य सिद्धाताशी कितपत सुसंगत राहिली आहे हे पाहणे आवश्यक असते. महाराष्ट्रातील सहकारी चळवळ ही अशीच झपाट्याने वाढणारी आणि जीवनाची सर्वांगे व्यापणारी चळवळ आहे, परतु वाढीबरोबर तिच्यामध्ये अपरिहार्यपणे काही दोष शिरले आहेत. ते दोष दाखवून त्याच्या दुरुस्तीचे उपाय सुचविले पाहिजेत आणि राष्ट्राने मान्य केलेली सामाजिक, आर्थिक आणि राजकीय उद्दिष्टे पेलून पार पडण्याइतपत समर्थ बनवता आले पाहिजे.

## आज दिसणारे चित्र

राज्यातील आजची सरकारी चळवळीची स्थिती कशी आहे? महाराष्ट्रात आतापर्यंत स्थापन झालेल्या २०,०९० प्राथमिक शेती सहकारी सस्थापैकी १७,६१६ संस्था (Agricultural Credit Co-operatives) या तोटयात चालत आहेत. ग्रामीण अर्थव्यवस्थेवर त्या भारभूत होउन बसल्या आहेत. त्यापैकी बऱ्याचशा संस्था तर दिवाळे काढण्याच्या अवस्थेपर्यंत पोचल्या आहेत. आर्थिक आणि सामाजिक उद्दिष्टे पेलण्याचे सामर्थ्य या दुबळ्या सस्थामध्ये कोठून येणार?

शिवाय या सस्था राजकारणी गटांचे अड्डे बनलेल्या आहेत. बहुतेक सस्था काही विशिष्ट गटांनी काबीज केल्या असून हे गट बहुशः कर्ज देण्याच्या बाबतीत अनुदार धोरण स्वीकारणारे. आणि पर्यायाने सस्थाच्या वाढीला व प्रगतीला लगाम घालणारे. त्यामुळे छोटया जमीनधारकांची या सस्थानी आतापर्यंत मोठ्या प्रमाणावर उपेक्षाच केली आहे. एवढेच नव्हे तर मध्यम आणि मोठ्या जमीन-धारकांचेच हितसबध या सस्थानी राखले आहेत.

उदाहरणेच द्यायची झाली तर अनेक देता येतील. विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यात १९६५–६६ साली सहकारी सस्थानी जी अल्पमुदतीची कर्जे वाटली त्यापैकी फक्त एक टक्के कर्ज पाच एकराखाली जमीन असणाऱ्या शेतकऱ्याना दिली, ३३·३ टक्के पाच ते वीस एकरी शेतकऱ्याना आणि ६५ ७ टक्के कर्ज वीस एकरावरील बड्या जमीन मालकाना. प्रत्येक जिल्ह्यातील चित्र थोड्या फार फरकाने असेच आहे. थोडक्यात म्हणजे या सहकारी सस्था फक्त मूठभर बड्या शेतकऱ्यांची मक्तेदारी झालेली आहे.

हे झाले प्राथमिक सहकारी संस्थांचे चित्र. इतर प्रकारच्या सोसायट्यांमध्ये तरी काय घडते आहे? वृत्तपत्रांची सहकारी संस्था, मोटर मालकांची संस्था, सिनेमावाल्यांची संस्था या सहकारी संस्था इतर कोणत्या खाजगी मालकाप्रमाणे नोकर नेमून त्याना पिळून काढतात. आणि गडगंज नफा कमवितात. सहकारी चळवळीची सारी मूलभूत तत्त्वे पायदळी तुडवून श्री. मोहिते म्हणतात, हे जर असेच चालू राहिले तर सहकारी कार्यकर्त्यांच्या पुढच्या पिढ्या भांडवलदारी आणि जन-विरोधी संस्थाना उत्तेजन देण्याचा आरोप आमच्यावर करतील.

श्री. मोहिते पुढे म्हणतात, वृत्तपत्र-वाचकानी एखादी सहकारी संस्था स्थापून वृत्तपत्र काढले तर ते योग्य होईल; किंवा चित्रपट प्रेक्षकाना अशी संस्था स्थापणेही उचित. रिक्षा आणि मोटारीचे ड्रायव्हर्स व क्लिनर्स सभासद असणारी वाहतुकीची सहकारी संस्थाही उत्तमच. पण सध्या अस्तित्वात असलेल्या संस्था म्हणजे "सहकारी चळवळीच्या खऱ्या उद्दिष्टाशी प्रतारणा, आणि भांडवलशाही मागच्या दाराने परत आणण्याचा पद्धतशीर प्रयत्नच होय? एवढेच नव्हे तर या संस्था आपले खरे स्वरूप झाकून असा काही बुरखा पांघरतात की महाराष्ट्रात त्यांच्याशी संघटित लढत देणेही कठीण होऊन बसते.

## सहकारी बँका

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा खराखुरा केंद्रबिंदू म्हणजे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका. या बँका जिल्हा राजकारणाचे अड्डे बनलेल्या. या बँकांच्या अध्यक्षाच्या हाती बरीच सत्ता आहे. त्यामुळे राज्याच्या प्रत्येक जिल्हा बँकेचे अध्यक्षपद हे महत्त्वाचे सत्ताकेंद्र बनले आहे. राज्याच्या मंत्रीपदाएवढीच प्रतिष्ठा याही जागेला मिळाली आहे. या जिल्हा बँकानी आतापर्यंत काय केले? नागरी विभागामधून मोठ्या प्रमाणावर ठेवी जमा केल्या. त्यामुळे साहजिकच कर्जे देताना ग्रामीण विभागाकडे आणि छोट्या शेतकऱ्याकडे दुर्लक्ष झाले. ज्याची कर्ज फेडण्याची क्षमता उघड आहे अशानाच कर्जे दिली. रिझर्व बँकेने सुमारे एक वर्षापूर्वी व्याजाचा दर कमी केला. हा फायदा जिल्हा बँका अगदी खालच्या थरातल्या कर्जदारांपर्यंत पोचवू शकल्या नाहीत. प्राथमिक सहकारी संस्थावर या जिल्हा बँकांची फारशी कडक नजर नव्हती. बऱ्याच ठिकाणी तर दुर्लक्ष होते.

श्री. मोहिते म्हणतात, आपल्या मर्यादामध्ये या जिल्हा बँकानी आतापर्यंत योग्यती भूमिका पार पाडली. परंतु आता पुढचा भार या बँका पेलू शकणार नाहीत. या बँकांचे स्वरूप आहे तसेच ठेवणे म्हणजे आपल्या अर्थव्यवस्थेत जडता आणण्यासारखे होईल.

या जिल्हा बँकांच्या कार्याची विभागणी करून सहकारी बँकींग व्यवस्थेला शेतकऱ्यांच्या अगदी जवळ नेणे हा श्री. मोहिते यांच्या नव्या प्रस्तावाचा गाभा आहे. जिल्ह्याप्रमाणेच त्यांनी तालुका पातळीवर सहकारी बँका काढण्याचे सुचविले आहे

या तालुका बँकावर शेतीच्या कार्यक्रमाची जबाबदारी टाकायची आणि जिल्हा बँकानी शेती–औद्योगिक प्रगतीकडे प्रामुख्याने आपला व्यवहार केंद्रित करायचा. जिल्हा बँका या ग्रामीण विभागातल्या शेतकऱ्याच्या दृष्टीने दूरच्या सस्था. तालुका संस्था या शेतकऱ्याच्या अगदी नजीक जाऊन ठेपतील आणि त्याचे प्रश्न समजावून घेऊन त्याना योग्य त्या प्रमाणात कर्जे देऊ शकतील.

शेतकऱ्याच्या मालाच्या व्यापाराबाबतीत तर या जिल्हा बँकांना मोठेच अपयश आले आहे. आजही या शेतीमालाच्या बाबतीत अशी परिस्थिती आहे की मधले दलाल या व्यापारावर दोन महिन्यात जेवढे पैसे कमवितात तेवढे पैसे वर्षभर शेतामध्ये घाम गाळूनही शेतकऱ्याला मिळत नाही. एवढी वर्षे सहकारी चळवळ आणि सहकारी बँका महाराष्ट्रात राहूनही ही परिस्थिती म्हणजे दुर्दैवच.

ही परिस्थिती दूर सारण्यासाठी विविध मालासाठी सहकारी बाजाराच्या साखळया उभारण्याचे श्री. मोहिते यानी सुचविले आहे. या सहकारी बाजार पद्धतीमुळे शेतकऱ्याना दिलेल्या कर्जाची वसुली करणे सोपे जाईल, त्याचबरोबर शेतीमालाना चांगला भावही मिळवून देता येईल.

तालुका बँकाची स्थापना, जिल्हा बँकाचे लक्ष शेती–औद्योगिक क्रांतीकडे वळवणे आणि सहकारी बाजाराच्या साखळया या तीन खाबावर श्री. मोहिते याची नवी योजना उभी आहे. तालुका बँका म्हणजे सहकारी बँकीग व्यवहारातील अखेरचा शब्द असेही श्री. मोहिते मानीत नाहीत. पुढच्या भविष्यकाळात कदाचित याहीपेक्षा खालच्या पातळीवर ग्रामीण भागात बँका उभ्या राहून स्वयपूर्णपणे अर्थव्यवहारात मोलाची भर घालू शकतील असा त्यांचा विश्वास आहे. या मार्गाने गेले म्हणजे समाजवादी समाजव्यवस्थेचा पाया मजबूत होईल, समाजातील दुबळयांचे शोषण थांबेल आणि सत्तेचे विकेंद्रीकरण होईल असे ते मानतात.

या मूलभूत तत्त्वाच्या आधारावर सध्याच्या सहकारी कायद्यात बदल करण्यासंबंधी, नवे कायदे करण्यासबधी, जुने नियम बदलून नवे करण्यासबधी श्री. मोहिते यांनी अनेक सूचना केल्या आहेत. अयशस्वी, तोट्यात चालणाऱ्या सहकारी संस्था ताब्यात घेऊन चालविण्यासाठी एक राज्य पातळीवर सहकारी महामडळ स्थापण्याची सूचनाही महत्त्वाची. गृहनिर्माण, दूध, मासे, ग्राहक सस्था, रुग्णालये, शेती, वाहतूक, लिफ्ट इरिगेशन, आदी जीवनाच्या विविध बाबीमध्ये काम करणाऱ्या व्यवहाराबाबतीत सहकारी संस्था काय करू शकतील हेही श्री. मोहिते यानी तपशीलवार सागितले आहे.

श्री. मोहिते यानीच सांगितल्याप्रमाणे बड्या शेतकऱ्याच्या आणि इतर अनेक प्रस्थापित हितसंबधीयाच्या प्रकृतीला न मानवणारे असे हे प्रस्ताव आहेत. या प्रस्तावांची खरोखरच योग्य अमलबजावणी झाली तर महाराष्ट्रात खराखुरा समाजवाद आलेला पहायला मिळेल. पण ही अमलबजावणी होईल का ? की हे प्रस्थापित

हितसंबंध या प्रस्तावाच्या आड येतील ? हे मोठेंच प्रश्नचिन्ह आहे. या प्रस्तावां-वरची मते मागवून त्यानुसार कायदे करून, नियम करून एक वर्षाच्या आत ते पूर्ण करण्याचा इरादा श्री. मोहिते यांनी जाहीर केला आहे. महत्त्वाकांक्षी योजना आहे. हे करतांना श्री. मोहिते यांना समाजातल्या हितसंबंधांशी तर लढावे लागेलच पण आपल्या प्रत्यक्ष राजकीय पक्षात आणि खुद्द मंत्रिमंडळातही मोठाच विरोध सहन करावा लागेल. हे सर्व प्रस्ताव जसेच्या तसे रेटणे श्री. मोहिते यांना कठीणच जाईल. काही ठिकाणी पाणी घालून, बऱ्याच बाबतीत तडजोड करून त्यांना हे गाडे रेटावे लागेल. तरीही हरकत नाही. श्री. मोहिते यांचे प्रस्ताव महाराष्ट्रा-तीलच नव्हे तर अखिल भारतातील सहकारी चळवळीच्या दृष्टीनें मोठेच ऐतिहा-सिक महत्त्वाचे आणि क्रांतिकारक ठरणार आहेत. निदान त्यांचे पुस्तक तरी मानाचे स्थान पटकावून राहील.

श्री. मोहिते यांनी महाराष्ट्रातील सहकारी चळवळीला जन–चळवळ म्हटले आहे. आणि खरोखरच ही चळवळ महाराष्ट्र–जीवनाच्या विविधांगांमध्ये आता शिरू लागली आहे. महाराष्ट्र सरकारच्या १९६९–७० च्या आर्थिक समालोचना-मध्ये या चळवळीसंबंधी जे आकडे दिले आहेत ते मोठे उद्बोधक आहेत.

१९६८–६९ या आर्थिक वर्षाच्या शेवटी महाराष्ट्रातील सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांची एकूण संख्या ४०,०५६ एवढी होती. आणि त्यांची सभासद संख्या ८१ लाखावर होती ! या सर्व संस्थांचे एकूण 'पेड अप' भांडवल १६३ कोटी रुपयांच्या वर होते, ठेवी २५० कोटी रुपयांच्यावर आणि खेळते भांडवल (वर्किंग कॅपिटल) १,०८६ कोटी रुपये ! यावरून या सहकारी संस्था महाराष्ट्रात केवढी प्रचंड आर्थिक उलाढाल करतात याची थोडीफार कल्पना येईल. आणि हे आकडे दर-वर्षी वाढतच आहेत. १९६०–६१ साली या संस्थांमधील खेळते भांडवल अवघे २९१ कोटी रुपयांचे होते. १९६७–६८ साली ते ९१४ कोटी झाले आणि ६८–६९ साली १,०८६ कोटी रुपयावर आले ! वाढीचा झपाटा असा प्रचंड आहे.


आणि हे बघ...लोणचे करतांना बावरून जाऊं नकोस, सरळ ठाकूर यांचा लोणच्याचा तयार मसाला वापरून "ह्यांना" खुष कर



लोणचीं कमी श्रमांत, अल्प खर्चात रुचकर, टिकाऊ व चवदार बनतात.

ठाकूर आणि मंडळी
माहीम, मुंबई-१६.

अर्थात या भाडवलाचा मोठा वाटा राज्यातल्या अवघ्या २५ साखर सहकारी कारखान्यांमध्ये गुतलेला आहे. हे साखर कारखाने खुल्या बाजारातील साखर विक्रीपासून कसे कोटयावधी रुपयाचे नफे कमवितात हे वेळोवेळी वृत्तपत्रात छापून येतेच.

□

आता थोडस महाराष्ट्राच्या जनतेच्या एकूण आर्थिक परिस्थितीविषयी. मुंबई-मधे आकाशात झेपावणारे सुळक्यासारखे 'स्कायस्क्रॅपर्स' उठत असताना, मत्र्याचे पगार, भत्ते वाढवून मिळत असताना आणि साखर कारखाने पोत्यानी पैसे कमवीत असताना महाराष्ट्रातील सामान्य माणूस कसा जगतो? मी देत आहे ते आकडे महाराष्ट्र सरकारचेच.

सरासरी काढली तर महाराष्ट्रीय माणूस दर महिन्याला स्वत वर ३६·५६ रु. खर्च करतो. ग्रामीण भागातील ही सरासरी महिन्याला रु. ३१·०२ एवढी येते तर शहरी भागात रु. ५०·५६.

हे झाले सरासरी जीवनमान. (म्हणजे यामध्ये दिवसाला दहा हजार रुपये कमविणाऱ्या व्यापाऱ्याचा आणि उद्योगपतीचाही समावेश आहे तर!) पण ग्रामीण भागातील ६५ टक्के जनता या सरासरीपेक्षा कमीच खर्चावर जगते. आणि शहरी भागातील ६७ टक्के जनता सरासरीपेक्षा कमी खर्चावर जगते.

आता आणखी थोडे आकडे. महाराष्ट्रातील पाच टक्के लोकाचा महिन्याचा स्वत वरचा सरासरी खर्च रु. १२·१० एवढा आहे. तर अगदी वरच्या (!) गटातील लोकाचा म्हणजे १० टक्के लोकाचा खर्च महिन्याला रु. ९९·४५ एवढा आहे. फक्त एवढाच? हे आकडे कसे फसवू शकतात ते पाहणे अगदी सोपे आहे.

समजा मी दर महिन्याला जेवण, खाणे, प्रवास, कपडे, घरभाडे, सिनेमा, इतर चगळ वगैरे मिळून स्वत.वर १० रु खर्च करतो आहे आणि एक शेठ अशाच सर्व गरजासाठी (कार, फ्लॅट, सर्व्हंट्स्, डिनर्स, एटरटेनमेंटस्, पार्टीज, कपडे वगैरे) स्वत.वर १००० रुपये खर्च करताहेत तर आमच्या दोयाचा सरासरी खर्च होईल रु. ५०५! समजा माझ्यासारखी ९९ माणसे दहा रुपये खर्च करताहेत आणि एक शेठ हजार रुपये तर आम्हा शभर जणाचा सरासरी खर्च रु. १९·९०! गमत आहे.

जय समाजवाद!

— अरुण गोसावी

दादूमिया

दोन

# रसगुल्ले आणि बॉम्स्

ज्योति बसू कम्युनिस्ट की नाही ?

'विवेकानद रॉक मेमोरीयल'चे एकनाथजी रानडे त्यांच्याकडे गेले त्या मेमोरीयलच्या कामात सहाय्य मिळविण्यासाठी.

'सर्व लोक सोडून तुम्ही माझ्याकडे कोठे आलात, मिस्टर रानडे?'

'का बरे?'

'अहो, माझा देवावर, धर्मावर, पारलौकीक तत्त्वज्ञानावर—कशावरही विश्वास नाही.'

'नसेना का—'

'पण मग मी आपल्याला कसे सहाय्य करणार?'

'अहो ज्योतिर्मयजी, विवेकानद महान् भारतीय नेते होते, देशभक्त होते. He stood for the downtrodden, for the oppressed.'

'ते मला माहीत आहे. त्याबद्दल माझ्या मनात नितांत आदरही आहे'

'म्हणून तर मी आपल्याकडे आलो. मीही कलकत्त्यात बरीच वर्षे राहत आहे. मी आपल्याला ओळखतो.'

'लहानपणी विवेकानंदाचे चरित्र मी वाचले होते. त्यांच्या साहित्याचा फार मोठा पगडा माझ्या मनावर त्यावेळी होता. पण त्यांची कालीभक्ती, त्याचे स्पिरीच्युअल् विचार—छे:, पटत नाही आपल्याला ते सारे. आणि विशेषत: तुम्ही त्याचे दगडी मंदिर जे उभारीत आहात—छे:, मी नाही आपल्याला मदत करू शकणार. राजकीय दृष्टया, आय ॲम सो डिफरंट।'

'मग आपल्या सौभाग्यवतीना आम्हाला सहाय्य करून द्या की—'

'ते तिला विचारा की,' ज्योतिबाबूंनी झाकीत उत्तर दिले.

सौ. बसूना बोलावण्यात आले. त्यांनी क्षणभर नवऱ्याकडे बघितले व त्या म्हणाल्या, 'शूनो, आपल्याला हरकत नसली तर हे काम करण्यास मी तयार आहे.'

आश्चर्य वाटेल, सौ. बासूना स्वत: हिंडून या मेमोरीयलसाठी एकनाथजींना अकरा हजार रुपये गोळा करून दिले.

अगदी मार्क्सिस्ट पुढाऱ्याच्या बायकोने संघाच्या सर्वात उत्कृष्ट संघटकास अकरा हजार रुपये देवविले !

ज्योतिबाबूंची त्यास हरकत नाही !

हे श्रेय एकनाथजीजवळ असलेल्या जादूस. त्या जादूस मी 'दीनदयाळजी टच्' म्हणतो. हा टच् गांधीजीजवळ भरपूर होता. तो चव्हाणात आढळतो, वाईजवळ भरपूर आहे.

मराठी माणसाजवळ तो अभावानेच सापडतो. एकनाथजी रानडे अपवाद.

आणि या बाबतीत बंगाली माणूस मराठी माणसाच्या सहस्र योजने पुढे आहे. ' How to lose friends and repel people ?' चे धडे बंगाली माणूस पोटात असल्यापासून मिळवीत असतो.

म्हणून मराठी माणसाप्रमाणे बंगालमध्ये भक्तापेक्षा पुढारीच जास्त. पक्ष, उपपक्ष व नेते अक्षरशः हजारोनी. राजकारण नाही असे एक क्षेत्र मिळणार नाही. एक पुढारी जरा कुठे वर येऊ लागताच त्याचे पाय खेचण्यासाठी सवाई, डिट्टो किंवा तत्सम पुढारी डझनानी पुढे येतात.

बंगाली मन समजणे अशक्य आहे.

बंगाली मन म्हणजे गोंधळ !

बंगाली मन म्हणजे असंतोष ! !

बंगाली मन म्हणजे अहंकार, आव्हान ! !

या सर्वांवर कडी म्हणजे बंगाली माणूस कंगाल आहे, तो प्रांतीयवादी आहे व अत्यंत संकुचित मनाचा आहे.

एवढे गुण असल्यावर बंगालची उन्नती म्हणजे एक अशक्य गोष्ट वाटते.

पंजाब आज भारतात संपन्न आहे. याचे कारण पंजाबी माणूस दिलदार, कष्टाळू, चिवट, एकदा डोक्यात घेतले की ते जिद्दीने पार पाडणारा व 'मिठ्ठी जबानवाला वेपारी' आहे.

कलकत्त्यात व्यापार पंजाबापेक्षा जास्त चालतो. पण तो सारा मारवाडी व गुजराथी यांच्या हाती आहे. पुण्याचा 'लक्ष्मीरोड' जसा शहा व पटेल यांच्या हाती आहे तसा. ह्या लोकांच्या बरोबरीने आज पंजाबी व सिंधी व्यापारी तेथे आले आहेत.

कलकत्ता शहराची वस्ती भयंकर वाढली आहे. कलकत्ता शहर सुधारावयाची

जाणीव तेथील कॉर्पोरेशनच्या सर्व सभासदांच्या डोक्यात आहे, पण बंगालच्या प्रांतीय सरकाराने त्याना सांगितले, ' आमच्याजवळून कलकत्ता शहर सुधारण्यासाठी एक पैचीही अपेक्षा बाळगू नका. आमच्याजवळ सध्या पैशांची टंचाई आहे.'

काय रडणार तेथील कॉर्पोरेटर्स ?

दहा वर्षांपूर्वी कलकत्याची लोकसंख्या चाळीस लाख होती. आज ती सत्तर लाखावर पोचली आहे. एवढया मोठया लोकसंख्येच्या समस्या पैशाशिवाय कशा सुटणार ?

कलकत्ता शहर सुंदर बनविण्यासाठी कलकत्यातील धनवान मंडळी पुढे आली. त्यात तेथील बडे व्यापारी व औद्योगिक कारखान्यांचे मालक यांचा समावेश होता. या चेंबर ऑफ कॉमर्सने ऐंशी कोटी रुपयाची योजना तयार केली. कलकत्याच्या आजूबाजूस सॅटलाईट शहरे निर्माण करण्याची व सारी शहरे भूगर्भ वर्तुळाकार रस्त्याने जोडण्याची ती योजना अतिशय भव्य व महत्वाकांक्षी आहे. हे सारे कारखानदार व लक्ष्मीपती बोलून चालून व्यापारीभाई. त्यांनी सांगितले, ही सारी योजना आम्ही पाचदहा वर्षांत पुरी करू. पण एका अटीवर. खर्च केलेल्या पैशांवरचे व्याज चटकन् सुटले पाहिजे. Quick Returns मिळाले पाहिजेत आम्हास !

कलकत्यात अर्थशास्त्राचे प्रोफेसर्स व तज्ञ शेकडोनी मिळतील. साऱ्याचे ज्ञान पुस्तकी. मात्र दावा ' प्रोग्रेसिव्ह ' असल्याचा. सारे चर्चेचे भोक्ते. त्यांना या योजनेत exploitation न दिसले तरच नवल.

पंजाबी असते तर एव्हाना योजना अर्धी पुरी झाली असती !

बऱ्याचशा चर्चेनंतर Urban Development Bank सरकारी मदतीने निर्माण करण्याचे ठरले. सुरुवातीचे भांडवल वीस कोटी रुपयांचे.

तज्ञांचे म्हणणे पडले, समजा ही बँक स्थापन झाली पण सरकारने दुर्लक्ष केले व योजना नीट पार पडली नाही तर योजनाही नाही व पैसे फुकट जातील.

पुन्हा चर्चा.

केंद्र सरकारने पी एल ४८० च्या लठ्ठ फंडातील काही रक्कम कलकत्ता सुधारण्यासाठी देऊ केली !

काय ? अमेरीकन पैसा व सोनार बांगला देशच्या राजधानीसाठी ?

योजना ताबडतोब फेटाळली गेली !!

उद्योगपतीची ऐंशी कोटी रुपायाची ऑफर अजून खुली आहे. सरकारने Official interference करायचा नाही ह्या अटीवर. त्यांची सॅटलाईट टाऊन्सची, कलकत्याभोवती साखळी बनविण्याची कल्पना खरोखर स्तुत्य आहे. स्लम वाढू नये म्हणून या उपनगरातील लोकसंख्येवर मर्यादा ठेवण्याची योजना भविष्यात मोठी फायदेशीर होईल.

पण कलकत्याचे बुद्धिजीवी व मार्क्सचे चेले ही योजना पार पडू देतील असे मला वाटत नाही.

विचारांची सपन्नता व आर्थिक दारिद्रय हा विरोधाभास कलकत्यास 'डोळस' नजरेने भेट दिल्याशिवाय कळणे अशक्य आहे.

दुसरा विरोधाभास कम्युनिस्ट राजवट व धमवेड याच्या आपुलकीच्या नात्यात दिसतो.

दिवाळीच्या आधी दुर्गापूजेच्या उत्सवात कलकत्यास भेट देण्याची शिफारस मी ज्याला त्याला करेन. या कडक भवाना देवीच्या भक्तीत बंगाली का रममाण होतो ते मला कळत नाही. सकाळी चार वाजता उठून त्या दिवशी ऑल इंडिया रेडियो-वर दुर्गास्तुती ऐकावयास मिळते. सारे टॉप् कलाकार भक्तिभावाने गाण्यासाठी तेथे जमतात. त्यादिवशीचे 'महालयम्' मी टेपरेकॉर्डवर टेप करून ठेवतो व वर्षभर ऐकतो. ती दुर्गापूजा ऐकून कोणी आळशी माणूसदेखील कार्यतत्पर होईल, मग नेहमीच काम करण्यात आनद मानणाऱ्याची काय अवस्था होईल ते काय सांगायला पाहिजे ?

ह्या दुर्गाभक्ताचे रक्त तर कसे सळसळत असते! त्यांच्या धार्मिक व जातीय (?) भावना सदैव जिवत ठेवण्याचे श्रेय पूर्व पाकिस्तानातून येणाऱ्या हिंदू निर्वासितांना.

दोन वर्षांपूर्वीची गोष्ट. होळीच्या दिवशी हिंदू मुलीना कोणा मुसलमानानी छेडले. तसा प्रकार अगदी लहान होता. मुलीना छेडणे हे गगामय्याच्या साक्षीने रोजच सायकाळी चालते. पण हिंदू मुले हिंदू पोरीना छेडतात ते वेगळे व मुसलमान 'काफिरा'नी हिंदू मुलीना छेडणे वेगळे. त्यावरून मारामारी झाली. हिंदूनी (व बंगाली म्हणजे बिहारी पोलीसानी) छेडणाऱ्या लोकाना पुरे ठोकून काढले. पाकिस्तान रेडिओने राईचा पर्वत उभा केला. क्रिया, प्रतिक्रिया व प्रति-प्रतिक्रिया असा क्रम सुरू होऊन कलकत्यात मोठी धमाल उडून गेली.

जातीय बाबतीत काँग्रेसवाले व कम्युनिस्ट सारे एक. दगल एवढी मोठी झाली की इंदिरा गांधीना दिल्लीहून तातडीने विमानाने यावे लागले! ज्यांनी धमाल सुरू केली त्या विभागास इंदिरा गाधीनी भेट दिली. धर्मवीराचे राज्य होते त्यावेळी. ते नावाचे 'धर्मवीर' नव्हते. त्यानाही इदिरा गांधी तेथे आल्या त्याचे आश्चर्य (व राग) आला. इदिराजींनी वार्ताहरासमोर स्पष्टीकरण केले :

".. as a prime minister it was her business to visit different parts of the country and get to know the feelings of the people.'

त्याने सर्वांचे समाधान कसे होणार? खुद्द काँग्रेस वर्तुळातील प्रतिक्रिया पहा : 'नक्षलबारीचे बड झाले तेव्हा बाईंनी भेट का दिली नाही? युनायटेड फ्रटला दोषी ठरविले गेले त्यावेळी! त्या हिंसाचारापुढे ही जातीय दंगल म्हणजे काहीच

नाही.' इंदिरा गाधीच्या भेटीस सर्वांत जास्त विरोध कोणी केला असेल तर तो जनसंघाने. पण मला सांगण्यात आले, 'understandably it is more vocal protest, it has no foothold over here!'

आज भारताच्या सर्व शहरापेक्षा हिंसाचार व दंगली कलकत्त्यात जास्त होतात. त्याचे मुख्य कारण बगाली मन.

पण कलकत्त्याची बेशिस्त वाहतूक व्यवस्था आणि ती आणखी बिघडविणारी शाळाकॉलेजांमधली पोरे. ही दोन कारणे दृष्टीआड करून चालणार नाहीत.

मुबईस दगे तेवढे का होत नाहीत? कारण मुबईत पोलीसाचा ट्रॅफिक-कंट्रोल उत्तम आहे. या ट्रॅफिक कंट्रोलवर दगेखोरानी कट्रोल ठेवला तरच मुबईतील 'बंद' यशस्वी होतो.

ती भीति कलकत्त्यात नाही.

तेथे ट्रॅफिक सेन्स नाही आणि ट्रॅफिक रूल्स् जराही नाहीत. डाव्या बाजूने गाडीस ओव्हरटेक् करायचा जणू नियम आहे! कलकत्त्याच्या ट्रॅफिकमध्ये जो गाडी चालवेल तो जगात कोठेही गाडी हाणू शकेल. समजा, तुमच्या गाडीचा अपघात झाला. सोप्यात सोपा उपाय, तुम्ही पळून जाणे. कारण गाडीवाला म्हणजे भाडवल-शहाचा हस्तक! इतका मार खावा लागतो की सांगायची सोय नाही. गाडी पेटवून देतात ते वेगळेच. एवढ्या जमावात कोणी पेटलेली काडी तुमच्या टाकीत टाकली ते कसे सांगणार? या दगलीत गाडीचे नुकसान झाले तर विमावाले पैसाही देत नाहीत.

आश्चर्य वाटेल, कलकत्त्यात स्कूटर्स जवळजवळ नाहीतच. कलकत्त्याचे रस्ते दोनदा रोज गगेच्या पाण्याने धुतात. ह्या ओल्या रस्त्यावर स्कूटर चालविताना थोडा जरी ब्रेक दाबला तरी स्कूटर काही कळायच्या आधी स्कीड होते व तुमचे हाड माडलेले असते. त्याशिवाय वाहतुकीतील जमावाच्या माराची भीती खरीच.

त्यापेक्षा माणूस-रिक्षा काय वाईट आहे? कोणाचे पोट तर भरते तुमच्या पैशावर. गल्लीबोळात गाडी जात नाही. तेथे ही रिक्षा जाऊ शकते. सर्वांत स्वस्त हे वाहन. सहा ते आठ आण्यात पुण्याच्या स्टेशनाहून मडईपर्यंत जायला मिळाले तर काय वाईट आहे? दोन स्वाऱ्या व सामान फक्त एका 'नेहरू' छाप अधेलीत.

वाहतुकीतही राजकारण पहायला फक्त कलकत्त्यातच मिळेल.

माणूस-रिक्षात बसलात की आपोआप तुम्ही साम्यवादी होता. एक माणूस तुम्हाला स्वतःचा घाम गाळून खेचीत आहे ही कल्पनाच तुम्हाला भांडवलशाही बनविते. रिक्षात बद काही नाही सारा मामला खुल्लमखुल्ला. त्यामुळे चुकनही कोणा गाडीवाल्याचा धक्का तुम्हाला लागला तरी तुमचे मानवप्रेम तावडतोब जागृत होते व तुम्ही तुमच्या विशरी डाऊनट्रॉडन् रिक्षावाल्याच्या बाजूने होऊन गाडी-वाल्यास सुनावता, मूर्खा, डोळे फुटले का?''

तुम्ही बंगाली असलात व गाडीवाला सरदारजी वा मारवाडी असला की संपलेच. तुम्ही लगेच म्हणता, 'आमचे खाऊन माजले आहेत हे बाहेरचे लोक !'

तुमचा संवाद ऐकण्यासाठी पाच-दहा जणांचा श्रोतृवर्ग नेहमीच तयार असतो. तुम्ही रिक्षात असता. तुमचा श्रोतृवृंद पायी चालणारा असतो. म्हणजे तुमच्यापेक्षा जास्त डाऊनट्रॉडन् ! जास्त चिडलेला. जास्त असंतोषी. कोणीतरी शोधून काढते, गाडीवाला डॉक्टर आहे श्रोतृवृंदात असा एखादा सहज निघतो ज्याची बहीण, बायको वा आई आजारी असते. तो डॉक्टरी फीस कंटाळलेला असतोच. त्याच्या डॉक्टरवरचा राग या डॉक्टरवर ! खरा समाजवाद ! सारे डॉक्टर्स पेटी बूर्ज्वा रक्तशोषण करणारे.

तो डॉक्टरची बॅग हिसकावतो.

क्षणार्धात बॅगमधली इंजेक्शने भिरकावली जातात. डॉक्टरचा टाय व चष्मा रस्त्यावर येतो.

धमाल सुरू हृते.

तुमचे अस्तित्व विसरले जाते.

तुमचाही आत्मा शांत होतो. तुम्ही तुमच्या ड्रायव्हरला सागता, 'जल्दी चलो, दो बजे रायटर्स बिल्डीग पोचना है !'

मला सर्वात तेथील बस व्यवस्थेचे आश्चर्य वाटते; अशी एकही बस नाही की जी 'पॅक्ड्' जात नाही. जणू कोंबड्या भरलेले टोपलेच प्रवास करीत आहे. शहरात साऱ्या बसेस सरकारी आहेत. आणि म्हणून लाखो रुपयांच्या नुकसानीत जात आहेत त्या दरवर्षी !

त्याऊलट कलकत्त्याच्या बाहेर सरदारजीच्या खासगी बसेस चालतात. त्यातील कंडक्टर कोणत्याही उतारूस तिकीटाशिवाय सोडत नाह . हे खाजगी बसवाले धूम नफा कमावीत आहेत

कलकत्त्यात कोणतीही धमाल, दगा किंवा हॉल्लॉगुल्लॉ झाला की पहिला बळी सरकारी बस. जणू प्रत्येकाच्या बापाचाच माल बस जाळणे एवढा सोपा प्रकार दुसरा कोणताच नाही. एक पैशाची काडी खूप होते भांडवल. पोलीस समोर असूनही आडकाठी आणीत नाही. यापेक्षा जास्त सुरक्षितता इतरत्र कोठे असेल ?

या होळी प्रकारात कलकत्त्याच्या बस कंपनीला दरवर्षी चार कोटी रुपयांचे नुकसान होते. काँग्रेस सरकारने हे नुकसान भरून काढण्यासाठी – फायद्यासाठी नव्हे – तिकीटावर एक पैसा दर वाढविला. केवढी धमाल उडाली तेवढ्यावरून.

संयुक्त आघाडीचे सरकार सत्तेवर आले. पहिला कार्यक्रम हा बसेसचा दर कमी करण्याचा. अबदुल रसूल हे तेथील वाहतुक मंत्री. ते डोळ्यात आसवे आणून विचारीत होते, पण हे कसे शक्य आहे ? हा चार कोटी रुपयांचा वार्षिक खड्डा आपण कसा भरून काढणार ? हे असेच चालत गेले तर सरकार जिवंत कसे राहील ?'

खरंच, हे कसे शक्य आहे !

कारण वाहतूक व्यवस्था म्हणज नुसत्या बसेस् थोडयाच असतात ?

कलकत्त्याच्या रस्त्याना या दगलीमुळे अवकळा येत चालली आहे. जेथे पहावे तेथे खड्डे दिसतात. या रस्त्यांना आज रिपेअर्सची फार जरूर आहे.

या रस्त्यावरून आपल्या गाडया फिरविणे म्हणजे कलकत्त्याच्या गरेजवाल्यांना हप्ता बांधून देण्यासारखे आहे. तेथे गाडी ठेवणे म्हणून परवडत नाही.

खरे म्हणजे कलकत्त्यात मुबईप्रमाणे लोकल रेल्वे हवी. रसूलसाहेब वर्षापूर्वी त्यासाठी ब्ल्यू प्रिंट करण्यात गुतले होते.

आज नवीन कोणतीही योजना केली की कमीत कमी पाच-दहा लाख रुपये सहज सुटतात. कॉर्पोरेशनच्या इमारती व इतर बांधकामे आजकाल वाढीस लागतात ती काय 'बहुजनहिताय व बहुजनसुखाय' असतात होय ? त्या इमारतीच्या बांधकामात अनेक खाजगी इमारतीचे काम पूर्ण होते व अनेकांची पोरे परदेशी उच्च (?) शिक्षणास धाडली जातात !

कलकत्त्याच्या राजकारणात पक्ष डझनांच्या भावाने. पैसे खाण्यात त्यामुळे स्पर्धा भयंकर. कॉंट्रॅक्टर झाला तरी तो किती जणाना पैसे वाटणार ? सर्वांनाच पैसे हवे. त्यामुळे सर्वांचीच नजर घारीप्रमाणे आपल्या सावजावर, आय मीन, कॉंट्रॅक्टरवर !

या कडक 'सुपरव्हीजन'मध्ये बघू या रसूलसाहेबांचे 'पेपर' कसे पास होतात ते !

या पेपरावरून आठवण झाली.

१६ मार्च रोजी रात्री ८ वाजता राष्ट्रपतीचे शासन प. बगालमध्ये जाहीर झाले व सर्वांनी सुटकेचा निःश्वास टाकला. त्या दिवशी राज्यपालानी दुपारी आपल्या हाती सूत्रे घेतली तेव्हापासूनच शहरात एक आगळा आनद व उत्साह दिसू लागला होता. बगालच्या लोकाना लोकशाही नको होती असा त्याचा अर्थ नाही. मार्क्सिस्टापासून एकदांचे सुटलो हाच त्याचा अर्थ.

१६ मार्च रोजी सायकाळी ७॥ वाजता अजय मुखर्जींनी राजीनामा दिला. रात्री ८ वाजता अजयबाबूंनी स्वतःच रेडियोवर तसे जाहीर केले. बाप रे! त्यावेळी लोकांची मनःस्थिती पहाण्यासारखी होती ! आता काय होईल ही भीती सर्वत्र व्यक्त केली जात होती. साहजिक आहे, 'मोर्चा सॉरकॉर तुटले तर सॉऱ्या बांगॉलला आग लावून देऊ' अशी गर्जना मार्क्सिस्टानी आदल्या दिवशी केली होती ज्योतिबसूनी, सचिवालयासमोर एक भाषण ठोकले होते त्यात मोठ्या आवेशात त्यानी सांगितले होते, 'हम सर देगे और सर लेगे भी !'

मार्क्सिस्टाचे कौतुक केले पाहिजे !

ते मुस्लीम लीगपेक्षाही भीती व दहशत निर्माण करण्यात सवाई निघाले !

मुस्लीम लीगने पूर्वी कलकत्त्यात अगदी असेच दहशतीचे वारे निर्माण करून

पाकिस्तान जिंकले होते. अशी भीती निर्माण केली होती खुद्द कलकत्त्यात की लोक म्हणत, 'काय वाटेल ते लिहून द्या या राक्षसाना, पण शांतता प्रस्थापित करा आता.'

मार्क्सिस्टांनी परदेशी शस्त्रे गोळा केली होती. १५ मार्चच्या सायंकाळी परेड ग्राउंडवर कित्येक लोक जमा झाले होते आग लावून द्यायची भाषा इथेच जन्मास आली होती. जरूर पडली तर ही शस्त्रे वापरली जातील अशी वल्गनाही होत होती. 'बंगाल बंद'ची घोषणा झाली. त्याच्या दुर्दैवाने १४ पैकी ८ पक्षांनी त्या 'बंद'ला सहकार्य देण्याचे नाकारले

माझ्या एका मित्राचा कारखाना कलकत्त्यात आहे. ह्या तांडवनृत्यास कंटाळून त्याने अर्धा तर कारखाना बडोद्यास हलविला. पण अजून अर्धा तर तेथेच आहे साहजिक आठवड्यातून एक दोनदा ट्रंक कॉल्स् येणे-जाणे चालूच असते. त्याच्या बिझनेस कॉलमध्ये माझे माहिती घेण्याचे काम आपोआप होऊन जाई. कारण रेडिओ व वृत्तपत्रे खरी बातमी कधीच देत नाहीत. खरी बातमी फक्त तेथील स्थानिक हिंडणाऱ्या व जाणकार व्यक्तीशिवाय कोणी देऊच शकत नाही. आणि ती व्यक्तीही साहसी पाहिजे! नाहीतर दंगल म्हटली की कड्या कुलुपे घट्ट लावून स्वतःला कोंडून घेणारा मित्र असला की संपलेच. काहीच खरी हकीगत कळायला मार्ग नाही. सुदैवाने, माझा मित्र साहसी, उत्साही व डोळस आहे. सगळ्यातच त्याला 'मजा' दिसते. अन् त्यामुळे त्याच्या बातमीपत्राची मी आतुरतेने वाट पहात असे-मध्यरात्री टेलीफोनवर.

पण आम्ही ठरविलेल्या रात्री या सद्गृहस्थाचा फोनच आला नाही. मनात निरनिराळ्या शंकाकुशंका येऊ लागल्या. म्हटलं, बहुधा स्वारी कोणा मार्क्सिस्टाच्या ...

पण नाही, दुसऱ्या दिवशी त्याचे वडीलच हवाई मार्गाने इथे आले. ते सांगू लागले, 'मोठी मजा आली. प्रथम कम्युनिस्टांनी तीन दिवसांचा हरताळ जाहीर केला. पण इटक, रशियावादी कम्युनिस्टस्, रि. सो. पार्टी. ससोपा, सो. यु. से. वगैरे लोकानी मदतीचा हात नाकारला. मार्क्सिस्टाचे डोळे खाडकन् उघडले. तरीही मस्ती होतीच. तीन दिवसांच्या ऐवजी एका दिवसावर घोषणा झाली. तरीही सहकार्य मिळेना. चिडलेले मार्क्सिस्ट दुसरे काय करणार? हिंसा व अत्याचार. ऑफीशीयली सदतीस लोक मारले गेले. खरा आकडा तिप्पट असावा!'

'पण परवा संघर्ष कुठे झाला?'

'म्हणजे?'

'कलकत्त्याच्या बाहेर की कलकत्त्यात?'

'जास्त करून बाहेर झाला. कलकत्त्याच्या आजूबाजूस गंगेच्या काठी सारे कारखाने आहेत. तेथे सारे मजूर वास्तव्य करतात. वाटले होते की आता खूप जुंपणार. बसेस्, ट्राम्स् व आगगाड्या यांना आगी लावल्या जाणार. आगगाड्या

उलटविण्याचा कार्यक्रम खरं म्हणणे निश्चित् झाला होता–'

'गाड्या उलटविण्याचा कार्यक्रम ?'

'हं, तो अधी निश्चित करावा लागतो. त्याचे स्पेशालीस्ट गुंड आहेत. त्याना आधी प्लॅन द्यावा लागतो. ओळखीच्या पोलीसाना ड्यूटीवर ठेवावे लागते ! पण त्या दिवशी काहीच घडले नाही. कारण बसेस्, ट्राम्स् व गाड्याच मुळी बंद होत्या. म्हणून गुंडानी चिडून प्लास्टीक बॉम्ब्स्, फॉस्फरस बॉम्ब्स्, स्मॉल गन्स् वगैरेंचा जास्तीत जास्त उपयोग केला '

'पण मागे मी कलकत्त्याला आलो होतो त्यावेळी तर हे सारे बंडल बॉम्ब्स् होते. आता ऐकतो तो–'

तुमच्या पुस्तकांची Revised आवृत्ती नसते का दरवर्षी ? तुम्ही दोन वर्षापूर्वी आला होतात त्यावेळी परिस्थिती निराळी होती. सध्या मार्क्सिस्ट सत्तेवर आहेत. त्यानी चीनमधून या बॉम्ब्स्चे तज्ञ मागविले व कलकत्त्यात बॉम्ब्स्चे प्रॉडक्शन् सुरू केले. छान असतात हे बॉम्ब्स्. अगदी हलके. पण रिझल्ट गॅरंटीड्. स्फोट झाला की इमारत हादरलीच पाहिजे माणसे घायाळ झालीच पाहिजेत.'

'म्हणजे माणसे मरत नाहीत ?'

'अ हं, घायाळ झाली पाहिजेत. कम्युनिस्टांचे टेकनिक सोपे आहे. खूप घायाळ झालेले लोक नंतर मरतात हॉस्पिटलमध्ये. बाकीचे विव्हळत असतात. त्यामुळे जाहीरात होते ना-'

'कसली जाहिरात ?'

'दहशतवादाची. त्यामुळे भीतीचे साम्राज्य पसरते. ८० टक्के जनता भित्री असते. मुकाट घरी सहन करते. आपापसात चर्चा होते. गोष्टी तिखट मीठ लावून सांगतल्या जातात. त्यामुळे धाक दुप्पट वाढतो. जीवाची अशाश्वती जास्त वाढते. कम्युनिस्टाना तेच पाहिजे असते. दे एन्जॉय इन थ्रीस क्लायमेट ऑफ् टेरर. सर्वसामान्य माणूस विरोध करायचा हिंमत करत नाही. वाटते, सोडा ना इतरांची गोष्ट. शिर सलामत तो पगडी पचास.'

'हे खरे.'

'ह्याच टेररमधून फंड गोळा केले जातात. मी काही कम्युनिस्ट नाही. फेलो ट्रॅव्हलरही नाही. पण परवा परत फिरायच्या दिवशी चार लोकांच्या डब्यात चार चार आण टाकून आलो. नाहीतर फुकट मार खाल्ला असता ! एक-दोन रुपये टॅक्स देऊन मजा पहायला मिळते, काय वाईट ? शाळेची पोरे, कॉलेजची पोरे सारे हा गुड टॅक्स् भरतात व सवत्र भटकतात.'

'मजा आहे.'

'पण विद्यार्थ्यांना वाईट सवयी लागतात. ते अभ्यास करीत नाहीत. परवा माझा मुलगा असाच लाल डब्बा रस्त्यात फिरवून आला ! साडपाच रुपये जमा केले.

खिशावर मार्क्सिस्टांचा बॅच् लावला होता, केस विचरले नव्हते व ड्रेन पाईप पॅंट घातली होती. एका बोर्डावर 'माव झिंदाबाद' हे लिहिले होते.

आनंद आहे, कॅपीटॅलिस्टाचा मुलगा कम्युनिस्ट.'

'अं हं, ते माझ्यासाठी डेमॉन्स्ट्रेशन् होते. मी म्हणालो की हे फंड फक्त गुंड लोक गोळा करतात. तो म्हणाला फक्त गुंड नाही, सारेच लोक पैसे गोळा करतात. म्हणून त्याने मला प्रात्यक्षिक करून दाखविले. बोला आता, काय रडणार आपण त्यांचे नाव! मी त्याला ओळखले नाही व आठ आणे काढून दिले!!'

मार्क्सिस्टांचे हे तरुणांना काही औरच शिक्षण आहे. हे शिक्षण आजवर कोणत्याही राजकीय पक्षाने तरुण पिढीस दिलेले नाही मार्क्सिस्टांसमोर पी. एस. पी.-संघ-जनसंघ आदि पक्ष 'अहिंसा परमो धर्मः' म्हणणाऱ्या गांधीजीच्या काँग्रेसप्रमाणे मवाळ भासू लागतात.

याचा पुरावा पहायचा असेल तर मार्क्सिस्टांनी ज्या वर्षा-सव्वा वर्षांत धाडी पाडल्या त्याचे कोष्टक पेश करतो.

| | | | |
|---|---|---|---|
| १-७-६८ | पार्क पोस्ट ऑफीस (कलकत्ता) | लूट | रु. ३,९७,९५० |
| २२-१०-६८ | " " " | " | रु. १,१२,११८ |
| २-४-६९ | नॅशनल अँड ग्रीडलेज् बँक | " | रु. १,५३,७०० |
| | अलीपूर " | " | रु. ११२,००० |
| १५-१०-६९ | अलीपूर " | " | रु १,१२,००० |
| १२-१२-६९ | पार्क स्ट्रीट बँक (कलकत्ता) | " | रु. ४७२,००० |
| १३-१२-६९ | जे. के. नगर, असनसोलजवळ | " | रु. १,१२ ००० |
| १८ महिने | फक्त पाच संस्थांची लूट | | रु. १४,७१,७६८ |

या गडबडीत औद्योगिक उत्पादन तीस टक्क्याने घटले आहे.

पण त्याची काळजी कम्युनिस्टांनी का वहावी? त्यांना आनंदच वाटेल.

असंतोष वाढला तर त्यांना हवाच आहे. तो त्यांना फायदेशीर ठरेल

पूंजीपतीच्या विरुद्ध बोंबाबोंब करण्यासाठी त्यांना आणखी पुरावा मिळेल.

उदाहरणार्थ 'स्टेट्स्मन' (३ मार्च ७०) मधील बिर्लाजीची ही 'क्लोजर'ची पुढील जाहिरात पहा:

'२३ फेब्रुवारी १९७० रोजी साऱ्या कामगारांनी काहीही न सांगता एकदम काम बंद केले. त्यांनी नोकर, कारकून व अधिकाऱ्यांना घेराव केले. त्यांना ठार मारण्याची धमकी दिली. त्यांना हाकून लावण्यात आले. दुसऱ्या दिवसापासून कंपनीत शिरायची परवानगी मजूर अधिकाऱ्यांना देईनात. अधिकाऱ्यांना रोज टेलिफोनवर धमक्या येतात. या कंपनीत काम करणे कोणासही अशक्य आहे. त्यामुळे ही कंपनी पुढील जाहिरात येईस्तोवर बंद राहील.'

त्याच स्टेटस्मनमध्ये ९, कालीप्रसन्न सिंघी रस्त्यावरील इलेक्ट्रीक कन्स्ट्रक्शन अँड इक्वीपमेंट् कंपनीची 'क्लोजर'ची जाहिरात पहा.

"Due to administrative and commercial reasons beyond our control the management regret to announce its decision to close down its establishment at 10, Camac Street, Calcutta – 17."

माझ्या कारखानदार मित्राचे वडील मला म्हणाले, 'ह्या बिर्ला–डालमियाचे ठीक आहे. ते लोक पाच हजाराची स्टेट्स्मनमध्ये जाहिरात देऊ शकतात. पण आम्ही छोटया व्यापाऱ्यानीं काय करायाचे ?'

'कलकत्त्याहून जागा बदलून –'

'ते पुन्हा टाटा बिर्लांना शक्य आहे. टेल्को पुण्यास आली. गव्हर्नरची सत्ता येताच बिर्लाजींनी त्यांची मदत घेऊन रातोरात आपली मशिनरी व कागदपत्र हालविले. आम्हाला सर्वच बाजूनी त्रास आहे.'

'कसा काय ?'

'कलकत्त्यास कसा आमचा संसार सेट् झाला होता ! मी प्रथम विचार केला की कारखाना पाटण्यास न्यावा. पण आमच्या कच्चा मालाचा पुरवठा साऱ्या बिहारमध्ये कोठेच होत नाही. म्हणून नागपूर पसत केले. तर हवामान फार उष्ण व कोरडं पडते. चालत नाही. मुंबई सर्वात चांगले स्थळ. पण जागाच मिळत नाही ! म्हणून बडोद्यास आलो. निदान मुंबईच्या लोहमार्गावर तर खरे. पण कच्चा माल मुंबईहून मागवायचा. म्हणजे महाग पडणार. म्हणजे आमची तयार मालाची किंमत वाढली. कसा तो टिकणार स्पर्धेत ? कलकत्त्यात इतक्या वर्षांच्या ओळखीमुळे कर्जाच्या सवलती होत्या. त्या नव्याने इथे निर्माण व्हायच्या. एकंदरीत हाल आहेत.'

'तुमचे एकट्याचे का सर्वांचे ?'

'सर्वांचेच ! पण मोठ्या पुंजीपतींची कमाल आहे. ते कोठेही गेले तरी त्यांची गरज सर्वांनाच आहे. मग कम्युनिस्ट असोत. का कॉंग्रेसवाले असोत. मोनोपोली धंदा असल्यामुळे ते म्हणतील ती किंमत ? न विकत घेऊन जाल कोठे ?'

'कारखानदारांप्रमाणे मोठ्या जमीनदारांची चंगळ असेल नाही का ?'

'अगदी खरं आहे, अगदी मोठ्या जमीनदारास हे नक्सलाईट हात लावीत नाहीत.'

(क्रमशः)

## राजीव एलकुंचवार




आजचा दिवस काही वेगळा आहे असं चंद्राबाईंना मुळीच वाटत नव्हतं. त्यांना किंचित हसू आलं आणि त्या चपापल्या. आपल्याला आता 'असं' हसणं सोडायला हवं हे त्यांना परत जाणवलं. खुपलं.

त्या ह्या घरात आल्यापासनं त्यांनी ही बैठकीची पूर्वेकडची खिडकी कधी उघडी पाहिलीच नव्हती. बैठक नेहमी कुबट प्रकाशानं अर्धवट भरलेली अशी वाटायची. त्या तरातरा गेल्या आणि त्यांनी तिची सगळी दारं सताड उघडली. जुन्या वळणाची प्रशस्त, नक्षीदार शिसवी दारं किंचित अभद्र करकरली आणि नाईलाज झाल्या-सारखी उघडली. पण बैठक विशेष उजळली नाही. बाहेर हवा कुंद होती. सगळं आभाळ दाटून आलं होतं. मघापासनं पाऊस पडेल असं वाटत होतं.

काल रात्री शामरावाचं मर्तिक आटोपून वासू परत आला तोच चकचुकत. त्यांनाही त्यात अर्थ वाटला होता. काहीही असलं तरी शामरावाचं मढं पूर्ण जळायला हवं होतं असंच त्यांनाह वाटलं होतं. ऐनवेळी पाऊस आल्याने, जे काही चार दोन लोक पोचवायला गेले होते ते अर्धवट, विझलेलं सरण सोडून देऊन तसेच



माघारी आले होते.–आणि आता मात्र पाऊस येत नव्हता.

एक निःश्वास टाकून त्यांनी त्या शेवाळी विचारांवर पोतेरे फिरवले. त्या स्वयंपाकघराकडे वळल्या तरी त्यांची नजर बैठकीतनं हलायला तयार नव्हती. लोडाला टेकून काटकिळा शामराव तक्तपोशीवर बसला आहे असंच त्यांना वाटत होतं. तक्तपोशीवर विड्यांची दोन तीन थोटकं पडली होती. शामरावाचा शेवटचा षौक–त्यांच्या मनात आलं. आयुष्यभरात त्यानं काही करायचं शिल्लक ठेवलं नव्हतं. बायकासुद्धा–त्यांचा श्वास अडखळला.

एक दिवस कसल्या झटक्यात कोण जाणे त्यानं त्यांच्याशी लग्न केलं आणि त्यांना या वाड्यात आणून ठेवलं. त्या दिवसापासून त्या जगाला आणि जग त्यांना तुटलं. लोकांच्या बोलण्याची त्यानं कधीच पर्वा केली नव्हती. तेच पुन्हा दिसलं. त्यांना स्वतःला जाणवलं.

बाकी चंद्राबाई खुष होत्या. त्याच्या शेतीचं रगड उत्पन्न होतं. आतापर्यंत पैशाखेरीजकरून त्यांना काहीच हौस उरली नव्हती. तीही आता पूर्ण झाली होती.

शामरावानं त्यांच्याशी कशाला लग्न केलं होत ह्या मात्र प्रश्नच होता. रोज नवे पाणी जोखायची हौस—एखाद वेळी शुद्धीत असलाच तर चार-दोन शब्द बोलायचा तेवढेच. उकिरड्यावरून अ.ढून घरात घेतल याचेच त्याचे त्याच्यावर अनंत उपकार झाले होते.

"चंद्रे ऽऽ"

परसातन हाक आली तशी त्यांचं डोकं तापलं. ही थेरडी मात्र त्यांना अजूनही ह्याच नावान हाक मारीत असे. आणि तिच्या प्रत्येक हाकेबरोबर नरकाच्या आठवणी त्याना आतपर्यंत पोखरीत जात. परत आलेल्या हाकेसरशी त्यांची तंद्री भंगली.

जाताजाता त्यांची नजर नेहमीप्रमाणे आरशाकडे वळली आणि त्या थबकल्या. संवयीप्रमाणे त्यानी केसाचं वळण बघितल; पदर नीट केला आणि त्या ओल्या कुकवाची डबी शोधायला लागल्या. आणि त्याच्या परत लक्षात आल. त्यांचा नवरा कालच मेला होता.

त्यांना काहीच वाटलं नाही. अलिप्ततेनं त्यांनी स्वतःकडे बघितलं. अं हुं. त्यांना मुळीच दु.ख होत नव्हतं. उलट आनंदच थोडाफार. कुणी मधेमधे करायला नको. काल शामराव मेला तेव्हापासून जणू त्यांचं नव आयुष्य सुरू झालं होतं, फुलारत होतं आणि त्या धुंदीतच त्या वावरत होत्या. तरंगत होत्या.

थेरडीच्या हाका बंद झाल्या होत्या. रोज सकाळी उन्ह अगदी कडक होईस्तवर ती परसातच असायची. आज काय गुलबासाला फुल आली; परवा काय चाफ्याची फांदी मोडली अशाच प्रकारचं काहीतरी जोरजोरानं हाका मारून परसातनंच सांगायची आणि चंद्राबाईंनी नुस्त मागच्या दारात डोकावल तरी घरात येऊन चूप बसायची. तिला चंद्राबाईंनी कधी 'थेरडी'शिवाय हाका मारले नव्हते. त्यांना तिची मनस्वी चं.ड यायची. शामरावची ही मोठी बहीण. विधवा झाल्यावर माहेरपणाला आली ती इकडेच राह्यली. चंद्राबाईबरोबर शामरावाने लग्न केले तेव्हा सगळ्यात कुणाचे तोंड वाजले असेल तर हिचेच. बाकी कुणा नातेवाईकाला अर्थातच शामरावाबद्दल काही वाटत नव्हतं. पण जी मंडळी वाटतं असं दाखवीत त्यात हिचा—लक्ष्मीबाईचा—पाय सगळ्यात पुढे राही. चंद्राबाई घरात आल्याबरोबर—"आता मेली इथे पाणी प्यायची सोय नाही राह्यली, राडाच घरात यायला लागल्यावर म्हणणार काय कप्पाळ? आणि कुणी?—" आणिक असच काही बडबडत मुलाकडे निघून गेली होती. आणि मुलानं हाकून दिल्यावर दोनच महिन्यानी परत आली होती. पण आल्यावर मात्र त्यांना चंद्राबाईंवर मालकी हक्क फारच थोडे दिवस गाजविता आला. लग्न झाल्यापासून चंद्राबाईंना नाहीतरी एकटं वाटतच होत. त्याना कुणीतरी हवच होत सोबत. सुरुवातीला त्यानी पटवून घेतलं आणि जाच सोसायचा कटाळा आला तेव्हापासून तिला 'थेरडी' म्हणायला सुरुवात केली. ते व्रत त्या आजतागायत पाळीत आल्या होत्या.

नेहमीप्रमाणेच चंद्राबाईंनी मागच्या दारातून तोंड केल्यावर लक्षुंबाई धापा टाकीत घरात आली आणि मुक्ताफळे उधळीत स्वयपाकघरात टेकली. चंद्राबाईंना उगीचच तिची कणव आली. त्यानी दारातून डोकावून पाह्यलं. चुलीजवळ दोन्ही हात टेकून त्या खोकत बसल्या होत्या. चुलीतल्या जाळाची लालसर कड कुठेकुठे त्याल्या शेवाळी पातळावर चमकत होती.–आणि त्या अगदी बेडकीसारख्या दिसत होत्या. बेडकी. चंद्राबाईंना हसू अगदी अनावर झालं आणि ते आवरण्याच्या फंदात त्या पडल्या नाहीत. अचंब्याने बघणाऱ्या वासूकडे आणि त्या म्हाताऱ्या बेडकीकडे लक्ष न देता त्या सोप्यात आल्या. एका जुनाट खांबाला ओठंगून त्या अंगणातल्या गुल्मोहोराकडे एकटक बघू लागल्या. वार प्यायल्याप्रमाणे तो अंगोपांगी फुलून आला होता. लाल पिवळ्या ठिपक्यांचा शिडकावा लेऊन तो मत्त दिसत होता. त्याच्या बुंध्याला वाळवी लागल्याचे चंद्राबाईंच्या कालच लक्षात आले होते आजही ते त्याना जाणवले. एक काडी उचलून त्यानी तो मातकट थर काढून टाकायचा प्रयत्न केला आणि एक-दोन मोठे ढलपे पडल्यावर तो नाद सोडून दिला.

"चंद्रा आई ऽऽ. मला चहा ऽ–"

घरातन हाक आली आणि त्या चिडल्या. ही दुसरी डोकेदुखी. त्या तडक आत जायला वळल्या. आणखी थोडा वेळ केला की कमी बाहेर येणार...येता येता हजारदा अडखळणार...एखाद वेळ पडणार...आणि मग त्याना तिला उचलून आत न्याव लागणार. ही सगळी घाणेरडी माळ त्यांना टाळायची होती. शाम-रावाच्या पहिल्या बायकोची ही आधळी पोरगी. आपल्यावर ती कशाला जीव लावते हे त्याना कधीच कळलं नव्हत. त्यानी कधीच तिला नीट वागवलं नव्हतं. पण तिला मात्र तिन्ही त्रिकाळ चंद्राआई लागत होती. तिचा लाघटपणा त्यानी एखाद वेळेस खपवनही घेतला असता; पण तिच्यात त्यांना उगीचच त्याची सवत दिसायची. त्या जाणून बुजून तिच्याकडे दुर्लक्ष करायच्या.

त्या स्वयपाकघरात आल्या तेव्हा कमी चहाचा कप समोर घेऊन बसली होती. आपण तिला चहा ओतून दिला नाहीतर तर ती तस्सा अर्धा तास घालवेल–भराला आणखी वेडपट चाळे–हे त्यांना माहीत होतं. त्यानी मुकाटयान पण त्रासिक चेहेऱ्यान तिला चहा ओतून दिला.

"दूर..दूर." करीत लक्षुबाई बाजूला झाली. "आता आघोळही तूच घालून दे झालं. मी परत विटाळ करून नाही घेत." म्हणत त्या स्वयंपाकघराबाहेर गल्या तेव्हा त्यांना अघोळीची आठवण झाली.

अनावर चिडीनं त्यानी कमीच्या थोबाडीत मारली.

'कार्टे, किती चहा सांडावलास तो. बाप येणार का तुझा–" त्या किंचित अडखळल्या. त्याना स्वत:चीच चीड आली. आजसुद्धा त्यांना मनासारखं वागता येणार नव्हतं. नाइलाजानं त्यांनी तिच्या बकोटीला धरून जवळजवळ ओढीतच न्हाणी•

घरात नेऊन आपटलं. वाश्याला पाणी काढायला सांगून त्या कपडे आणायला आत गेल्या, कपडे लवकर शोधता येत नाहीत म्हणून लक्ष्मीबाईवर चिडल्या आणि न्हाणीघरात परत आल्या. कमी गोटयावर तालात पाय आपटत उगीचच बावळट हसत, लक्ष्मीबाईनी शिकवलेली घाणेरडी भपाळी म्हणत बसली होती. त्यांनी दोन धबके तिच्या पाठीत घातले आणि–" अकरा वर्षाची झालीस घोडे, अजून आंघोळ नाही करता येत. " वगैरे ओरडत तिच्या अगावर कसेबसे बादलीभर पाणी ओतले. समाधानाचा श्वास सोडून " आजीकडून कपडे गिपडे घालून घे. जा. " म्हणताना त्यांना त्यांचा आवाज उगीचच ओशट झाल्यासारखा वाटला.

त्याची स्वत.ची आंघोळ आटोपायला खूपच उशीर झाला.

वाळत घालायचं पातळ हातावर घेऊन मघापासून त्या तांब्याच्या बंबावर निथळणाऱ्या एका थेंबाकडे बघत निश्चल उभ्या होत्या. तो थेंब खाली उतरायची शक्यता संपली तशी त्याना किंचित जाग आली.

" बाहेर कोनी बसल हाय बाई. बाईच बघून घ्या. "

वाश्यानं असं म्हटलं तेव्हा त्याना नाही म्हटलं तरी नवलच वाटल. शामराव मेल्याचं कुणाला काही वाटलं असेल अस त्याना वाटलं नव्हतं. दाराच्या आतनं त्यांनी त्याच खिदळणं ऐकल. पण त्या बाहेर आल्यावरोबर दोघांनी चेहरे गभीर केले. झोपाळ्यावर पाटील बसले होते, आणि खाली एका खाबाला टेकून चरण. त्या दोघांच्या येण्याचा उद्देश त्यानी ओळखला नव्हता असे नाही. पण त्यांच्याच तोंडून वदवून घेण्यात थोडी गंमत आली असती.

खूप वेळ वाट पाहून पाटलांनी बोलायला सुरुवात केली –

" शामराव गेला. वाईट झालं. चागला माणूस. "

चंद्राबाईंना त्याच्या तोंडात चमकवावीसे वाटले. उगीचच चोपडेपणा भलत्या जागी काय कामाचा ? आणि शिवाय आत्ता त्यांना मोकळेपणा हवा होता. ही भानगड शक्य तेवढी घराबाहेर काढावी असे त्याना वाटत होते. पाटलानी परत बोलायला सुरुवात केल्यावरोबर त्यानी तडकावलं –

" पाटील काय ते मतलबाचं बोला. उगीच लावण लावू नका. "

" आवडलं. आवडलं आपल्याला. " चरणकडे पहात पाटील गडबडीनं पुढे म्हणाले, " तेवढं पैशाच बघून टाका. परत खेटे मारायला नकोत. काय ?"

" किती पैसं आहेत ? आणि कशाचं ?" त्यानी उगीचच विचारल. पाटील शामरावाला बाटल्या पुरवायचा हे त्याना माहीत नव्हत अशातला भाग नव्हता.

" आता कशाचं ! काय सांगायचं ? आणि तुम्हाला ? नको. त्यापेक्षा –" पुढचं बोलण हसण्यात विरघळवीत त्यानी साभिप्राय चरणकडे पाहिलं. तोही उगीचच हसल्यासारखं रेकला. त्याच्याकडून अर्थातच जास्ती अपेक्षित नव्हत.

पाटलाचा गुरखा. सगळ्यांना माहीत होतं पाटलाच्या धंद्यात त्याचा अर्धा वाटा आहे म्हणून.

" एक–दीडशे रुपयांची सोय करून टाका म्हणजे झालं. " भीत भीत पाटलांनी शेवट करून टाकला.

" उद्या वाशाबरोबर धाडते. तुम्ही आता या. "

चंद्राबाईंनी सरळ निकालात काढलं तेव्हा आ वासून दोघही बघतच राहिले आणि भान आल्यावर लगबगीनं तिथून सटकले. दरवाज्याजवळ चरणनं " पाटील, हमने पचासच मंगना था. " म्हटलेलं आणि त्यावर पाटलाचं खिकाळणं त्यांनी ऐकलं तेव्हा त्यांची बैठक इतक्या लवकर कशी आटोपली हे उमजलं.

कंटाळलेल्या पावलानी त्या आत आल्या आणि " थेरडे ऽ – मी जेवत नाहीय् आज. " म्हणत पुन्हा बाहेर आल्या. गुल्मोहोर त्याना खुणावीत होता आणि त्या भारल्यासारख्या त्यांच्याकडे बघत, पावसात भिजायला कसं वाटेल याचा विचार करीत होत्या.

किती वेळ कुणास ठाऊक. पण मग एकदम त्या दचकल्यासारख्या भानावर आल्या. दारातनं नागू येत होता. – नागोराव. त्याचं लग्न व्हायच्या आधी त्यांची कामं करायचा. लग्न झाल्यावर चारदोनदा त्यांच्याकडे पैसे मागायला आला होता. त्यानंतर आजच उगवत होता. त्यांच्या डोक्यात तिडीक उठली. आजचा दिवस चांगला जायचा नव्हता. येता येता त्यानं दाताड विचकलं आणि येतायेता गुल्मोहोराचा एक घोस खुडून घेऊन त्यातली एक एक पाकळी वेगळी करत हळूहळू पावलं टाकीत तो आत आला. सोप्यातल्या बाकावर दोन्ही पाय वर घेऊन तो टेकला. उरलेली फुलं चुरगळून टाकत त्याने बोलायला सुरुवात केली.

" तुला वाटलं तर तिकडे निरोप पाठव. " त्यानं सरळ विषयालाच हात घातला. पाचकळ हसत तो पुढे म्हणाला, " अजून चांगली दिसतीस की. कालच प्रवीन शेट आलते. चद्रीले विचार म्हनले –"

त्याना काही ऐकूच येत नव्हत. जळत्या चितेवर उभं असल्यासारखं कायससं वाटत होत. टेबलवरचं ताब्याभांड त्यांनी हेरलं होत.

– भांड त्याला कुठे लागलं ते बघत बसायला त्याना वेळ नव्हता. धडधड पावले टाकीत त्या आत आल्या आणि माजघरात जोरजोरात गाणी म्हणत बसलेल्या कमोला त्यांनी गच्च पोटाशी धरलं. त्यांना भरून आलं होतं.

बाहेर मुसळधार लागली होती.

□ □ □

# पण ऐकतं कोण

सौ. उषा डांगे

एखाद्या पुस्तकाकडे पाहाण्याचे विविध मार्ग असू शकतात. वाङ्मयीन दृष्टीने एखादा त्याकडे पाहील, एखाद्याला त्यातील समाजदर्शन अगर राजकारण मोह घालील व एकाच विशिष्ट मार्गाने त्या पुस्तकाचा विचार करून त्या पुस्तकाची महत्ता पटवून देऊ शकेल.

'पण ऐकतं कोण–'च्या लेखिका आहेत सुप्रसिद्ध कम्युनिस्ट नेते कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्या पत्नी, सौ. उषा डांगे. अर्थातच सौ. डांगेंच्या पुस्तकाचा व खास करून आत्मचरित्राचा विचार करताना श्री. श्री. अ. डांगे यांच्या कार्याचा अगर कार्यातील यशापयशाचा विचार करण्याची आवश्यकताच नाही. कारण माझा दृष्टिकोण येथे फक्त वाङ्मयाच्या विद्यार्थ्याचा आहे. डांग्यांचा राजकारणाशी आलेल्या संबंधापेक्षा त्यांचा लेखिकेशी असलेला संबंध वाङ्मयीन दृष्टिकोणातून

## 'डी, संप, चळवळ, कामगार, पार्टी, रोझा, कॉम्रेड....'

महत्त्वाचा आहे. म्हणजे श्री. डांगे हे राजकीय दृष्टीने कितीही श्रेष्ठ असले (अगर नसले) तरी त्यांचा सौ. डांग्यांच्या आत्मचरित्राचे परीक्षण करताना फारसा विधिनिषेध नाही. तर लेखिकेचा पती, एक कुशाग्र बुद्धीचा, मेघदूतातले श्लोक पत्नीला पत्र म्हणून पाठविणारा असा 'माणूस' होय. एक 'व्यक्तिमन' होय. या व्यक्तिमनाच्या भाव-भावनांची संमिश्रता, अटळता व जिवंतपणा यांचा अधिक विचार करायला पाहिजे.

सौ. उषाबाईंच्या जन्मापासून (इ. स. १८९८) त्यांच्या युरोपच्या पहिल्या दौऱ्यापर्यंतचा (इ स १९५३) कालखंड या पहिल्या भागात आला आहे.

प्रथम–भागात सौ. उषाताईंच्या आयुष्याचा जो कालखंड आला आहे, त्यात खूपशा गोष्टी पार्टी, डी. (श्री. अ. डांगे,) चळवळी, कामगार, मुंबई–बंद, डींचा तुरुंगवास, गिरण्या व त्यांचे 'बंद' याच्याच आहेत.

पण डीच्या जीवनात येण्यापूर्वीचा जो भाग या आत्मचरित्रात आला आहे, त्याचा (अर्थातच) पार्टीशी काहीएक संबंध नाही.

पहिल्या दोन प्रकरणात लेखिका आपले बालपण, प्रथम-विवाह (श्री. आगलावे यांच्याशी,) सासरचा जाच व वैधव्य एवढया गोष्टी सांगते व त्याच (दुसऱ्या) प्रकरणात आपली बग्याशी ओळख झाली, असे सांगते. (बग्या म्हणजेच कॉ. डांगे) व या ओळखीनेच लेखिकेच्या मनात एक बंडखोरवृत्ती जागृत झाली. १९२० च्या आसपासच्या काळात एका मागे आलेल्या स्त्रीने हट्टाने घर सोडून जाणे व सेवा-सदनात शिक्षणासाठी दाखल होणे हे निश्चितच धाडसाचे होते.

सत्तावीस साली लेखिकेचा डांग्याशी विवाह झाला व तेव्हापासूनचा जो काल (१९२७ ते १९५३) या पुस्तकात आला आहे त्यात सौ. उषाबाई व पार्टी यांचीच वर्णने अधिक आहेत.

तसे ते अपरिहार्य होतेच. कारण लेखिकेचा पती होता एक अग्रेसर कम्युनिस्ट पुढारी, बुद्धिवान्, व जागतिक-प्रसिद्धी लाभलेला कामगार-पुढारी. अशा लोकांचा संसार हा 'सार्वजनिक-कार्या'चाच बव्हंशी असतो.

उषाबाईंचा पार्टीशी मग संबंध आला. त्यांना राजकारणाची गती कितपत आहे किंवा त्यावेळी होती, हा प्रश्न येथे अप्रस्तुत आहे. पण त्यांची अवस्था 'गाड्या-बरोबर नळ्याची-' अशीच झालेली दिसते. डांग्यांबरोबर उषाबाईही सभा संमेल-नाला जाऊ लागल्या, संघटनेत लक्ष घालू लागल्या व त्यांच्या मताप्रमाणे त्या 'कामगार वर्गाच्या लोकप्रियतेच्या लाटेवर आरूढ झाल्या.'

१९२७ ते ५३ या कालखंडातील पार्टीच्या संबंधातील त्यांचे कार्य या पुस्तकाचा जवळजवळ सर्व भाग व्यापते. तसे ते व्यापते म्हणून फारसे काही बिघडत नाही. पण आपण वाचतो ते सौ. उषा डांगे यांचे आत्मचरित्र की कम्युनिस्ट पार्टीच्या कामगार चळवळीचा वृत्तांत हे जेव्हा कळेनासे होते तेव्हा विचार करण्याचा प्रश्न संभवतो.

यावर असा आक्षेप संभवेल की ज्या व्यक्तीचे सर्व आयुष्यच चळवळ, लढा, कामगार, संप यांच्यात गेले आहे, तिने आत्मवृत्तात त्याविषयी न लिहिता दुसरे काय लिहावे ?

इथेच आत्मचरित्र व इतर वाङ्मय याच्यातला भेद स्पष्ट होतो. चळवळ, लढा, संप यात गुंतलेली, कार्य करणारी व्यक्ती ही प्रथम माणूस असते व नंतर ती कार्य-कर्ती अगर 'जागतिक ट्रेड युनियन फेडरेशनच्या' व्हिएन्ना मधल्या परिषदेत व्याख्याती असते. जगाकडे, त्यामधल्या विसंगतीकडे, अॅब्सर्डिटीकडे, डोसळपणे पाहणे, त्याचा आपल्या कुवतीप्रमाणे अर्थ लावण्याचे धाडस करू पाहणे व या सर्व समाज-चक्राचे अगतिक रहाटगाडगं पाहणे व त्याच्या चिकित्सेचा प्रयत्न करणे हे जिवंत मनाचे लक्षण असते. उषाताई प्रत्येक ठिकाणी अशी संधी टाळतात किंवा त्या सग-


ळयाचे एक प्रखर रेखाटण करण्याचे दूर ठेवतात. केवढी मोठी संधी लेखिकेला याबाबतीत होती...! कामगार, त्यांची दुःखे, मने, हेवेदावे याच्याशी लेखिकेचा फार जवळून संबंध आला. पण त्याचा फारसा उपयोग तिला करून घेता आलेला दिसत नाही. काही ठिकाणी असेच कामगारवर्गाच्या स्थितीवर अचूक बोट ठेवले आहे, पण त्यानंतरच खरे वाङ्मयीन—महत्त्वेचे काम असते. त्यावेळी नुसत्या प्रस्थापित राजसत्तेविरुद्ध बोलून भागत नाही.

पुस्तकात काही प्रसंगातून अशा प्रकारचे सुंदर, लक्षात राहाण्यासारखे लेखन झाले आहे अगदीच नाही असे नाही.

उदा. लहानपणी सासरी झालेला छळ, त्यावेळी वैधव्यानंतर वाटलेली अगतिकतेची जाणीव, सेवासदनात जायचे की नाही याच्याबद्दल मनात झालेले द्वंद्व, के. ई. एम् मधली रुग्णसेवा, डींची साथ, त्यांची प्रेरणा, डींविषयची कृतज्ञता, स्वतःचे घडपडीचे, अस्वस्थतेचे आयुष्य, रोझावरचे संस्कार, कमल दोंदेचा मृत्यू, डींची अलिप्ततेची वृत्ती, फाळणीच्या वेळचे रणकंदन इ. इ.

या सर्वच प्रसंगात उषाबाईंची लेखणी अत्यंत कातर, हळुवार होते व नेमके असेच प्रसंग हे आत्मवृत्ताचे खरे वैशिष्ट्य आहे.

दुर्दैवाने असे सगळीकडे घडलेले नाही.

त्यातल्यात्यात एक आनंदाची गोष्ट अशी की पुस्तक चळवळ–संप इत्यादींनी रूक्ष झाले असले तरी त्याला अहंतेचा अगर पक्ष–प्रचाराचा दर्प येत नाही. खरोखरच आश्चर्य वाटण्यासारखी ही घटना आहे. काही ठिकाणी प्रस्थापित शासनाविरुद्ध लिहितानासुद्धा त्या पार्टीविषयी नको त्या अभिनिवेशाने काही लिहीत नाहीत. असे का झाले हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. (जो येथे अप्रस्तुत आहे.) पार्टीच्या चळवळी व संप हेच ज्या पुस्तकात प्रामुख्याने आहेत त्यातही (क्वचित् एखादा अपरिहार्य अपवाद सोडून) आग्रहीपणा, प्रचार येऊ नये यासाठी सौ. डांगे अभिनंदनास पात्र आहेत.

१९५३ पर्यंतच्या ह्या पहिल्या भागाचे स्वरूप असे आहे. उतारवयाकडे झुकलेल्या सौ. उषाताई डांग्यांचा, दुसरा भाग लिहिण्याचा मनोदय दिसतो आहे. व त्यात आपण एवढीच अपेक्षा करायची की कम्युनिझम हेच तुमच्या आयुष्याचे ध्येय हे आम्हाला मान्य आहे पण त्या कम्युनिझमने माणूस, माणसामाणसातले अंतर, माणसाचे निर्जीव यंत्र करून टाकण्याची व सर्व स्वातंत्र्यच जणू हिरावून घेण्याची जी पक्षाची शक्ती आहे त्याचा त्या विचार करतील काय? कामगारांमधली प्रसिद्धी तो तसा विचार करताना अफूप्रमाणे वाटता कामा नये. मला वाटते सत्तरीपलीकडे जाऊन असा विचार केल्यास त्यांना 'पण ऐकतं कोण –' अशी तक्रार करण्यास जागा उरणार नाही.

(जाता जाता प्रस्तावातल्या अशुद्धाबद्दल! मुद्रित मजकूर शुद्ध व्हावा यासाठी मुद्रक, लेखक, सर्वांनीच दक्ष असायला हवे. कारण 'माझ्या हातून असं काय मोठं झालय् की ते मी आठवून सांगावं?' या वाक्यात शेवटच्या 'व'वरचा अनुस्वार वाक्यात इतर ठिकाणीही नको होता काय? प्रस्तावनेत असे बरेच अनुस्वार संप करून गेले आहेत. इतर पुस्तकात मात्र ते कामावर रुजू झाले आहेत.)

एकूण, 'पण ऐकतं कोण –' (शीर्षकाला तसा खास सिग्निफिकन्स नाही.) हा सौ. उषा डांगे यांनी केलेल्या कामगार चळवळीचा रूक्ष, कंटाळवाणा, तपशीलवार वृत्तांत आहे, 'रिपोर्ताज'च्या कुंपणांना ओलांडून तो एका पातळीवर जाऊ शकतच नाही.

– सु. म. घाटे

[पण ऐकतं कोण (भाग पहिला) : सौ. उषा डांगे : अपूर्व प्रकाशन, मुंबई]



# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## ▫ मिनीस्कर्टमधली लघुकथा

मिनीस्कर्टने प्रारंभ झालेल्या आजच्या मिनीयुगात किंचित – कवींनी मिनी-साहित्याची दिशा दाखवली होतीच. तिचा आता एक नवीन आविष्कार कलकत्त्यात पहायला मिळू लागला आहे, व तो म्हणजे फक्त तीन-चार इंच लांब-रूंद असणारी मिनी-मासिके. अशा एका मासिकात पुढील मिनी-लघुकथा (लघु-कथेची नात म्हणाना ! ) नुकतीच प्रसिद्ध झाली आहे : दोन वाघ, एक शिकारी. एक वाघ, एक शिकारी. एक वाघ. ' आता बोला ! बाणभट्टापासून खांडेकरांपर्यंत अन् शेक्सपियरपासून सॉमरसेट मॉमपर्यंत सगळे बाद आहेत या अक्षर-वाङ्मयापुढे – म्हणजे जेमतेम पंधरा-वीस अक्षरांच्या वाङ्मयापुढे. हे असे आटोपशीर वाङ्मय लिहिण्याची सुबुद्धी पूर्वीच्या मंडळींना झाली असती तर साहित्य विषय घेऊन बी. ए. होणाऱ्या अस्मादिकांसारख्या परीक्षार्थींची किती बरे सोय झाली असती ! निदान आता तरी त्यांची ही चूक सुधारण्याचा प्रयत्न करून पहायला काय हरकत आहे ? हा प्रयत्न करून पहायला कोणी ' महान् ' साहित्यकार नको, मिनी हवा, म्हणूनच अस्मादिकांचा हा प्रपंच :

शाकुंतल : एक राजा, दोन हरिणी. एक अंगठी, एक पाम्प्लेट. एक मुलगा, वाघाची ' दंत 'कथा. मेघदूत : एक एअरमेल लव्हलेटर. एअर-भारतचा सविस्तर फ्लाइट-प्लॅन. पद्य-भूगोल. हॅम्लेट : एक प्रश्न, अनेक उत्तरे. एक पुतण्या, काकी स्वतःला वाचवा. रोमियो अँड ज्युलिएट : दोन बिऱ्हाडांच्या नळावरच्या भांडणाची ऐतिहासिक आवृत्ती. रामायण : बायकोला वचन देण्याचा मूर्खपणा करणारा व त्याप्रमाणे वागण्याचा महामूर्खपणा करणारा एक राजा. जगातले पहिले किड्नॅपिंग. रामाच्या व धोब्याच्या आजतागायत चाललेल्या वैराचा प्रारंभ. महाभारत : जुगारात बायको हरणारा अधर्मराज. कृष्णाचा शिष्टपणा. अठरा दिवस दंगा. रात्री कर्फ्यू. शेवटी एकट्या कुत्र्याचे स्वर्गीय जिणे.

## ▫ कुमारिकांचे प्रकार : विवाहित व अविवाहित

हॉलंडमध्ये एकांतिक समतावादी स्त्रियांची एक संघटना आहे, तिने म्हणे अशी चळवळ आरंभली आहे की अविवाहित स्त्रियांच्या नावापुढचा 'कुमारी ' हा शब्द काढून टाकण्यात यावा. आता काय म्हणावे या बायकांना ! देवाने माणूस निर्माण

केला, पण माणसांचे पद्धतशीर वर्गीकरण करायचे तो विसरून गेला, त्यामुळे साहेबाने डोके चालवून पुरुष-वर्गाचे दोन प्रकार पाडले – मेन आणि जंटल्मेन. बायकाचे कु. व सौ. हे प्रकार साधारणपणे सर्व जगभर प्रचलित आहेत. – फक्त अमेरिकेतल्या सूक्ष्म बुद्धीच्या मडळींनी या ढोबळ प्रकारावर समाधान न मानता कुमारी, सौभाग्यवती, घटस्फोटिता, विभक्ता व विधवा अशी तपशीलवार वर्गवारी केली. पण त्याच अमेरिकेतल्या सिनेमा-नट्यांनी चार चार पोरे (– चुकलो ! चार चार नवरे) हयात असताना स्वत:ला कुमारी म्हणवून घेऊन सर्व-साधारण कुमारिकाची कुचबणा केली. कारण शांतता म्हणजे दोन युद्धांच्या मधला काळ या आधुनिक म्हणीप्रमाणे कौमार्य म्हणजे दोन नवऱ्याच्या मधला इंटर्व्हल अशी नवीन व्याख्या तयार झाली. तात्पर्य काय, कुठल्याच बाईला कुमारी म्हणायचे नाही अशी चळवळ करण्यापेक्षा प्रत्येक बाईला कुमारीच म्हणा अशी चळवळ करायची पाळी आली आहे.

## ◻ नेमलेला नवरा

आपल्या पार्लमेंटच्या एका सभासदाने काही दिवसापूर्वी सुप्रीम कोर्टात साक्ष देताना 'तुमचा व्यवसाय कोणता ?' या प्रश्नाचे उत्तर म्हणे 'बायकोची सेवा करणे' असे दिले. च्यामारी ! बायकोची सेवा करणे हा जर व्यवसाय असेल तर बेकारी नष्ट करण्याचा एक रामबाण उपाय सापडला म्हणायचा – लग्न करावे – पण सबूर...आपण आपल्या 'हि'ची सेवा केवळ पोटापाण्याचा धंदा म्हणून करतो असे सांगायची कुठल्या नवऱ्याची छाती आहे ? निदान आपली तरी नाही ! आता हे खरे की मागे एकदा संसारी स्त्री दिवसभरात किती रुपये किंमतीचे घरकाम करते याचा हिशेब मांडायचा प्रयत्न झाला होता त्याप्रमाणे नवरा म्हणून नेमणूक झालेल्या युवर मोस्ट ओबीडियंट सेवकाचे स्केल काय असावे याचाही हिशेब मांडता येईल. अर्थात् 'लायक उमेदवारास अधिक पगार देण्यात येईल' या सर्वमान्य नियमाप्रमाणे नवरदेवाच्या जागेसाठी अर्ज करणाऱ्यांचा वकूब ओळखण्यासाठी असे काही आडाखे बांधावे लागतील : १ प्रस्तुत उमेदवार नवऱ्याला 'ता' वरून 'तलाश' सिनेमा ओळखता येतो का ? २. रोजचा गजरा, आठवड्याचा सिनेमा, महिन्याची साडी व वर्षाचे माहेरपण अशी खडणी तो नियमितपणे व निमूटपणे भरील का ? ३. आपण लिहून दिलेल्या पण तिच्या नावावर छापून आलेल्या लघुकथेबद्दल तो तिचे तोंडभरून कौतुक करण्याइतका वाङ्मयप्रेमी आहे का ?

◻ ◻ ◻




## अनंत भावे

## सात

पुन्हा आपल्याला व्हायन आणि त्याच्या ताफ्यातील विनाशिकांची दखल घ्यायला पाहिजे.

मागे सांगितल्याप्रमाणे पिओरन या कमांडर प्लॉवस्कीच्या विनाशिकेच्या दृष्टीला 'बिस्मार्क' पडली त्याच सुमारास मावरीदेखील पिओरनच्या साथीला आली होती. 'बिस्मार्क'ने दोघींवर तावडतोब तोफा डागल्या. आपली सुकाणू व्यवस्था दुरुस्त करण्यात सर्वस्वी गुंतलेल्या 'बिस्मार्क'ला विनाशिकांची ही धिटाई सहन होण्यासारखी नव्हती. 'बिस्मार्क' पाण्यात उसासत उभी होती. पाण्यात बुड्या मारून, निकामी झालेली सुकाणू-व्यवस्था पूर्ववत ताळ्यावर आणण्याचा प्रयत्न पाणबुडे करत होते; आणि व्हायनच्या विनाशिका जवळूनच तिला खिजवत होत्या.

तोफगोळ्यांच्या वरसातीतदेखील पिओरन आणि मावरी 'बिस्मार्क'च्या उत्तरेला मोक्याची जागा पकडण्याची शिकस्त करत होत्या. परंतु वायव्येच्या उजळ आकाशाच्या पार्श्वभूमीवर त्या अधिकच ठळक दिसत असल्यामुळे त्यांच्यावर अचूक मारा करणे 'बिस्मार्क'ला शक्य होऊ लागले. हा मारा सहन न होऊन मावरीच्या कर्णधाराने–कमांडर हॅरॉल्ड आर्मस्ट्रॉंगने–मार्गबदल करून 'बिस्मार्क'च्या दक्षिणेकडे राहायचे ठरवले. या बाजूला अचूक लक्ष्यवेध करणे कठीण होते.

परंतु आपल्या तुफानी तोफमाऱ्यापुढे मावरीप्रमाणे पिओरनदेखील काढता पाय घेईल अशी लटयेन्स वा लिंडेमान्सची अपेक्षा असेल तर ती अगदीच खोटी ठरली. 'बिस्मार्क'च्या अत्याधुनिक, प्रचंड तोफांचा भडिमार सुरू झाला म्हणजे आपली

कोती कुवत ओळखून कमी ताकदीच्या नौका पळ काढत असल्याचे दृश्य 'बिस्मार्क'च्या गोलदाजाच्या चांगल्या परिचयाचे झाले होते. परंतु पळ काढून सुरक्षित अतरावर जाणे तर सोडाच, उलट पिओरन तर बेगुमानपणे सरळ 'बिस्मार्क'वर चाल करून येत होती. 'बिस्मार्क' तिच्या टप्प्यात येताच तिच्या साडेचार इंची तोफांनी 'बिस्मार्क'वर अग्निवर्षाव करायला सुरुवात केली. जेमतेम तीन गोळे तिने टाकले असतील तोच 'बिस्मार्क'ने आपला सगळा मारा पिओरनवर केंद्रित केला. पिओरन थोडक्यात बचावली. पिओरनच्या जवळ डाव्या-उजव्या बाजूंना 'बिस्मार्क'चे उपद्रवी गोळे पडत होते. अशा अवस्थेत फार काळ जीव बचावणे कठीण आहे हे पाहून पिओरनने धुराचा पडदा निर्माण करून त्याच्या आड पळ काढला. तोपर्यंत बरोबरच्या विनाशिकाशी तिचा संपर्क तुटला होता. पण कमांडर प्लॉवस्कीला त्याची यत्किंचित पर्वा नव्हती. सभोवती 'बिस्मार्क'च्या तोफगोळ्यांनी निर्माण केलेली प्रचंड कारंजी उसळत असतानाच पिओरन संधी साधून धाडसाने पुढे घुसायची आणि 'बिस्मार्क'वर आघात करण्याचा प्रयत्न करायची या जीवावरच्या संकटातून ती बचावली कशी याचे आजही आश्चर्य वाटते. हा विजोड संग्राम तिने जवळजवळ तासभर चालवला हे लक्षात घेतले म्हणजे परमेश्वरच तिचा पाठीराखा होता, असे मानण्याचा मोह होतो. एखाद्या मांजराने पिसाळलेल्या वाघावर फिस्कारावे, त्यातला प्रकार होता तो...अखेर, मध्यरात्री, अचानक पिओरनचा 'बिस्मार्क'शी संपर्क तुटला. पिओरनचा प्रयत्न निष्फळ ठरला होता; पण त्यात व्यक्त झालेली साहसी वृत्ती निःसंशय कौतुकास्पद होती.

पिओरन आणि 'बिस्मार्क'ची वाघा-मांजराची लढाई चालू असतानाच व्हायननच्या कोझॅकने जवळ जाऊन शत्रूला नीट न्याहाळून घेतले. 'बिस्मार्क' मंद गतीने, झिंगल्यासारखी चालत होती. आता तिची सुटका होणे कठीण आहे, असे व्हायनला वाटले. मात्र मावरी आणि पिओरनवर 'बिस्मार्क'ने केलेल्या तुफानी तोफमाऱ्यावरून तिची मारक शक्ती अजून चांगलीच शाबूत असल्याची साक्ष पटत होती.

दर्यासारंग टोव्हीच्या काफिल्याने 'बिस्मार्क'ला गाठणे आता अटळच होते. 'बिस्मार्क'वर रात्रभर करडी नजर ठेऊन सकाळी टोव्हींच्या टप्प्यात तिला पोहोचवणे हे व्हायनचे पहिले आणि सर्वात महत्त्वाचे काम होते. त्यासाठी कोझॅक 'बिस्मार्क'च्या उजव्या अंगाच्या पिछाडीला पहारा करत असताना बाकीच्या विनाशिकांनी तिच्याभोवती अभेद्य कडेच निर्माण केले होते. त्या विनाशिकांच्या साक्षीने कण्हतकुथत 'बिस्मार्क' पुढे चालली होती.

व्हायनला ओळखणाऱ्या कोणीही तो 'बिस्मार्क'चा फक्त पाठलाग करण्यावर संतुष्ट राहील अशी अपेक्षा केली नव्हती. व्हायन हा नेल्सनचा वारसा सांगणारा सारंग होता. शत्रू दूर असल्याने आपण त्याच्याजवळ जाणे आणि संधी मिळताच

त्याच्यावर तुटून पडणे, अनेक दृष्टया श्रेयस्कर असते, हा नेल्सनचा प्रमुख सिद्धांत व्हायनलाही मान्य होता. त्याप्रमाणे पाठलाग करताकरताच नियमितपणे टॉर्पेडो-मारा करून, शक्य झालें तर 'बिस्मार्क'चा निकालच लावावा, आणि ते न जमले तर निदान तिची गती कुंठित करून टाकावी, असा विचार व्हायनने केला.

'बिस्मार्क' दिसल्यापासून, अवघ्या एक तासात, व्हायनने, सर्व विनाशिकांनी 'बिस्मार्क'वर एकसमयावच्छेदेकरून टॉर्पेडोमारा करण्याचा निर्णय घेतला. रात्रीचे काळे साम्राज्य महासागरावर पसरले होते. चांदण्या दाटलेल्या ढगांआड लुप्त झाल्या होत्या. उसळणाऱ्या प्रचंड लाटांना तोंड देत पाठलाग करणाऱ्या व्हायनच्या विनाशिकांना बहुतेक वेळ 'बिस्मार्क' दिसतच नव्हती. दोन-अडीच मैलांपलीकडचे काही दिसणे अशक्यप्रायच होते. परिणामतः सर्वांनी एकदम हल्ला करण्याचा विचार सोडून देऊन, प्रत्येकीने सधी सापडेल त्याप्रमाणे स्वतंत्रपणे हल्ला करण्याचा आदेश व्हायनने दिला, आणि तो प्रत्येक विनाशिकेने यथाकाल अंमलातही आणला

कभिन्न अंधारात आणि खवळलेल्या पाण्यात ही धावती लढाई चालू असतानाच, आणि बिघडलेल्या सुकाणू-व्यवस्थेनिशीदेखील काहीतरी निश्चित मार्ग आखण्याची 'बिस्मार्क'ची खटपट चालू असतानाच, ॲडमिरल लटयेन्स आणि त्याच्या सहकारी नाविकांना हिटलरकडून एक संदेश मिळाला : "आमचे सारे लक्ष आमच्या विजयी वीरांकडे लागलेले आहे !"

अकरा वाजण्याच्या सुमारास 'बिस्मार्क' वायव्य दिशेला वाटचाल करू लागली. कधी विनाशिकांवर तोफमारा करण्यासाठी तर कधी होणाऱ्या टॉर्पेडो-माऱ्याला चुकवण्यासाठी 'बिस्मार्क'ला मार्गबदल करावा लागे हालचाली चपळाईने कराव्या लागत, पण पुन्हा एका विशिष्ट पवित्र्यातच मार्गक्रमण करणे तिला भाग पडे. त्या तसल्या वाऱ्यासमुद्रात, बिघडलेल्या सुकाणूमुळे तिला त्या विशिष्ट मार्गाने, विशिष्ट पवित्र्यातच वाटचाल करण्यावाचून गत्यंतर नव्हते.

परंतु खवळलेला महासागर काय किंवा दाटलेला अंधार काय, 'बिस्मार्क'च्या तोफमाऱ्याच्या अचूकपणावर या दोहोंचा काहीही परिणाम झाला नव्हता. परिणामतः व्हायनच्या विनाशिकांना सागर आणि अंधार याच्यापासून फारसे संरक्षण लाभत नव्हते. कारण नाविक युद्धाच्या इतिहासात प्रथमच एक युद्धनौका, रात्री रडारच्या साहाय्याने लक्ष्य हेरून, तोफमारा करत होती. विनाशिकापुढे हे एक अनपेक्षित आणि भयंकर सकट उभे राहिले. त्यामुळे रात्रभर एकीकडे 'बिस्मार्क'चा पाठलाग आणि तिच्यावरील टॉर्पेडोमारा चालू असताना, दुसरीकडे तिचा तोफ-मारा चुकवण्याचा बचावात्मक प्रयत्न करणेही व्हायनच्या विनाशिकाना भाग पडले. कधी कधी तर त्याचा काही काळ 'बिस्मार्क'शी संबंध तुटत असे. मात्र ती सर्फ कधीच निसटू शकली नाही.

रात्रीच्या वेळी, अद्ययावत रडार-व्यवस्था असलेल्या युद्धनौकेच्या महाकाय, तोफांचे लक्ष्य होणे, हा एक भयकर तापदायक अनुभव होता. एक क्षण संपूर्ण अंधार; दुसऱ्या क्षणी, दूर कोठेतरी चमकून डोळे दिपवणाऱ्या, एकमेकात मिसळणाऱ्या, युद्धनौकेच्या लाबसडक तोफनळ्या आणि ढग उजळणाऱ्या प्रकाशशलाका- आणि आणखी थोड्या सेकंदानंतर सभोवर एकापाठोपाठ कोसळणाऱ्या तोफ गोळ्यांचा प्रचंड आवाज आणि त्यासरशी उच उसळणारे आक्रमक पाणी ! हे भयंकर दिव्य सहन करत व्हायनच्या विनाशिका 'बिस्मार्क'चा पिच्छा पुरवत होत्या.

पिओरनला पळवून लावल्यानतर 'बिस्मार्क'ने आपला मारा कोझॅकवर केंद्रित केला. या माऱ्याच्या अचूकपणामुळे आणि आवेगामुळे व्हायनला धुराचा पडदा निर्माण करून त्यामागे आश्रय घ्यावा लागला. कोझॅक थोडक्यात बचावली होती परंतु थोड्याच वेळात, बेदरकार व्हायनने पुन्हा पूर्वीचा कोन साधून पाठलाग चालू ठेवला.

कोझॅकला भिववून 'बिस्मार्क' झुलूवर घसरली. डाव्या-उजव्या बाजूला पडणाऱ्या गोळ्यांनी झुलू खिळल्यासारखी झाली. एका गोळ्याने तीन नाविक जखमी झाले. झुलू वाचवण्यासाठी कमांडर ग्रॅहॅमला पलायन करण्यावाचून गत्यंतर उरले नाही. अखेर त्याचा 'बिस्मार्क'शी सपर्कच तुटला.

शीख आणि मावरीदेखील 'बिस्मार्क'च्या तोफमाऱ्याला भिऊन इतस्तत: पळाल्या. व्हायनच्या विनाशिका येणेप्रमाणे विखुरल्या गेल्या. त्या प्रचंड महासागरावर, अंधारात, 'बिस्मार्क'शी पुन्हा संपर्क साधण्यासाठी त्या चाचपडू लागल्या. जवळ जवळ अर्धा तास 'बिस्मार्क' अदृश्यच झाली होती. ज्या जागी ती अखेर दिसली होती ती जागा सर्वांना कळावी म्हणून मावरीने त्या जागेवर चंद्रज्योती उडवल्या. फिकट पांढुरक्या प्रकाशाने प्रथम, आकाशात सरकणारे ढग आणि नंतर, सागरात उसळणाऱ्या लाटा अकस्मात उजळून निघाल्या. 'बिस्मार्क' मात्र तेथे नव्हती.

'बिस्मार्क'चे पुनर्दर्शन झुलूला झाले. 'बिस्मार्क'च्या झंझावाती हल्ल्याला घाबरून पहिल्या वेळी झुलू उत्तरेला वळली तेव्हा तिची कोझॅकशी भेट झाली होती. थोड्या वेळाने, 'बिस्मार्क'वरील पहिल्या बेदरकार हल्ल्यानंतर दीर्घकाळ अदृश्य झालेली पिओरन, जणू अज्ञातातून यावी तशी, अकस्मात प्राप्त झाली. यावेळी झुलूच्या कप्तानाला - कमांडर ग्रॅहॅमला – व्हायनकडून, संधी मिळेल तेव्हा 'बिस्मार्क'वर टॉर्पेडोमारा करण्याचा हुकुम मिळाला. 'बिस्मार्क'ला गाठता येईल अशा हिशेबाने झुलू पश्चिमेकडे वळली आणि रात्री एक वाजता तिला 'बिस्मार्क' दिसली. 'बिस्मार्क'ने ताबडतोब आपल्या पंधरा इंची आणि इतर लहान तोफांनी

तिच्यावर भडिमार केला. झुलूसारख्या छोट्या विनाशिकेवर 'बिस्मार्क'ने सर्व शक्ती एकवटून हल्ला चढवणे थोडे आश्चर्यकारक होते; परंतु त्यावरूनच तिच्या बेभान अवस्थेची कल्पना येते. झुलूच्या दोन्ही बाजूंना गोळे पडले. त्यांनी उठवलेल्या पाणभिंतींनी झुलू कोंडल्यासारखी झाली; परतु तिच्या सहचरीप्रमाणे, त्या रात्री तिचेही नशीब शिकंदर होते. पिओरनप्रमाणेच झुलूही मागे हटली नाही. 'बिस्मार्क'च्या भडिमारातून निश्चलपणे वाट काढत झुलूने तिच्यावर चार टॉर्पेडो टाकले. परतु 'बिस्मार्क'ला इजा झाल्याचे चिन्ह दिसेना. नंतर, हल्ला करणाऱ्या इतर विनाशिकांना अडथळा होऊ नये म्हणून ग्रॅहॅमने उत्तरेकडे एक मोठे वळण घेतले. आणि अपेक्षेप्रमाणे मावरीने 'बिस्मार्क'वर केलेला टॉर्पेडोमारा, मोक्याच्या जागी राहून पाहण्याचे भाग्य झुलूला लाभले.

कमांडर आर्मस्ट्रॉंगने, 'बिस्मार्क'च्या डाव्या बाजूवर मारा करण्याच्या बेताने मावरी चोरपावलांनी तिच्याजवळ आणली. झुलूवर मारा करण्यात गुतलेल्या 'बिस्मार्क'चे मावरीच्या आगमनाकडे लक्ष गेले नाही. मावरी 'बिस्मार्क'पासून अवघ्या चार हजार गजांवर आली होती. 'बिस्मार्क'च्या इतक्या जवळ जाण्यात तिने फार मोठा धोका पत्करला होता. आर्मस्ट्रॉंगने मावरी 'बिस्मार्क'चा मध्यभाग टप्प्यात येण्यासाठी पुढे सरकवली, तेव्हा 'बिस्मार्क' उजव्या बाजूला वळत असल्याचे त्याला दिसले. त्यामुळे 'बिस्मार्क'वर नेम धरणे अवघड झाले होते. म्हणून आर्मस्ट्रॉंगने चंद्रज्योत उडवली. कसल्याही प्रतिकाराशिवाय इतक्या जवळ आल्यानंतर आता त्या गोष्टीचा पुरेपूर फायदा उठवण्याचा आर्मस्ट्रॉंगचा विचार होता. त्याने त्वरेने दोन टॉर्पेडो टाकले आणि स्वत:देखील मावरी 'बिस्मार्क'-सारखीच वळवली; त्यामुळे 'बिस्मार्क' वळल्यावर तिचा उजवा भाग मावरीच्या मारक टप्प्यात येऊन त्याही बाजूवर टॉर्पेडोमारा करता येणार होता. या हेतूने मावरी वळत असतानाच तिला ते विलक्षण दृश्य पाहायला मिळाले. मुखापासून शेपटीपर्यंत 'बिस्मार्क'चे चिलखती अंग प्रकाशाने उजळून निघाले होते. जणू काही अनेक प्रखर दिव्यांच्या मालिकेनेच तिच्या अंगावर प्रकाशझोत टाकले होते. हा चमत्कारिक प्रकाश लगेच विरला. पण काही सेकंदातच 'बिस्मार्क'च्या पुढील भागी प्रकाशाचा एक झगझगीत पट्टा दृश्यमान झाला – 'बिस्मार्क'वर टॉर्पेडोंचा जबरदस्त आघात झाला होता! मावरीच्या आनंदाला सीमा नव्हती. परंतु आनंदात मश्गूल राहणे शक्यच नव्हते. कारण 'बिस्मार्क'ने तिच्यावर दुप्पट रागाने हल्ला चढवला होता. तोफगोळे मावरीच्या आसपास अगदी जवळ कोसळत होते; पण खुद्द तिच्यावर मात्र एकही गोळा कोसळला नाही. यात 'बिस्मार्क'च्या गोलदाजांची कसूर असण्यापेक्षा मावरीच्या सुदैवगतीचाच भाग अधिक होता. मावरी आता कमाल वेगाने निसटून जाऊ लागली. सहा मैल दूर जाईतो 'बिस्मार्क'च्या तोफगोळ्यांनी तिचा जीवघेणा पाठलाग केला; पण ती सही-

सलामत निसटली. ज्या बेदरकारीने मावरीने 'बिस्मार्क'वर हल्ला चढवला होता, आणि तो चढवताना जो भयंकर धोका पत्करला होता त्याच्याबद्दलची बढाई तर सोडाच, परंतु वस्तुस्थितीही कमांडर आर्मस्ट्रॉंगच्या दर्यासारंग टोव्हीना सादर केलेल्या या चकमकीच्या अहवालात आढळत नाही. तो एवढेच म्हणतो : 'ती काही मिनिटे मोठी धामधुमीची होती !'

दरम्यान व्हायनला संधी सापडली होती. 'बिस्मार्क'च्या भडिमाराला भिऊन मावरी काढता पाय घेत असतानाच, ईशान्येकडून कोझॅक चोरपावलांनी 'बिस्मार्क'-जवळ आली. मावरीच्या संस्मरणीय पलायनानंतर अवघ्या तीन मिनिटांनी, सहा हजार फुटांवरून व्हायनने तीन टॉर्पेडो टाकले. 'बिस्मार्क'चा प्रचंड देह, तोफांचा मारा करताना पडणाऱ्या प्रकाशरेखांमुळे ठसठशीत दिसत होता. त्यामुळे कोझॅक-वरील टॉर्पेडोफेक्यांना अगदी हवे होते तसे सोयिस्कर लक्ष्य मिळाले होते. 'बिस्मार्क' वर आणखी एक आघात झाला. तिच्या अग्रभागी असणाऱ्या छोटयाशा डेकवर प्रकाशाचा एक लोळ उठला. अंधाऱ्या आकाशात ज्वाला उसळल्या. 'बिस्मार्क'ची अवस्था खुणेचा जाळ पेटवलेल्या वास्तूसारखी झाली होती. तिच्यावरील प्रकाशा-मुळे सभोवारच्या विनाशिकांना ती अचूक दिसत होती.

या तीन आघातांनी 'बिस्मार्क'ची गतीच कुंठित झाली. निकामी सुकाणू व्यवस्था, बेभानपणे चौफेर केला जाणारा तोफमारा आणि जागोजाग झालेले टॉर्पेडोचे आघात, यामुळे ल्टयेन्सला 'बिस्मार्क'वरील झाडून साऱ्या दोन हजार तीनशे माणसांचो जरूर भासत होती. आणखी एक तासाने ती पुन्हा कशीबशी चालू लागली. या काळात झुलूचे तिच्यावर बारीक लक्ष होते. कमांडर ग्रॅहॅम कॅप्टन व्हायनला नियमितपणे वार्ता कळवत होता.

'बिस्मार्क'च्या तोफा या ना त्या विनाशिकेवर हल्ला करण्यासाठी सतत धडाडत होत्या. यावेळी सांडणाऱ्या प्रकाशामुळे, त्या वादळी रात्रीदेखील विना-शिकांना पुन्हा पुन्हा तिचा माग काढणे सहज शक्य होत होते. काही काळ दुराव-लेली शीख त्याचमुळे दक्षिणेकडून चपळाईने येऊन 'बिस्मार्क'वर घसरली. 'बिस्मार्क'पासून ती अवघ्या चार मैलावर आली तरी तिची चाहूल 'बिस्मार्क'ला लागली नव्हती. लाटांवर अगतिकपणे हेलावणाऱ्या 'बिस्मार्क'वर तिने चार टॉर्पेडो टाकले. परतु अनपेक्षितपणे इतक्या जवळून टॉर्पेडो टाकण्याची दुर्लभ संधी मिळाल्यामुळे गोलंदाज आनंदाने थोडा बेहोष झाला असावा. कारण दोन टॉर्पेडो-फेकीत जितका किमान वेळ जाणे आवश्यक आहे तितका वेळ जाऊ न देता त्याने घाईघाईने, बंदुकीतून गोळया झाडाव्या तसे एकापाठोपाठ एक असे टॉर्पेडो टाकले. त्यामुळे ते पाण्यातल्या पाण्यात एकमेकावर आदळले आणि फुकट गेले. या अपेशी प्रयत्नानंतर शीख जवळ जवळ दोन तास 'बिस्मार्क'वर नजर ठेऊन होती. चार वाजण्याच्या सुमारास 'बिस्मार्क' शीखच्या नजरेतून निसटली आणि अदृश्य झाली.

तीन वाजायच्या सुमारास 'बिस्मार्क'ची गती थोडी सुधारली. अर्थात अजून खुरडतच होती ती. आता सुरक्षिततेपासून आणि जगण्याच्या शक्यतेपासून उत्तरेकडे मार्गक्रमण करण्यावाचून गत्यंतरच नव्हते तिला. आपल्या विनाशाकडे अपरिहार्यपणे जाणाऱ्या 'बिस्मार्क'वरील परिस्थिती करुणाजनक होती. सुकाणू–कक्षामध्ये पाणीच पाणी झाले होते. पाणबुड्यांनी दोहोपैकी एक सुकाणू दुरुस्त करण्यात यश मिळवले असले तरी दुसरे सुकाणू दुरुस्त होणे त्यांच्या शक्तीपलीकडचे होते. परिणामत: 'बिस्मार्क'ला फक्त धोकेबाज उत्तरदिशेलाच जाता येत होते.

'बिस्मार्क'वरील नाविकांना अजूनही स्वस्थता नव्हती. तिची गती सुधारून ती मार्गस्थ झाली इतक्यात कोझॅकने तिच्यावर चाल करून एक टॉर्पेडो टाकला. पण तो लागला मात्र नाही. 'बिस्मार्क'ने कोझॅकवर तोफा डागल्या आणि व्हायनला धुराच्या पडद्यामागे पलायन करावे लागले. इतर विनाशिकांच्या मार्गात अडथळा येऊ नये म्हणून त्याने प्रथम उत्तरेला मोठे वळण घेतले आणि नतर तो पश्चिमेकडे वळला.

पाठलाग चालूच राहिला. डोंगराएवढ्या लाटाचे तडाखे विनाशिकांना बसत होते. एकदा त्यांचा पुढील भाग पाण्यात एखाद्या बाणासारखा घुसे, मागील भाग एकदम वर उठे, डेकवरून लाटांचे पाणी निथळत जाई; आणि लगेच लाटांबरोबर पुढील भाग वर उचलला जाऊन मागील भाग लाटांच्या भोवऱ्यात सापडे. आणि ही कसरत चालली होती काजळकाळ्या अंधारात आणी भणाणणाऱ्या वादळवाऱ्यात.

चार वाजण्याच्या सुमारास एक संकट उभे राहिले. अचानक 'बिस्मार्क' कोठे गुप्त झाली. तिच्याशी असलेला विनाशिकांचा संबंध पार तुटला. आता एकही विनाशिका तिच्या मागावर नव्हती. अर्धवट निकामी सुकाणू–व्यवस्था, आणि त्यामुळे वाऱ्यासागराच्या लहरीनुसार बदलणारा तिचा मार्गक्रम, यांमुळे 'बिस्मार्क'चा पाठलाग करणे कठीण होऊन बसले होते यात संशय नव्हता. ताबडतोब विनाशिकांनी तिचा बारकाईने शोध चालवला. एक तास गेला; पण काही उपयोग झाला नाही. 'बिस्मार्क' बहुधा टॉर्पेडोच्या आघातांमुळे बुडाली असावी; आणि म्हणूनच तिचा शोध लागत नाही, लागणे शक्यही नाही, असे मानणारी काही माणसे विनाशिकावर होती. पण खुद्द व्हायनला मात्र तसे वाटत नव्हते. 'बिस्मार्क'सारखी मजबूत युद्धनौका इतक्या सहज सागरतळाशी जाईल, यावर त्याचा विश्वास नव्हता. 'बिस्मार्क' पुन्हा सापडेल याची त्याला खात्री होती. सकाळी तिला टोव्हीच्या काफिल्याच्या तोंडी देण्याची उमेद तो बाळगून होता. त्याच्या मते 'बिस्मार्क'चा पुन्हा माग लागणे हा केवळ वेळेचा आणि धीराचा प्रश्न होता. वेळ त्याच्याजवळ भरपूर होता. धीर धरण्याबद्दल मात्र त्याची फारशी ख्याती नव्हती. विनाशिकांच्या जागा ठरवून देऊन पुन्हा शोध चालू झाला. नाविकदृष्ट्या उष:काल

पाच वाजून चाळीस मिनिटांनी आणि सूर्योदय सहा वाजून पन्नास मिनिटांनी होणार होता. त्या सुमारास 'बिस्मार्क'च्या पश्चिमेला असण्याची व्हायनची इच्छा होती. म्हणजे पूर्वेच्या प्रकाशमान होणाऱ्या पार्श्वभूमीवर ती अधिक ठसठशीत दिसू शकणार होती. पीख, झुलू आणि मावरीने वायव्येला तर कोझॅकने पश्चिमेला आणि नैऋत्येला 'बिस्मार्क'चा शोध चालवला होता.

साडेचार वाजता एका चंद्रज्योतीने झुलू अचानक उजळून निघाली. 'बिस्मार्क'नेच अचूक लक्ष्यवेध करण्यासाठी ही चंद्रज्योत उडवली असावी या कल्पनेने झुलू क्षणभर भयाकुल झाली. 'बिस्मार्क'च्या गोळ्यांनी आपली चाळण होणार, अशी भीती कमांडर ग्रॅहॅमला वाटली. परंतु 'बिस्मार्क'ने नव्हे तर दुसऱ्या एका विनाशिकेनेच ती चंद्रज्योत उडवली होती. म्हणून काहीच विपरीत घडले नाही. शोध पुढे चालू झाला. पिओरनची एकाकी शिलेदारी चालू होती. अरुणोदयाला आता फार अवकाश नव्हता.

पाच वाजले. पिओरनने अखेरचे अभिवादन करून मोहिमेतून काढता पाय घेतला! व्हायनने तिला प्लायमाऊथला जाण्याची आज्ञा केली होती. कसल्याही नामुष्कीमुळे पिओरनने माघार घेतली नव्हती. फक्त तिचा तेलसाठा संपुष्टात आला होता. नौदलप्रमुखांकडे पाठवलेल्या त्या रात्रीच्या पाठलागाच्या अहवालात सहसा स्तुती न करणाऱ्या व्हायनने पिओरनच्या कामगिरीचा पुढीलप्रमाणे गौरव केला. "पिओरनवरील तेलसाठा संपत आला होता. 'बिस्मार्क' प्रथम दिसताच, भरदिवसा पिओरनने तिच्यावर हल्ला चढवला आणि नंतर मोठ्या धैर्याने तिचा पिच्छा पुरवला. रात्री मात्र पिओरनचा 'बिस्मार्क'शी संपर्क तुटला होता. नाही तर कमांडर प्लॉवस्की तिच्यावर तुटून पडला असता याबद्दल माझी खात्री होती. उजाडल्यानंतर, कसल्याही आडोशाशिवाय, आपल्या नौकाची परिस्थिती अधिक बिकट होणार होती; आणि गरज नसताना इतकी कतबगार विनाशिका आणि गुणी माणसे धोक्यात घालणे मला युक्त वाटले नाही. शिवाय तिच्या मदतीशिवाय 'बिस्मार्क'ला आपल्याकडे पावते करण्याबद्दल मला चांगलाच विश्वास वाटत होता."

येणेप्रमाणे या महान नाविक मोहिमेतील आपला वाटा हिमतीने उचलून कमोडर प्लॉवस्की प्लायमाऊथकडे परतला. प्लॉवस्कीने तोपर्यंत कधीही विनाशिकांच्या या चौथ्या विभागाबरोबर काम केलेले नव्हते. त्यामुळे व्हायनची कार्यपद्धती त्याला सर्वस्वी अपरिचित होती. म्हणूनच पिओरनला बहुतेक सारा वेळ स्वतःच्या तंत्रानेच चालावे लागले होते; आणि हे तंत्र किती बिनचूक आणि उपकारक होते, याची साक्ष त्याने चांगलीच पटवली होती.

'बिस्मार्क'चे पुनर्दर्शन मावरीला झाले. पहाटेचा फिकट प्रकाश महासागरावर पसरला होता. 'बिस्मार्क' जवळ जवळ थेट उत्तरेला नागमोडीने चालली होती.

नागमोडीत एका बाजूला फेकली गेल्यानंतर निकामी सुकाणूमुळे मिनिटभर ती वेगाने वाहणाऱ्या वाऱ्याच्या आधीन होई; आणि तज्ञांनी प्रयत्न केल्यानंतर दुसऱ्या बाजूला वळे.

'बिस्मार्क'ची सुटका आता जर्मन विमाने आणि पाणबुड्या यांच्या मदतीवर अवलबून होती. सुकाणू-व्यवस्थेत अधिक सुधारणा होणे अशक्यप्राय आहे हे ॲडमिरल लटयेन्सला केव्हाच कळले होते. 'बिस्मार्क'पुढे काळसकट उभे होते. विमाने आणि पाणबुड्या यांची वाट पाहात नेटाने चालत राहण्यावाचून 'बिस्मार्क'ला गत्यंतर नव्हते. तिच्या तोफा मात्र अजून पूर्ण कार्यक्षम होत्या. त्याच्यामुळे ती अजूनही निकराचा लढा देऊ शकत होती. पण आता उजाडण्याची वेळ झाली तरी जेव्हा विमाने आली नाहीत किंवा पाणबुड्यांबद्दलची काही वार्ता कळली नाही तेव्हा आपला अंतकाळ समीप आला हे लटयेन्स-लिंडेमाननी ओळखले. मात्र शरणागतीचा वा आत्महत्येचा विचारसुद्धा त्यांच्या मनात आला नाही. अखेरपर्यंत निकराचा लढा देण्याचा त्यांनी मनोमन निश्चय केला होता. आदल्या रात्री नाविकांना थोडीदेखील विश्रांती मिळाली नव्हती. स्वतः लटयेन्स आणि लिंडेमान अत्युच्च अधिकाऱ्यांसाठी असलेल्या खास जागेवर रात्रभर उभे होते. आपापल्या कामाच्या जागीच झोपी गेलेल्या सहकाऱ्यांना त्याचे तितकेच पेंगुळलेले नाविक जागे करीत होते. एखाद्या रोगाची वेगाने लागण व्हावी तसा लढाईचा शीण 'बिस्मार्क'वर सर्वत्र पसरला होता. साऱ्या आशा आता मावळल्या होत्या. मनाला उगाच खोटा दिलासा देण्यात काही अर्थ नव्हता. हिटलरचे भपकेबाज शब्द आता फुसके वाटत होते. अमर्याद अटलांटिक महासागरात 'बिस्मार्क' आता एकाकी पडली होती. हूडवरील विजयाची एकुलती एक बढाई फार तर तिला मारता येत होती. ब्रिटिश अन्नवाहू नौकाचे काफिले निर्धोक होऊन स्वगृही सुखरूप चालले होते. लढाऊ ब्रिटिश नौकानी 'बिस्मार्क'भोवती कडे केले होते. तिच्या तोफांची सक्रृद्दर्शनी त्यांना यत्किंचित पर्वा वाटत नव्हती. आता मृत्यु अटळ होता. दोन हजार तीनशे निष्ठावत नाविक त्याच्या भेटीसाठी सिद्ध झाले होते. 'बिस्मार्क'-वरील प्रत्येक तोफ सज्ज झाली होती. निर्वाणीच्या प्रतिकारासाठी प्रत्येक गोलंदाजाने कबर कसली होती. शेवटची घटका आत्मार्पणाने उजळून टाकण्याचा प्रत्येकाचा निर्धार होता.

उजाडण्याच्या सुमारास मावरीने चंद्रज्योत उडवली. तिच्या प्रकाशाने उजळलेली 'बिस्मार्क' शीखच्या दृष्टीला पडली. अवघ्या सात नॉट गतीने पावसातून खुरडत जाणारी 'बिस्मार्क' शीखपासून फक्त चार मैलावर होती. अतर इतके कमी असूनही, आश्चर्य असे की, 'बिस्मार्क'ने शीखवर तोफमारा केला नाही. रात्रीच्या तिच्या शीघ्रकोपी स्वभावाशी सपूर्ण विसगत वागली होती 'बिस्मार्क.' परंतु विनाशिकांना पळवून लावण्याचा प्रयत्न करण्यात आता अर्थ नाही हे लटयेन्सला उमगले

होते. व्हायनच्या विनाशिकाच्या चिवटपणाला शत्रूने दिलेली शिफारसच होती ती. आपल्यापुढे काय वाढून ठेवले आहे याची लटयेन्सला पुरेपूर कल्पना होती. सकाळी भेटणाऱ्या ब्रिटिश युद्धनौकांसाठी दारुगोळा राखून ठेवत होता तो; म्हणूनच शीख-सारख्या चिल्लर विनाशिकेवर तो खर्च करायला लटयेन्स तयार नव्हता.

परतु युद्धनौका येईपर्यंतदेखील 'बिस्मार्क' ला शातता लाभली नाही. कोणाला कल्पनाही नसता मावरी वेगाने 'बिस्मार्क' जवळ गली आणि पाच मैल अतरा-वरून तिने दोन टॉर्पेडो टाकले. मात्र एकही टॉर्पेडो लक्ष्यवेध करू शकला नाही. क्रुद्ध होऊन 'बिस्मार्क'ने मावरीवर भडिमार केला; परंतु ती शिताफीने निस-टून गेली.

व्हायनने आपल्या काफिल्याची पुनर्रचना केली. 'बिस्मार्क'भोवती अभेद्य कडे करून तो दर्यासारंग टोव्हीची वाट पाहू लागला. कॅप्टन फिलिप व्हायनबरोबर त्याच्या झुंजार नाविकानी घालवलेल्या अनेक चित्तथरारक रात्रींपैकी आधली रात्र सर्वात अधिक चित्तथरारक म्हणावी लागेल.

त्या रात्रीच्या पाठलागाबद्दल टोव्हीनी अधिकृत अहवालात पुढील गौरवोद्गार काढले आहेत: 'व्हायनच्या पाठलागाची तऱ्हा जवळजवळ आदर्श होती, असे मानावे लागते. बिकट वातावरणात, भयकर तोफमाऱ्याला तोंड देत व्हायनच्या विनाशिकांनी 'बिस्मार्क'चा चिवटपणे पाठलाग केला; इतकेच नव्हे तर टॉर्पेडो-माऱ्याने तिला दुबळी करून दुसऱ्या दिवशी सर्वनाशासाठी माझ्या स्वाधीन केली. या प्रयत्नात साऱ्या विनाशिका सुरक्षित राहिल्या याचे श्रेय त्याच्या कुशल नेतृत्वा-लाच दिले पाहिजे.'

खरोखरच 'बिस्मार्क'च्या भीषण भडिमाराला वीरवृत्तीने तोंड देतानाही अग भाजून न घेणारे या विनाशिकाचे कर्णधार पलायनकलेत चागलेच प्रवीण असले पाहिजेत. त्यानी आपली कामगिरी उत्कृष्ट पार पाडली होती. आता मोक्याची जागा धरून 'बिस्मार्क'च्या शोकान्त नाटयाचा अखेरचा प्रवेश त्या पाहणार होत्या.

प्रभातीच्या हल्ल्यासाठी आर्क रॉयलच्या विमानाचे आगमन होत होते. किंग जॉर्ज द फिफ्थ, रॉडने, नॉरफोक आणि डॉर्सेटशायर सावजाच्या समीप आल्या होत्या आणि त्यांचे जखमी सावज सात नॉट वेगाने खुरडत उत्तरेकडे अगतिकपणे चालले होते.

सात वाजून वीस मिनिटे झाली. अटलांटिक महासागरातील तो भीषण सग्राम पाहायला सूर्यदेखील आकाशात आला.

(क्रमशः)

उल्हास लुकतुके

# माफ करा तेंडुलकर....

टयट्क् टयट्क् टचाँव...टयट्क टयट्क् टघाँव ...

वाह् रे वाह् रे वाह्...तेरी बबई–
वाह्रे वाह्रे भारी गंमत.. वाह् रे वाह् भारी गंमत.
भारी गंमत लाहीमज्जा...भारी गंमत लाही मज्जा...
आहाहा.. आहाहाहाहा...
" घ्येऊन बगा साह्येब...घिऊनशानी बगा .. ,
बगा तरी.. मारा यक झुरका.
आशी सुटल्याती घ्वाडे...सुटल्याती घ्वाडे. आशी सुटल्याती...आशी सुटल्याती..."
वाह् रे वाह्...
टयट्क् टचाँव...टयट्क् टचाँव...

ही फँटसी–घोडयांची. मटक्याची. जुगाराची. गांजाची. डाल्डाची. खोपडीची. नवसागराची. झोपडपट्टीची.

––माफ करा तेंडुलकर, तुम्हाला फँटसी जमलीच नाही. फुटपायरीची फँटसी चंद्रावर जाण्याची असत नाही.

ही झोपडपट्टी. फुटपायरीच्या सम्राटाची. चिखलाच्या गालिचाची. दगडधोंड्याच्या कोशागाराची. धुराच्या उबेची. धुळीच्या दुलईची. कुजक्या गंधभांडाराची. खचलेल्या लँडस्केपची. ही झोपडपट्टी आता खचतेय. नव्या होणाऱ्या रस्त्याखाली. माजलेल्या रेड्यासारखा घ्रॉव घ्रॉव करीत येणारा बुलडोझर.

पाच दिवसांची ओली माता " बगा दादा. काय त बी करा. माह्या प्वारास्नी वाचवा. तापानं ह्ये फनफनलया "

चुलीचे दगड तापावेत तसे तापलेले पोर. त्याला हातात घेऊन उभी एक ओली माता–

––माफ करा तेंडुलकर. तुम्हाला ही ओली व्यथा गवसलीच नाही. उसकटलेल्या झोपडीची, गांजेकस नवऱ्याची. पाठीवर फुटलेल्या काठीची. दोन आण्यात

दिलेल्या शरीराची. फुटपायरीच्या सम्राटाची व्यथा जीवनाच्या सौंदर्याची असत नाही.

—खूप वाईट वाटले. पण तेंडुलकर. या चिव व्यथेला त्यादिवशी रंगमंदिरात स्थान नव्हते.

—तुम्ही सम्राटावर चंद्रावर जाण्याची मध्यमवर्गीय बळबळीत फँटसी लादलीत. हरकत नाही. पण त्यापूर्वी तुम्हाला 'मेरी पॉपिन्स' आठवला नाही? त्यातली. फँटसी–गरीब बिचाऱ्या शिक्षिकेची. जगाला हसवून रडणाऱ्या विदूषकाची. सिंड्रेला होणाऱ्या तरुणीची. राजपुत्र होणाऱ्या तरुणाची. हसऱ्या फुलाची. नाचऱ्या मुलांची. उडत्या घोड्याची. साजिऱ्या हरणांची. गोजिऱ्या फुलपाखरांची. निळ्या निळ्या डोळ्यांची. इवल्या इवल्या गुबगुबीत गालांची...प्रौढ सुजाण प्रेक्षक असूनही वाटले होते ही फँटसी कधी संपूच नये. संपल्यावर वाटले, "अरेरे, आली बिचारी परत फुटपायरीच्या जगात"...

—आणि तुमची फँटसी? माणसाचे जग सोडून कधी गेलीच नाही. डोळ्यात पाणी उभे करून कधी हसलीच नाही.

—माफ करा तेंडुलकर, तुम्हाला हे कलम जमलेच नाही.

धमनीतून रक्त वाहावे तसा मुक्त नाट्यातून विनोद वाहतो. वाटले होते तुम्ही तरी ही धमनी टच्कन् फोडाल. दाखवून द्याल की फुटपायरीचे रक्त साकळले आहे.

—माफ करा तेंडुलकर, तुम्हाला विनोद जमलाच नाही.


खटकेबाज संवाद फटकेबाज लय एवढे साधे पथ्यही तुम्ही पाळले नाहीत.

मग त्याखालची टिर्रेबाज माणसे आणि हुर्रेबाज जीवन यांचा बाज कसा जमावा?

—मुक्तनाट्य म्हटले तरी खरे ते वगनाट्यच. वग म्हणजे शृंगार. जीवनावर आकंठ प्रेम केल्याशिवाय रसरशीत शृंगार कोठून येणार? फुटपायरीच्या जिण्यावर तुमचे वगनाट्य! लोकांना झोपडपट्टी थिजलेली वाटते. वाटले होते, तुम्ही थिजके बर्फाळ थर फोडाल आणि द्याल उसळवून त्यामागचा जीवनप्रेमाचा झरा आणि उभा कराल शृंगाराचा नवा अर्थ. द्याल प्राप्त करून मुक्तनाट्याला एक नवे परिमाण.

अरेरे, शेवटी वाईट वाटले, या माध्यमाच्या नव्या शक्यता तुम्ही शोधू शकला नाहीत. शोधायचा प्रयत्न केलात. पण यशस्वी ठरला नाहीत.

—माफ करा तेंडुलकर, तुम्हाला फुटपायरीचा सम्राट जमलाच नाही.



# अंदाज

पंडित वि. म. जोशी
ज्योतिष विशारद

९ ते १५ मे १९७०

**मेष** : या सप्ताहातील ग्रहमान मेष राशीला शुभफलदायक आहे. रवी–बुध–शनी पहिले, शुक्र–मंगळ दुसरे, राहू अकरावा, गुरू सातवा असे सर्व ग्रह शुभ स्थानातून जात आहेत. चद्राचे भ्रमण ३।४।५ या घरातून आहे, ते चांगले आहे. भागीदार व पत्नीचे सहकार्य चांगले मिळेल. धनलाभ चांगलाच होईल. विद्याभ्यासात प्रगती उत्तम होईल. संततीचा उत्कर्ष होईल. सरकारी कामात यश येईल. ९।१० तारखेला घराबद्दलच्या कामाकरता प्रवास होईल. उद्योगधंदा चांगला चालेल. ११।१२ तारखांना घरात काही शुभ समारंभ होईल. ता. १४।१५ ला मित्रांकडून अपेक्षाभंग केला जाईल. थोडासा मानसिक त्रास होईल. शुभ तारखा ९।१०।११।१२

**वृषभ** : या सप्ताहातील ग्रहमान वृषभ राशीला सुखकारक आहे. रवी-बुध-शनी बारावे, मंगळ-शुक्र पहिले, दहावा राहू व सहावा गुरू असे सर्वच ग्रहांना योगबल आहे, पण स्थानबल नाही. सहावा गुरू व्ययस्थानावर, धनस्थानावर व दशमावर पाहतो. यामुळे मानमरातब, धन व व्यवसाय यात उत्तम यश प्राप्त होईल. पहिले शुक्र-मंगळ सांसारिक सुख व भागिदारीच्या धंद्यात धनलाभ दाखवतात. विद्याभ्यासात अपयश येईल. संतती आजारी पडेल अगर एकाद्या फौजदारी गुन्ह्यात सापडेल. या सर्व कटकटीतून गुरू सहीसलामत पार पाडील. सार्वजनिक कामात अत्यंत यशस्वी व्हाल. इंडिकेट पक्षाचा जोर होईल. शत्रूकडूनसुद्धा फायदा होईल. वडील आजारी पडतील. ता. १४।१५ या दृष्टीने जास्त वाईट आहेत. चंद्राचे भ्रमण २।३।४ मधून आहे, ते चांगले आहे. सर्व आठवडा शुभफलदायी आहे.

**मिथुन** : या सप्ताहातील ग्रहमान मिथुन राशीला शुभाशुभ फल देणारे आहे. रवी-बुध-शनी अकरावे, शुक्र-मंगळ बारावे, नववा राहू व पाचवा गुरू असे मंगळ-शुक्राशिवाय सर्व ग्रहांची भ्रमणे शुभ स्थानातून आहेत. चंद्राचे भ्रमण १।२।३ घरातून आहे, ते चांगलेच आहे. सरकारी कामात मित्रांच्या मदतीने संपूर्ण यश येईल. फौजदारी खटल्यात निकाल आपल्यासारखा लागेल. विद्याभ्यासात अपयश येईल. शास्त्रीय अभ्यास करणाऱ्यांना जास्तच अपयश येईल. ता. ११।१२ ला अचानक भरपूर धनलाभ होईल. पुस्तक–प्रकाशनाच्या धंद्यात संपूर्ण यश मिळेल. नाट्य

कलावंताच्या गुणांचे चीज होईल. सार्वजनिक कामात भाग न घेतलेला बरा. सरकारी नोकरांना प्रमोशन मिळेल. ता. १४।१५ ला भावंडांशी मतभेद होऊन त्रासदायक वातावरण घरात निर्माण होईल. शुभ तारखा ९।१०।११।१२

**कर्क :** या सप्ताहातील ग्रहमान कर्क राशीला सुखदायक आहे. रवी-बुध-शनी दहावे, मगळ-शुक्र अकरावे, आठवा राहू व चवथा गुरू असे राहू शिवाय सर्व ग्रह शुभ स्थानातून भ्रमण करीत आहेत. वाहातुकीचा धदा करणाराना फायदा होईल. फॅन्सी वस्तूचे एजंटांना धंद्यात भरपूर नफा होईल. मित्राकडून आणि वडील माणसाकडून उद्योग—धद्यात मदत होईल. विद्याभ्यासात विशेषत: शास्त्रीय विद्याभ्यासात यश येईल. संततीचा उत्कर्ष होईल. चद्राचे भ्रमण १२।१।२ या स्थानातून आहे, ते बरे आहे. ता. ९।१० ला शारीरिक पीडा होईल. ता. ११।१२ ला अचानक धनलाभ होईल. सार्वजनिक कामात यश येईल. वाचाशुद्धी कमी होईल. ता. १४।१५ ला थोडेसे मन:स्वास्थ्य कमी होईल. शुभ ता. ११।१२।१३।१४

**सिंह :** या सप्ताहातील ग्रहमान सिंह राशीला उत्कर्षकारक आहे. रवी-बुध-शनी नववे, शुक्र-मंगळ दहावे, सातवा राहू व तिसरा गुरू असे सर्व ग्रह शुभफलदायी आहेत. शिवाय चंद्राचे भ्रमण ११।१२।१ या स्थानातून आहे, ते बरे आहे. लग्नेश सप्तमेश व एकादशेश बुध याचेसह भाग्यात. हा योग सर्व दृष्टीने प्रगतीकारक आहे. शिवाय मंगळ-शुक्र दशमात आहेत. ते अत्यत प्रबळ आहेत. मानमान्यता, अधिकार, धंदाव्यवसाय या सर्वात संपूर्ण यश. सरकारी कामात यश. नोकरीत कायम स्वरूपाचे फरक. नोकरी नसलेल्याना नोकरी मिळेल. नवीन धदा सुरू करण्याला दिवस चागले. वकिलाना प्रगतीपर दिवस. घरात मंगलकार्य जमण्याचे घाटेल. विवाह जमण्याचा योग येईल. एकादे सरकारी काम करून घ्यावयाचे असल्यास ता. १५ फारच चागली आहे. त्या दिवशी रवीही दशमात शुक्र-मंगळाना भेटतो आहे. सवध आठवडा शुभ घटना घडवणारा आहे.

**कन्या :** या सप्ताहातील ग्रहमान कन्या राशीला धनदायक आहे. आठवे रवी—बुध-शनी, नववे मगळ-शुक्र, सहावा राहू व दुसरा गुरू असे रवी-बुध-शनी शिवाय सर्व ग्रहाचे भ्रमण शुभ स्थानातून आहे. शिवाय चद्राचे भ्रमण १०।११।१२ या स्थानातून आहे, ते फारच चागले आहे. ता. ९।१० ला चागला धनलाभ होईल. सरकारी कामात अपयश येईल. सततीशी विरोध होईल. विद्याभ्यासात अपयश येईल. थोडासा पोझिशनला कमीपणा येण्याचा योग आहे. कन्या राशीची माणसे खोल मनाची असतात. या आठवड्यात १४।१५ तारखाना मानसिक यातना फार होतील. मनात भावडाशी केलेल्या वाईट वागणुकीबद्दल वाईट वाटेल. स्त्रियाकडून भाग्योदयकारक गोष्टी घडतील. भागिदाराशी व पत्नीशी थोडासा मतभेद होईल. शुभ तारखा ९।१०।११।१२।१३

**तूळ :** या सप्ताहातील ग्रहमान तूळ राशीला यशदायक आहे. सातवे रवी-बुध-शनी, आठवे मंगळ-शुक्र, पाचवा राहू व पहिला गुरू असे मंगळ-शुक्राशिवाय सर्व ग्रह शुभस्थानात आहेत. चंद्राचे भ्रमण ९।१०।११ या स्थानातून आहे, ते अत्यंत चांगले आहे. विद्याभ्यासात यश, संततीचा उत्कर्ष. वाहातुकीचा धंदा करणारे, फिरते एजंट, मोठाली कंत्राटे घेणाऱ्या लोकांना धंद्यात प्रगती व फायदा होईल. भागीदारीच्या धंद्यात दोन टोके संभवतात. अष्टमातील अमाप धनलाभ-अगर आत्यंतिक बिकट परिस्थिती निर्माण होऊन धंदा बंद होण्याची वेळ यापैकी एक गोष्ट होईल. ता. १५ ला रवी अष्टमात गेल्यावर हा योग जोरदार होईल. वडील भावंडे, मित्रवर्ग या सर्वांशी मतभेद होतील. फक्त एक लग्नातील गुरू या सर्व परिस्थितीतून संरक्षण करण्याची शक्यता आहे. शुभ तारखा ९।१०।११।१२।१३

**वृश्चिक :** या सप्ताहातील ग्रहमान वृश्चिक राशीला त्रासदायक आहे. रवी-बुध-शनी सहावे, सातवे मंगळ-शुक्र, चौथा राहू व बारावा गुरू असे मंगळ-शुक्रा-खरीज सर्व ग्रह अशुभ स्थानात आहेत. चंद्राचे भ्रमण ८।९।१० स्थानातून आहे, ते बरे आहे. संततीकरता खर्च करावा लागेल. सरकारी कामात अपयश. शत्रू फार त्रास देतील. उद्योग-धंद्याला मंदी राहील. मित्राकडून मदत होणार नाही. ९।१० ला अनपेक्षितपणे अडचणी निर्माण होतील. ११।१२ ला सार्वजनिक कामाकरता प्रवासयोग येईल. भागिदार व पत्नी पूर्ण सहकार्य देतील. नाट्य-व्यवसायातील नवोदित नटींना अनुरूप सहचर मिळेल. वृश्चिकेत चंद्र नीचीचा असतो. या राशीची माणसे अत्यंत व्यवहारी असतात. त्यांना स्वार्थाशिवाय काहीही दिसत नाही. शुभ तारखा ११।१२।१३।१४

**धन :** या सप्ताहातील ग्रहमान धनराशीला उत्कर्षकारक आहे. रवी-बुध-शनी पाचवे, शुक्र-मंगळ सहावे, राहू तिसरा व गुरू अकरावा असे सर्व ग्रह शुभस्थानातून भ्रमण करीत आहेत. चंद्राचे भ्रमणही ७।८।९ या स्थानातून आहे, ते फारच चांगले आहे. विद्येत भरघोस यश येईल. विशेषत. चित्रकला, नाट्यकला, शृंगारिक साहित्य यांत जास्त यश येईल. मंगळ-शुक्रांना योगबल चांगले आहे. शिवाय लग्नेश चतुर्थेश गुरू एकादशात आहे. तो अतिशय चांगला आहे. मंगळ शत्रुनाश करील. सरकारी कामात यश मिळेल. नोकरीत शुभ घटना घडून प्रमोशन मिळेल. ता. ९।१० सर्व बाजूंनी चांगल्या जातील. १३।१४।१५ तारखेला प्रत्येक कामात यश येईल. त्यामुळे भविष्यकाळातील उन्नतीचा पाया घातला जाईल. शुभ तारखा ९।१०।१३।१४।१५

**मकर :** या सप्ताहातील ग्रहमान मकर राशीला सौख्यदायक घटना घडवून आणणारे आहे. रवी-बुध-शनी चौथे, मंगळ-शुक्र पाचवे, राहू दुसरा व गुरू दहावा असे राहूशिवाय सर्व ग्रह शुभस्थानात आहेत. विद्येत भरघोस यश येईल. शुक्र-

मंगळ योगाने कायम स्वरूपाचा उद्योग-व्यवसाय मिळेल. साहित्यक्षेत्रात प्रगती होईल. सरकारी कामात यश येईल. थोडासा राग अनावर होईल. मनावर ताबा ठेवणे जरूर आहे. ता. १५ फारच चांगली जाईल. त्या दिवशी अचानक धनलाभ होईल. १।२।७।८ या अंकानी बनलेले लॉटरीचे तिकीट घेतल्यास निश्चित फायदा होईल. ज्योतिषशास्त्रालाही मर्यादा आहेत. शिवाय ज्योतिषालाही नशीब असतेच. काही अक्षराच्या नावाबद्दलचे ज्योतिषाचे काय कोणत्याही व्यावसायिकाचे निदान चुकते. कारण "व्यतिषजतिपदार्थान् अतरः कोऽपि हेतुः" आणि हेतु शोधण्याचे व निश्चित करण्याचे काम ज्योतिषशास्त्र करते. शुभ तारखा ११।१२।१३।१४. विशेष करून ता. १५

**कुंभ :** या सप्ताहातील ग्रहमान कुंभ राशीला शुभफलदायी आहे. रवी-बुध-शनी तिसरे, मंगळ-शुक्र चौथे, राहू पहिला व गुरू नववा असे सर्व ग्रह शुभ-स्थानातून भ्रमण करीत आहेत. चद्राचे भ्रमण ५।६।७ या स्थानातून आहे, ते फार चागले आहे. विद्येत यश येईल. उद्योग-धदा चागलाच चालेल. सरकारी व सहकारी कामात लाभ होईल: आध्यात्मिक शास्त्र व कला यात यश प्राप्त होईल. धनलाभ चागलाच होईल. ९।१० ला विद्येच्या जोरावर मोठेपणा व धन प्राप्त होईल. ता. ११।१२ ला मातुल घराण्याकडील अगर सासुरवाडची माणसे मदत करतील. ता. १३।१४ ला मानसिक अस्वस्थता वाढेल. ता. १५ ला घरातच अत्यत सुख-कारक घटना घडेल. विवाह जमून येण्याचा योग आहे. कुभ राशीची माणसे नेहमी अपयशी विचार मनात आणतात. ते अत्यत विद्वान असतात. पण हा दोष त्याच्यात दिसतो. या आठवड्यात त्यानी महामृत्युजयाचा रोज १०८ जप करावा व चद्र दर्शन घ्यावे. शुभ तारखा ९।१०।१३।१४।१५

**मीन :** या सप्ताहातील ग्रहमान मीन राशीला भोगदायक आहे. रवी-बुध-शनी दुसरे, मंगळ-शुक्र तिसरे, राहू बारावा व गुरू आठवा असे सर्व ग्रह योगबलात आहेत पण स्थानबलात नाहीत. अष्टमातील गुरू चतुर्थ, द्वितीय आणि १२ व्या स्थानावर पाहातो. अचानक धनलाभ होईल. चागल्या कार्याकरता प्रवासयोग येईल. दशमेश अष्टमात आहे त्यामुळे मानहानी होईल. चद्राचे भ्रमण ४।५।६ स्थानातून आहे. ते बरे आहे. ता. ९।१० ला घरात शुभसमारंभ घडेल. सततीचा उत्कर्ष होईल. व्यापार-धद्यात धाडस करू नये. साहित्य, ग्रथप्रकाशन या व्यव-सायाला कमीपणा येईल. भागीदार व घरातील मडळी सहकार्य देतील. सरकारी कामात अपयश येईल. पैशाचा खर्च अतोनात होईल. ता. १५ ला रवी तृतीयात येतो आहे. हातून धाडसाची कामे होतील त्यात यश प्राप्त होईल. ता. १५ पासून इडिकेट गट अत्यंत प्रबल होत आहे. शुभ तारखा ९।१०।१३।१४।१५

□ □ □

# प्रिय चॅपलीन....

चार्ली चॅपलीन एका रात्री प्रवासातून घरी आला. अंगावरचा ओव्हर-कोट काढून ठेवत असता त्याला कोटाच्या खिशात एखादी वस्तू असल्याचा भास झाला. खिशात हात घालून पाहता, त्याला तिथे एक सोन्याचे घड्याळ आढळून आले. आपल्या कोटाच्या खिशात हे मौल्यवान घड्याळ कसे आले असावे याचा त्याला बोध होईना.

दुसरे दिवशी सकाळी तो न्याहरी घेत असता पोस्टमनने त्याच्या नावचे एक पत्र आणून दिले. पत्रात मजकूर होता—

" प्रिय चॅपलीन,

मी आपल्या कलेचा एक चाहता आहे. बरेच दिवसापासून आपल्याला एखादी वस्तू भेटीदाखल द्यावी असे मला वाटत होते; परंतु माझी आर्थिक स्थिती बेताची असल्याने इतके दिवस ते जमले नाही.

थोड्याच वेळापूर्वी, मी आपल्याला ट्रेनमध्ये पाहिले तेव्हा शेजारच्या एका घनाढ्य गृहस्थाच्या खिशातले सोन्याचे घड्याळ मी काढून घेतले आणि आपल्या ओव्हरकोटात ठेवले आहे. आपल्या एक गरीब चाहत्याची आठवण म्हणून हे घड्याळ आपल्याजवळ ठेवावे एवढीच विनती. "

पत्राखाली सही नव्हती.

चॅपलीनने जवळच्या पोलिस स्टेशनला फोन करून ही गोष्ट कळवली. संध्याकाळच्या वृत्तपत्रात 'चार्ली चॅपलीनच्या एका खिसेकापू चाहत्याने सुमारे हजार डॉलर्स किमतीचे सोन्याचे घड्याळ त्याच्या कोटात टाकल्याची' बातमी ठळक अक्षरात प्रसिद्ध झाली.

दुसरे दिवशी सकाळी चॅपलीनच्या नावावर एक जडसे रजिस्टर्ड पत्र आले. पत्राखाली सही नव्हती पण अक्षर वेगळे होते.

" प्रिय चॅपलीन,

संध्याकाळच्या वृत्तपत्रात आपल्या एका चाहत्याने आपल्या ओव्हर-कोटाच्या खिशात एक सोन्याचे घड्याळ ठेवल्याची बातमी वाचली.

आपल्याला कळविण्यास मला आनंद होतो की ते घड्याळ माझ्या खिशातले होते. परंतु ज्या चाहत्याने ते आपल्या खिशात ठेवले त्याच्या-पेक्षाही मी आपला अधिक चाहता आहे. विनती एवढीच की ते घड्याळ तर आपण स्वतःजवळ ठेवावेच आणि सदर घड्याळाची माझ्या खिशात राहिलेली सोन्याची साखळी सोबत पाठवीत आहे, तिचाही आपण कृपा-करून स्वीकार करावा.

पत्राखाली मी जाणूनबुजून सही करीत नाही किंवा माझा पत्ताही देत नाही, कारण ते घड्याळ व सोन्याची साखळी आपण परत माझ्याकडे पाठवाल म्हणून ! "

— इंद्रधनु

हंसाबाईंच्याजवळ विद्वत्ता नाही.
आपल्या जीवनकथेला गोंडस रूप देण्यासाठी
आवश्यक असलेली वाङ्मयकलाही नाही.
त्यांच्याजवळ आहे ते
जे जाणतेपणे, अजाणतेपणे
डोळे उघडे ठेवून व आंधळेपणाने
अनुभवले, उपभोगले, सोसले ते ते.
त्याची ही कहाणी आहे.

—वा. ल. कुलकर्णी

हंसा वाडकर

# सांगत्ये ऐका

किंमत : आठ रुपये

राजहंस प्रकाशन

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर



" उत्कृष्ट अभिनयाबद्दलच्या ह्या वर्षाच्या बक्षिसासाठी चित्रपट परीक्षक समितीनं एकमतानं तुमच्या नावाची शिफारस केली आहे, साहेब..."